REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ | अकोला, रविवार ता० १ माहे जुलै सन १८७७ इ० | अंक २६

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. पुढील मजकुरास आपल्या पत्रीं स्थळ मिळावें.

मि० आर्देसर दिनसाजी अकोट तालुक्याचे तहशिलदार यांची बदली अकोल्यास झाली; याजकरितां त्यांच्या सन्मानार्थ अकोट एथील इंग्लिश मराठी शाळेंत तारीख ९ माहे मजकूर रोजीं सायंकाळीं चार वाजतां सभा भरली होती. गावांतील सावकार व इतर संभावित गृहस्थ, शाळाखात्याकडील मंडळी व कचेरींतील कारकून वगैरे मिळून सुमार १५० लोकांचा समाज जमला होता. सर्व जमल्यावर आर्देसर साहेब हे आले त्यांस सर्वांनीं उभे राहून ताजीम दिली. व जी जागा त्यांजकरितां मुकरर केलेली होती तेथें ते बसले. सर्व लोक आपापल्या स्थानापन्न झाल्यावर, रा. रा. सदाशिव गोविंद दामले इं. म. शाळेचे हेड मास्तर यांणीं सभेचा उद्देश सर्वांस कळविला व आर्देसर साहेब यांची विद्वत्ता, स्वभाव, निष्पक्षपातीपणा, काम चालविण्याची शैली, रयतेशी ममतेनें वागणें, त्यांच्या वियोगानें लोकांस होणारें दुख, त्यांजविषयीं लोकांची पूज्यबुद्धि इत्यादिक गोष्टीस अनुलक्षून कांहीं वेळपर्यंत भाषण केलें व शाळेंतील पहिल्या वर्गापैकीं केशव रामराव या नावाच्या एका विद्यार्थ्यानें आर्देसर साहेबांविषयीं केलेल्या कविता वाचल्या. नंतर आर्देसर सा. कांहीं बोलण्याच्या इराद्यानें उभे राहिले व त्यांनीं भाषण केलें, इतक्यांत ज्या लोकांत ते आज चार वर्षें राहिले त्यांचा व आपला वियोग होणार तेणेंकरून त्यांस फार वाईट वाटलें व त्यांचा कंठ भरून आला त्यामुळें त्यांस विशेष बोलवलें नाहीं. नंतर तालुक्याचे अधिकारी असतां ज्याप्रमाणें ते लोकांवर ममता करीत होते त्याप्रमाणें त्यांनीं सदोदित ममता ठेवावी अशी दामले यांनीं सर्व लोकांच्या तर्फेनें आर्देसर साहेबांस विनंती केली आणि शेवटीं अत्तर, गुलाब, हार, तुरे, पान, सुपारी वगैरे सर्वांस दिल्यावर सभा विसर्जन झाली व सर्वांनीं आर्देसर साहेबांस घरीं पोचविलें.

सरकारी कामगार पुष्कळ आहेत, परंतु आर्देसर साहेबांच्य तोडीचे थोडेच असतील असें ह्मणण्यास चिंता नाहीं. ते अल्पवयी आहेत तथापि एकाद्या फार दिवसांच्या अनुभवी मनुष्याप्रमाणें त्यांचे विचार पोक्त आहेत. त्यांचा स्वभाव फार सौम्य व सरळ असून मन मिळाऊ आहे. कोणाचेंही मन न दुखवितां सरकारी काम निष्पक्षपातानें करण्याची त्यांची शैली फार उत्तम आहे. चार वर्षांच्या कारकीर्दींत त्यांनीं कोणाचें विनाकारण नुकसान केलें नाहीं. असो. आर्देसर साहेबांची दिवसेंदिवस बढती होवो व परमेश्वर त्यांस सर्व कुटुंबासहित चिरकाल सुखी राखो अशी आमची प्रार्थना आहे.

लिहिण्यास अतिशय आनंद वाटतो कीं आर्देसर साहेबांच्या जागीं योग्य मनुष्याची नेमणूक सरकारानें केली आहे व त्यांच्या कारकीर्दींत रयतेस फार सुख होईल यांत संशय नाहीं. कळावें तारीख २२ जून सन १८०७ इसवी मुक्काम अकोट.

आपला एक
अकोटकर क्ष

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. फत्तेखेलडें एथें वे. शा. सं. रा. रा. रंगाच्यार्य उदागिरीकर ज्योतिषी आले होते. हे अल्पवयीं असून ज्योतिष शास्त्राचा यांचा अभ्यास बरा आहे. यांणीं माघशुद्ध १५ मेस चंद्रग्रहण आहे ह्मणून सांगितलें. आपले छापील पच्यांगांत हें ग्रहण लिहिलें नाहीं ह्मणून आह्मास आश्चर्य वाटलें याबद्दल आपण आपले पत्रीं निश्चय लिहाल तर मेहेरबानीं होईल. आमचे एथील रा. रा. लोचन सुकुळ ची. का. हेही उत्तम प्रतीचे ज्योतिषी आहेत आणि तेही या गोष्टीचे प्रयत्नांत आहेत त्यांजकडून निणर्य झाल्याचें मागाहून कळवीन. कळावें ही विनंती. तारीख १३माहे जून सन १८७७ इसवी.

एक
"पत्र वाचणारा"

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळीस येत्या अंकीं आपले सुंदर पत्रीं जागा मिळेल अशी आशा बाळगून हें पत्र लिहिलें आहे.

महाराज हल्लीं या वऱ्हाडांतील शाळाखात्यांतील लोकांस मोठा करवत असल्य सारखें आहे. कारण कीं, मेहेरबान डायरेक्टर साहेबांनीं नवीन यत्ता ठरविल्या आहेत त्याप्रमाणें बुकें असल्याशिवाय कसा बरें अभ्यास चालेल? बुकें घेण्यास डेपोंत जावें तर तेथील मास्तर सांगतात कीं, क्युरेटर कडून उपयुक्त बुकें मुळींच येत नाहींत. व रिपोर्ट करावा तर क्युरेटर कडून जबाबही येत नाहीं. महाराज, सरकार जे आज शेकडों रुपये खर्च करून क्युरेटर ठेवीत आहे आणि त्यांच्याकडे फक्त बुकांचेंच काम असून ते या कामांत लक्ष पुरवीत नाहींत, यास्तव क्युरेटर लोकांकडून लिहिलेलीं बुकें आलीं ह्मणजे बरें पडेल. नाहीं तर गरीब लोकांचें मरण आहे. ज्या वेळेस शाळेचे अधिकारी शाळा तपासण्याकरितां येतात त्या वेळेस प्रत्येक मुलाजवळ अभ्यासाचीं बुकें आहेत किंवा नाहींत तें पहातात. व एक वर्षांत एक यत्ता पुरी झालीच पाहिजे; आणि पुस्तकें मिळण्याची तर ही रीत! गरीब मास्तर लोकांनीं आतां कोणची तजवीज करावी?

आधींच तर मुलांना बुकें घेण्यास पैसा त्यांचे आई बाप देत नाहींत आणि दिला तर बुकें वक्तशीर मिळत नाहींत असें झालें ह्मणजे मुलांस पुन्हा बुकें मिळणें कठीण पडतें सबब या गोष्टीची दाद लागावी अशी इच्छा आहे. कळावें तारीख २३ माहे जून सन १८७७ इसवी.

एक क्ष

*** आमचे ऐकण्यांत आहे कीं, सेंट्रल बुक डिपोकडे फार थोडे रकमेचें सांगशन आहे त्यामुळें क्युरेटरकडे हमेशा असावा तितका बुकांचा साठा रहात नाहीं ह्मणून त्यांचा त्या कामीं निरुपाय आहे तरी ते रिपोर्टाचे जबाबही देत नाहींत असें क्ष ह्मणतात ही गोष्ट खरी असल्यास गैरशिस्त आहे. असो. रा. ब. डायरेक्टर साहेबांस आमची शिफारस आहे कीं, त्यांनीं डिपोंत बुकाचा साठा यथास्थित राहील, यावर अवश्य नजर द्यावी. बुकेंच न मिळालीं तर मुलांनीं शिकावें काय व मास्तरांनीं शिकवावें काय? मोडी बुकें आलीकडे एक वर्षभर मिळत नव्हतीं असें ऐकण्यांत आहे ही गोष्ट खरी असल्यास फार वाईट यांत संशय नाहीं. एडि. व. स.

---

देऊळगाव राजा—तारीख २४ जून.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. कां पत्रकर्ते महाराज खुशाल तर आहा नां? फार दिवस भेटावें अशी उमेद होती; परंतु मुशाफरी मुळें बनले नाहीं. आतां या गावीं ठाणें राहिल्यानें भेटीस आलों आहे तर चार ओळीस तुमचे जगमान्य पत्रीं एक कोपरा मिळावा अशी आशा आहे.

मी फिरत फिरत देऊळगाव राजा तालुके चिखली एथें बुधवा आलों आहे. कारण वऱ्हाडांत फिरत असतां बातमी लागली कीं, देऊळगाव राजा एथील बालाजीची, मूर्ति निजाम सरकारचे इलाख्यांत वालूर ह्मणून एक गाव आहे तेथें एथून आपमतें गेल्याचें अघटित वर्तमान ऐकून फार चमत्कार वाटला ह्मणून दोन्ही गावीं जाऊन खुद्द दृष्टीनें अवलोकन केलेलें आपणापुढें ठेवितों.

प्रथम वालुरास जाऊन पाहिलें तेथें एका रंगाऱ्यानें हें थोतांड करून तोतया माजविला आहे व खोटें अंगांत आणून "दुनिया झुकती हय मगर झुकानेवाला होना" याप्रमाणें कामचालूं केलें आहे. एक दोन बैरागी साथीदार आहेत, देवळास काम वगैरे सुरूं आहे.

वालुराहून निघून देऊळगावीं येण्यास निघालों तों वाटेनेंच एक चमत्कार ऐकूं आला, तो असा कीं, देउळगावापासून ३ कोसांवर सिनखेड ह्मणून एक गाव आहे तेथें मी जाऊन उतरलों इतक्यांत वालुरा जवळील खेड्याचा एक वाणी, त्याची बायको व एक मुलगा असे तिघे आले. मी विच्यारिलें आपण कोठें गेला होता. तेव्हां त्याणीं सांगितलें महाराज भटजीबुवा आह्मी देऊळगावीं श्रीबालाजीचा नवस फेडण्यास गेलों होतों, आह्मास दुबार खर्च लागला. मी विच्यारलें, ह्मणजे काय? तो वाणी ह्मणाला आम्ही देऊळ गावचे बाला साहेब यांना कांहीं कानगी वाहण्याचा नवस केला होता. पुढें आमचे गावाजवळ वालूर गाव आहे, तेथें खोटा तोतया करून एक रंगारी पैसे उपटीत आहे त्यानें आह्मास सांगितलें कीं तुह्मी कानगी एथेंच द्या ह्मणजे देऊळ गावीं जाणें नको. आम्ही ती तेथें दिली. पुढें मला हिवताप लागलें व ब्राह्मणरूपानें माझे स्वप्नांत देव येऊन दृष्टांत झाला कीं, मी देऊळगावींच आहे, माझी कानगी मला दे. पुढें मी तें मानलें नाहीं तर माझी स्त्री व मुलगा असे तिघेही मांदे झालों. नंतर लागलीच तयारी केली तों तिघेही चांगले झालों. व लागलींच महाराजाची कानगी देऊन आह्मी आपले गावीं जात आहोत. हें ऐकून आश्चर्य वाटलें व तेच दिवशीं संध्याकाळीं मी एथें आलों.

एथें पूर्ववत्प्रमाणें मूर्ति कायम असून देवाचें अर्चन वगैरे मामूलप्रमाणें चालू आहे. अतीत अभ्यागत आल्यास सदावर्तांत अन्न मिळत असतें. कामगार वगैरे कसे काय आहेत त्याची पुर्ती माहिती मिळवून पुढील खेपेस लिहून कळवीन.

एथें देवाचे समोर व्यंकटेश लायब्ररी आहे ती जानेवारीपासून सुरू झाल्याचें कळतें. आठ दहा वर्तमानपत्रेंही येत असतात परंतु काम फारच मंद दिसून येत आहे फरितां तिचे वर्गणीदारास माझी विनयपूर्वक प्रार्थना आहे कीं लायब्ररीस खुराक चढवून तिची बाल्यावस्था लवकर संपवून तिला तरुण दशेत आणावें.

एथें दोन चार दिवस झाले, रात्रीं देवाचे पंटागणावर ब्रह्मवृंद सभा जमली होती.

कोणी ब्राह्मण लाडाचे पंक्तीस जेवल्याबद्दल अपवाद आहे त्यास मुक्त करून पंक्तीपावन करावें असे विषयीं शरीरानें जाडे रंग काळा गालावर चंद्राकृती कोरी प्रमाणें ठसा असे गृहस्थ जमलेले सभेंत व्याख्यान करीत होते. मी लोकांस विच्यारलें हे कोण? त्यांत एका तरुण उंच तोंडावर देवीचे वण असलेले मनुष्यानें उत्तर दिलें कीं महराज हे आमचे गावीं व्याख्यान देण्याचा बाणा बाळगणारे मोठे हुशार ह्मणजे वऱ्हाडांतील धोंडो बाळकृष्ण देव यांचे बरोबरीचे आहेत. तें ऐकून मला फार संतोष झाला. "दुरून डोंगर साजरे जवळ जातां नाले दरे" किंवा दुसरी ह्मण यांस लागू ही कीं ओसाड गावीं अमुक सुवासिनी याप्रमाणें बोलण्याचा नक्षा कानानें ऐकून मला इषारा करू लागले कीं तूं एथून लवकर चल. पत्र विस्तार फार झाला सबब पुरें करितों, कळावें लोभ असावा ही विनंती.

एक फिरस्ता

---

# वऱ्हाडसमाचार

---

मिति ज्येष्ठ वद्य ५ शके १७९९

---

## BERAR

The Public must have ere long learnt the settlement by the Secretary of state for India of the "long and vexed question" of the restoration of this Province to H. H. the Nizam.

The decision as far as it has come to our knowledge is against the restoration, and we await most anxiously for a perusal of the despatch of the Secretary of State on the subject and will in due course discuss the points relied on by the Noble Lord in support of his conclusions.

In the mean while we propose to offer a few general remarks in connection with the subject under consideration.

The general feeling appears te be in favour of the decision arrived at by the secretary of state & we would have been astonished if the case was otherwise, for we have often had occasion to notice in these columns the universal satisfaction felt by the people & the advantages they derived under the British administration.

We sincerly trust that the decision of the Secretary of state will not be construed as casting a stigma on the superior administrative abilities of Sir Salar Jung who is rightly applauded as well by the Government of India as the public, not only for his appreciation of the line of policy pursued by the British in their administration of this country, butfor actually introducing in the Nizam's dominions, reforms based on the English system and carrying them on steadily, in spite of the strong and opposite current of feelings against which he has to contend.

We are persuaded that the chief aim of Sir Salar Jung is to make his master's subjects happy and comfortable, and when this is accomplished, we do not believe he would care whether the Nizam's subjects are ruled by His Highness directly or by the British.

In our opinion it will be unwise as it certainly is unseasonable for the Dewan to reclaim the Province when the introduction of several useful reforms are being contemplated by Sir R. Meade our Resident, reforms which, if rumour is to be relied upon are to be introduced at no very distant date.

It is no praise to say that Sir R. Meade is a hard worked officer, and that he is never satisfied with any thing, until he scrutinizes it most minutely, whether the subject is important or the reverse of it, and it is also well known that since his last visit to this Province, he evinces a warm interest in every thing that concern the welfare of its people.

We studiously avoid discussing the political side of the question, for reasons which it is not necessary to state and we are confident that Sir Salar Jung will be the last of Indian statesmen to raise his voice against the decision of the secretary of state for India, as the abolition of the "annexation policy" must convinse His Excellecy that the Noble Lord was actuated by the best of motives, in arriving at a decision contr ary perhaps to all expectations.

---

## जमखंडी संस्थानचा रिपोर्ट.

आमचे वाचकांस आठवण असेल कीं मे महिन्याच्या १३ वे तारखेच्या आमचे पत्रांत आह्मी लिहिलें होतें कीं या संस्थानचा रिपोर्ट छापून प्रसिद्ध झाला आहे तर त्याच्या प्रति वर्तमानपत्रकर्त्यांस देणें अवश्य होय. हा आमचा लेख त्या संस्थानचे मालक श्री. रा. रामचंद्रराव आप्पा साहेब पटवर्धन यांचे पहाण्यांत आला व त्यावरून त्यांनीं आह्मास सदहू रिपोर्टाची एक प्रत पाठविली ती आनंदपूर्वक स्वीकारून आह्मी त्यांचे आभार मानितों. एवढ्या मोठ्या संस्थानिकांनीं आमच्या लेखाचा आदर केला व त्याप्रमाणें वर्तन केलें हें त्यांच्या भूषेस सामान्य नव्हे. असे प्रत्येक संस्थानिक करीत गेल्यास आमच्या देशाचें नष्टचर्य फार लवकर संपेल यांत संशय नाहीं. पण तसे घडण्याचा मात्र अवकाश आहे. अस्तु.

हा रिपोर्ट कोणीही पाहिल्या बरोबर त्या संस्थानिकाची व तो रिपोर्ट लिहिणाराची तारिफ केल्यावाचून कधीं रहणार नाहीं. त्या रिपोर्टाची रचना, त्यांतिल माहिती, व एकंदर राज्यव्यवस्था संस्थानाच्या मानानें फार उत्तम आहे एवढेंच नव्हे, तर दुसऱ्या थोड्याच संस्थानांतून अशी आढळेल असें आह्मास वाटतें. सबब त्या माहितीचें थोडें दिक् प्रदर्शन करूं.

जमखंडी संस्थान चार लक्षांचे आहे. गुदस्त सालीं जमीन बाब ३२२९०१ रुपये व सायर बाब ८११२८ रुपये उत्पन्न झाले होते. ही बेरीज त्याच्या मागील सालापेक्षां सुमार ३० हजारानीं अधिक आहे. खर्च गुदस्त सालीं ३७५१६५ रुपये झाला. संस्थानास कर्ज बिलकूल नाहीं व द्रव्यही शिलकेंत आहे. गेल्या वर्षीं तिकडे पाऊस पडला नाहीं ह्मणून दुष्काळ झाला तर श्रीमंतानीं संस्थानांतून २५००० रुपयांची सार्वजानिक कामें करविलीं व खासगींतून सुमार ६८००० रुपये रयतेस जगविण्याप्रीत्यर्थ खर्चिलें हें औदार्य परम स्तुत्य होय. गुरांनां चारा नाहीं व कोणी विकत घेत नाहीं ह्मणून मालकांनीं गुरें सोडून दावीं व तीं सरकारच्या कोंडवाड्यांत जाऊन पुढेंही त्यांस गिराइक नाहीं, यामुळे कसायी लोकांकडे तीं जातात असें दिसून आलें तेव्हां श्रीमंतानीं सर्व लोकांची विकावयाचीं जनावरें खरेदी केलीं व इंग्लिश सरकारचे अधिकाऱ्यास विच्यारून तीं एका पहाडावर चारणीस नेऊन घातलीं; हीही गोष्ट सामान्य नव्हे. व्यापारी लोकांनीं माल झाकून टेवून महागाईचा प्रसंग आणिला असें श्रीमंताचे नजरेस येतांच त्यांनीं संस्थानच्या कोठ्या खुल्या करून लोकांस धान्य पुरविलें व लागलीच ४०००० रु. वऱ्हाडांत पाठवून धान्य नेलें तें पाहून इतर लोकांनींही धान्य आणविलें तेणेंकरून आतां त्या प्रांतीं पुढील हंगामापर्यंत पुरेल इतकें धान्य जाऊन साठलें आहे. ही व्यवस्थाही श्रीमंतानीं फार उत्तम केली. त्यांचा कलकत्याकडे जाण्याचा बेत होता पण रयतेची दुःखकारक स्थिति पाहून ते गेले नाहींत. याजवरून ही त्यांची लोक हिताची दृष्टी वर्णनीय होय असें कोणासही वाटल्यावाचून रहाणार नाहीं.

यांच्या संस्थानांत दिवाणी, फौजदारी, मुलकी, पोलिसी वगैरे सर्व खातीं थोडथोडींच पण मोठी सुव्यवस्थित आहेत असें दिसून येतें. सर्वांवर अपील श्रीमंताकडे होतें. ते दरमंगळवारीं दरबार भरवून लोकांचे लेखी व तोंडी सर्व प्रकारचे अर्ज मनास आणितात. तहनाम्याप्रमाणें पाहिलें असतां त्यांचा ठराव शेवटचा व त्यावर अपील नसावें, पण अंमल त्याप्रमाणें नाहीं. एक रुपयाचेही मुकदम्यांत श्रीमंताचे ठरावावर पोलिटिक्यालींत अपिल घेतात ही वहिवाट बंद होणें अवश्य आहे. साधारण ५०० रुपये पगाराचा सबार्डिनेटजडज स्मालकाजकोर्टाचे नात्यानें ५०० रुपयांचे दाव्यापर्यंत शेवटचा फैसल करूं शकतो आणि च्यार लाखाच्या संस्थानाचे मालक त्यांचा एक रुपयाच्या मुकदम्यावरीलही फैसल अखेरचा समजला जातनाहीं हें फार वाईट आहे! अशानें संस्थानिकांचा बोज कसा राहवा? याजकरितां आह्मी इच्छितों कीं इंग्लिश सरकार तहनाम्याविरुद्ध चालत आलेली ही गैरशिस्त वहिवाट लवकर बंद करील.

यांच्या संस्थानाचे ३ तालुके आहेत जमखंडी, सावळगिरी, व कुंदगोळ. कुंदगोळची पैमाष झालीआहे व बाकी दोन तालुक्यांची होणें आहे. श्रीमंतानीं गुदस्त सालची जमाबंदी आपण स्वतां तालुक्यांत जाऊन केली. जमिनीचे कौल पांच पांच वर्षांचे आहेत ते बदलून अधिक मुदतीचे करणार आहेत ह्मणजे शेतकऱ्यांचें चित्त उत्पन्न वाढविण्याचे कामीं चांगलें लागेल व संस्थानचा आणि देशाचा फायदा होईल पाडित जमीन साऱ्या संस्थानांत १३२६८ बिघे आहे व त्यांतही लागवडीजोगी २१४४ बिघेच आहे.

पोलिसचे घोडे स्वार ५६ व पायदळ २२० आहे त्यास खर्च १९८६५ रुपये साल आहे. शिवाय शेत सनदी ह्मणजे जागले लोक पोलिशीकडे २८७ आहेत. शिवाय मुलकी खात्याकडे १४७ जागले आहेत. पोलिसाला बंदुका जुन्या नळीच्या व गारेच्या आहेत. हल्लीं इंग्लिश सरकारानीं नव्या तऱ्हेच्या १०० बंदुका देऊ केल्या आहेत व तितक्या जुन्या नाहींशा कराव्या असा करार आहे.

शाळा खातें आहे त्याचे अधिकारा खालीं इंग्लिश मराठी शाळा एक, मुलींची शाळा १, व मराठी शाळा १४ आहेत व त्यांवर देखरेख ठेवण्याकरितां एक डिपुटी इन्स्पेक्टर आहे. या खात्याकडे गेल्या सालीं ५६३२ रुपये खर्च झाला, त्याच्या मागील सालीं ४२७५ झाला होता. या शिवाय मदतीच्या शाळा ११ व गावठी शाळा ३८ आहेत——परशु नावाचा एक छापखाना आहे पण त्याकडून काम भागत नाहीं सबब सरकारी प्रेस नवीन ठेवणार आहेत.

एक आस्पिटल आहे त्याला युवराज प्रिन्स आफ वेल्स यांचें नाव दिलेलें आहे व त्याला जागा श्रीमंतानीं आपले वाड्यांत उत्तम प्रकारची दिली आहे. या आस्पिटल कडे गुदस्त सालीं रुपये ६३७२ खर्च झाला व ७५९८ रोग्यांस औषधें मिळालीं.

जमखंडीस म्युनिसिप्यालिटी आहे. तिचा गेलेसालचा खर्च ११३०४ रुपये आहे. श्रीमंताकडून २००० रुपये या म्युनिसिप्यालिटीस दरसाल मिळतात. व साल मजकुरीं ४००० रुपये उसनवार देऊन तिकडूनही अन्नार्थी लोकांकारितां कामें काढविलीं होतीं. म्युनिसिप्यालिटीकडून लायब्ररीलाही १३०० रुपये दिले आहेत. तसेंच या कमिटीकडून काटेगिरीच्या तलावाचें पाणी नळानें गावांत आणविण्याची तजवीज झाली आहे. शिवाय आग विझविण्याचा बंब आहे वरात्रीं दिवे लाविले जातात.

गुदस्त सालच्या जुलै महिन्यांत या संस्थानाकडे इंग्लिश सरकारानें रा. ब. नारायण भिकाजी जोगळेकर यांस कारभारी नेमून दिलें तेणेंकरून "आधीं सोन्याचें व वर जडावाचें" अशी ह्मण आहे

त्याप्रमाणें योग्य जुवा जमला आहे. त्यांनीं थोड्याच मुदतींत पुष्कळ सुधारणा केल्या. मुलकी हिशेबी खाती वेगवेगळीं केलीं, पेनशनास आलेले वृध्ध लोक काढून त्यांचे घरचे हुशार कारकून नेमिले. जमीदाराकडील कारकून पांच पांच रुपये पगाराचे व गावाळ असत त्यांस दूर करून अधिक पगाराचे तरुण कामावर घेतले व दुसऱ्याही बहुत सुधाणा श्रीमंताचे अनुमतानें केल्या. तेणेंकरून श्रीमंतही संतोषित राहून त्यांनीं त्यांनां ३ गाव इनाम दिले. इत्यादि गोष्टी या रिपोर्टावरून समजण्यांत आल्या आहेत. मराठी संस्थानची अशी सुस्थिति वाचकांच्या कानावर यापूर्वीं थोडीच आली असेल ह्मणून नेटिव राज्याच्या चांगुलपणाच्या अभिमानानें आम्ही या विषयास इतकी जागा संतोषानें दिली आहे.

---

**पर्जन्यवृष्टी**—आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं साऱ्या मुंबई इलाख्यांत व मद्रासेकडेही पुष्कळ परजन्य पडून पेरण्याचीं कामें सुरू झालीं. व देशावरावर गेलेले बहुत लोक आपआपले गावीं परत जाऊन कामास लागले तरी त्यांनां स्वस्थ चित्त होण्यास अजून सहा महिने पाहिजेत. कोणाकोणाचा तर फारच गल्हाटा आहे त्यांनां ताळयावर येण्यास किती काळ लागेल तो लागो. ज्या कोणाजवळ बैल राहिले नाहींत ते कुदळी खोऱ्यांनीं शेतें उकरून पेरणी करिताहेत, कोणाजवळ एकच [illegible] आहे त्यानें दुसरे बैलाचे ऐवजी आपले मुलाचे अगर भावाचे मानेवर जू ठेवून काम चालविलें आहे, कोणाचे कुटुंबांत अधिक माणसें आहेत तर त्यांतून एक दोनच शेती कामा करितां गावीं गेलीं आहेत व बाकीचीं मुलखावर पोट भरीत आहेत, कारण गावीं जाऊन खावें काय? कित्येक शेतकरी तीन च्यार महिन्यांत तयार होणारीं हळवी पिकें पहिल्यानें पेरून त्याचें पीक घेऊन नंतर जोंधळा परेण्याचे तजविजींत आहेत. अशा परोपरीच्या त्यांच्या संकटाच्या गोष्टी ऐकून आह्मांस फार वाईट वाटतें. सोलापुरचे पत्रांत लिहिलें आहे कीं पावसानें कोवळें गवत उगवलें तें गुरांच्या तोंडीं लागण्या पूर्वीं माणसेंच खाऊं लागलीं आहेत! अरेरे! ही त्यांची निकृष्ट दशा परमेश्वरानें लवकर संपवावी.व यासालीं त्या प्रांतांतिल लोकांस दसपट पीक द्यावें याकारितां आह्मी त्याची प्रार्थना करितों.

---

**माजिस्त्रेट**— फुल्लर साहेबांच्या [illegible] ड साहेबांच्या नामांकित खटल्यावरून युरोपियन माजिस्त्रेटांत बरीच चुळबूळ चालू झाली आहे. मद्रास इलाख्यांत एका माजिस्त्रेटानें गवरनर इन्कौन्सल यांस विच्यारलें कीं आमचे कित्येक मुकदम्यांत आह्मांस ज्या शंका येतात त्याकरितां आह्मी खुद्द आपणाकडे लिहित जावें कीं काय? त्यावरून इलाख्याचे सरकारानें त्यांस व एकंदर सर्व माजिस्त्रेटांस कळविलें कीं माजिस्त्रेटानें आपले इनसाफाचे कामीं इलाख्याचे सरकारास सल्ला विच्यारावी असें

अकोला [illegible]

[illegible]

हल्लीं आतां तेथें मालकीचा हक्क सांगू लागला आहे व त्या पाठशाळेवर माडीचें काम सभेनें सुरू केलें त्यास हरकत करूं लागला आहे व आमचे ऐकण्यांत आलें आहे कीं देवस्थानावर दिवाणीत दावा लावण्याची त्यानें तयारी करून आमचे एथील रा. रा. लक्ष्मीपति नायडू बारिस्टर यांस २०० रुपये देऊन देवस्थानाविरुद्ध लढण्यास ठरवून ठेविलें आहे. ही मोठी चमत्कारिक गोष्ट आहे. धर्मपरायणबुद्धीनें देवाकरितां लोक पैसे देतात व इमारती बांधितात त्यांचा अभिलाष कोणी संसारी मनुष्य करीत नाहीं, कारण ते शिवनिर्माल्य अतएव अग्राह्य असें शास्त्रानें मानिलेलें असतां, जो संसारी नाहीं, जो विरक्त, व ज्यानें भगवें केलें त्यानें देवस्थानाची काळजी न घ्यावी व त्याविषयीं दावा करावा हें सर्वथैव अयोग्य होय असें आह्मास वाटतें. सबब आमचे बारिस्टर साहेब. त्यास बुद्धिवाद करून ही गोष्ट सरकार दरबारांत नेणार नाहींत असें आह्मी इच्छितों गोसाव्याच्या मालकीविषयीं आह्मास कांहीं ठाऊक नाहीं, व ती कदाचित असली तरी त्यानें आपलें भगव्या वस्त्रांचे बाण्याकरितां तरी इतर लोकांप्रमाणें ती देवास देऊन सत्ता विसर्जन करून घ्यावी. वै आपलें नाव करावें. तेणेंकरून त्यास इहलोकीं व परलोकींही श्रेयस्कार होईल.

---

## वर्तमानसार

गार दौंडाहून नगराकडे चालू असलेल्या रेलवेच्या भराचें काम तेथपर्यंत पुरें झालें व मनमाड बाजूकडे कोपरगावापर्यंत काम चालू आहे. तेथून मनमाड १९ कोस आहे.

आह्मास लिहिण्यास वाईट वाटतें कीं, मिस मेरी कार्पेंटर बाई मरण पावली. या मावलीनें हिंदुस्थानांतील स्त्रियांची सुधारणा होण्याकरितां बहुत खटपट केली. चार वेळां पदरचें खर्चानें हिंदुस्थानांत आली. सभा केल्या, व्याख्यानें दिलीं, मुलींच्या शाळा स्थापल्या, सरकारांतून त्यांस मदत मिळविली व इकडील अडचणी विलायतेस जाऊन चक्रवर्तिनी साहेबांचे कानावर घातल्या. अशी परोपकारी बाई मरण पावली इजबद्दल खरोखरी साऱ्या हिंदुस्थानानें दुःख प्रदर्शित केलें पाहिजे.

पुण्यास सर रिचर्ड टेंपल साहेबांनीं नेटिव लोकांच्या आदर पूर्वक भेटी घेतल्या व सार्वजनिक सभेचें मानपत्र घेतलें.

महामारीवर औषध— एकानें असें लिहिलें आहे कीं कोळशाची वस्त्रगाळ पूड एक चमचा व ३ चमचे ब्रांडी यांचें मिश्रण करून आजाऱ्यास द्यावें ह्मणजे चांगला गुण येतो.

आजपर्यंत मुंबई शहरांत एकंदर वीस इंच पाऊस पडला.

बोरीबंदरच्या याडांत इंजिनाखालीं सांपडून एक मारवाडी मेला.

म्याट्रिक्युलेशन परीक्षा सालाबाद प्रमाणें नोवेंबर महिन्यांत न होतां येत्या सालापासून आक्टोबर महिन्यांत सुरू होणार आहे.

१७ व्या तारखेस अहमदनगर एथें दोन तासांत ६ इंच पाऊस पडला.

लॉर्ड लिटन साहेब आपला हुद्दा सोडण्याची परवानगी मागत आहेत. इं. प्र.

आरब लोकांच्या बायकांचा पहिला नवरा मेला असतां जर त्यांस दुसरा कर्तव्य असेल तर दुसऱ्या लग्नाच्या अदल्या दिवशीं आपल्या नवऱ्याच्या थडग्याजवळ जाऊन त्याबर पाणी शिंपडतात व त्याची प्रार्थना करून तूं माझ्या नवीन होणाऱ्या नवऱ्याचा मत्सर करूं नकोस असें त्यांस सांगतात. अ. द.

जयपुरच्या महाराजांनीं संस्कृतांत निपुण असे पंडित आपल्या तैनातींत ठेविले आहेत व त्यांकडून आपल्या लोकांची खात्री करवितात कीं विधवांचा पुनर्विवाह करण्यास मुळींच अटकाव नाहीं.

बेळगाव एथें भयंकर पटकीचा रोग उद्भवला आहे. सु. प.

---

## नोटिसा

वामनराव गोविंद जमादार दुकान मूर्तिजापुर जिल्हा उमरावती यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, आपण तारीख १६ माहे मे सन १८७७ इसवीची नोटिस उर्दूअखबारांत दिली ती आह्मांस पावली तुमचे नोटिशींत लिहिलें प्रमाणें आह्मांस तुमचें कांहीं एक देणें राहिलें नाहीं. सर्व निकाल झालेला आहे याजबद्दल खुलाशाचा जबाब कोर्टांत देण्यांत येईल. आह्मांस तुह्मी विनाकारण नोटिस दिली त्याजबद्दल आह्मांस उलट नोटिस देणें भाग झालें या नोटिशीचा खर्च व कोर्टांत तुह्मी फिर्याद केल्यास खर्च तुह्मास द्यावा लागेल तुमचे नोटिशींत लिहिलेला बारासे १९०० रुपयांचा दस्तैवज तुमचे जवळ पोकळ राहिला आहे. पुष्कळ वेळ मागितला असून दिला नाहीं. तो दस्तैवज नोटिस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत देऊन निकाल करावा न केल्यास योग्य कोर्टांत दावा केल्यावर खर्चा सह द्यावा लागेल हें आपणास कळावें. तारीख २१ माहे जून सन १८७७ इसवी.

( सही ) मानशिंग वल्लद भोजाजी बरडे निशाणी खुद्द हातची

---

नोटिस

लहानसा वल्लद सोनसा सोनार वस्ती मौजे वानोसें तालुके दर्यापुर यास खालीं सही करणार इजकडून या नोटिशीनें असें कळविण्यांत येतें कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न झाल्यावर थोडे दिवस तूं मजला नांदविलें. नंतर, मजला तूं काढून दिलें ह्या गोष्टीस सुमारें दहा वर्षें होत आलीं. इतक्या दिवसांत मी मजूरी वगैरे करून व बापाचे घरीं राहून दिवस घालविले व कर्ज करूनही निर्वाह करीत आले. असें माझे हाल होत असून तूं ह्या जकडेस नजर न देतां गावोंगाव फिरतोस आणि मजला आपले घरीं नेऊन नांदवीत नाहींस. व माझ्या खाण्याची आणि वस्त्राची तजवीज ठेवीत नाहींस. तूं माझा कायद्या प्रमाणें व धर्माप्रमाणें नवरा असतां माझे असे हाल होतात त्याकडेस तूं बिलकूल पहात नाहींस. ह्याकरितां ही नोटिस देणें मजला भाग झालें आहे तर ह्याचा चांगला विचार कर, आणि मजला वर लिहिल्याप्रमाणें कर्ज झालें आहे ते आदा करून मजला घरीं घेऊन जाऊन लोकरीतिप्रमाणें माझी व्यवस्था कर. असें न करशील तर तुजकडेस धर्माचा आणि कायद्याचाही गुन्हा येईल. आणि त्याबद्दल कायद्या प्रमाणें तुजवर मी तजवीज करीन, ह्यांत चांगलें नाहीं, असें करणें नसल्यास मजला फारकती द्यावी. पंध्रा दिवसांचे आंत वर लिहिल्या प्रमाणें तजवीज न केल्यास तुजला माझी गरज नाहीं असें समजून व पाट करण्याची कायदेशीर तजवीज करून दुसरा नवरा करीन मग तुझा मजवर कोणते ही प्रकारें हक्क रहाणार नाहीं. कळावें तारीख २२ माहे जून सन १८७७ इसवी.

( सही ) रुखमी वल्लद लहानसा सोनार इचे हातची निशाणी.

---

नोटिस.

ती० रा० रा० सखाराम रामकृष्ण कृष्णपक्षी रहाणार दहिहांडे तालुके अकोट यांस गंगाराम चिमणाजी कृष्णपक्षी रहाणार दहिहांडे याजकडून नोटिस देण्यांत येते कीं सुमार १०।११ वर्षांपूर्वी आमचे तीर्थरूप काशी यात्रेस गेले तेव्हां आह्मी अज्ञान असल्यामुळें १००० रुपये रोख व शिवाय जंगम माल तुमचे स्वाधीन करून गेले त्याजबद्दल आह्मापाशीं पुरावा आहे व गावांत साक्षीदारही आहेत. सदर्हू रुपये आह्मी तुह्मास कित्येक वेळ मागितले पण तुह्मी देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही नोटिस पावल्यापासून एक महिन्याचे आंत सदर्हू ऐवज माझे स्वाधीन करावा नाहीं पेक्षां तुह्मावर फिर्याद करणें भाग पडेल व तेणेंकरून कोर्टाचाही खर्च तुह्मास द्यावा लागेल आणि या नोटिशीचा खर्च तुह्मावर बसेल हें खूप समजावें. कळावें तारीख २९ माहे जून सन १८७७ इसवी.

( सही ) गंगाराम चिमणाजी कृष्णपक्षी दस्तुर खुद्द

---

नोटिस

गजंभट बिन व्यंकाभट जोशी रहाणार कसबे पोहन प्रगणे मजकूर तालुके हिंगणघाट जिल्हे वर्धा यांस कान्हू वल्लद गोपाळा भेडाळे माळी रहाणार मौजे निधारें प्रगणें राळेगाव तालुके केळापुर जिल्हे वणी याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुमची वावरें आमचे कडेस मौजे चिखली प्रगणें वडकी तालुके व जिल्हे मजकूर या गानचीं पंध्रा सोळा वर्षांपासून आमच्या वहिवाटीस आहेत, सन १२७६ फसलीपासून २० रुपये दरसाल देण्याचा करार केल्याप्रमाणें सन १२८२ फसली पावेतों दिले आणि हल्लीं ४ वर्षें झालीं वायद्याची रकम भागील कराराप्रमाणें देत असतां तुह्मी घेत नसून पावती देत नाहीं त्यास हल्लीं कळविण्यांत येते कीं तुमची ४ सालाची साऱ्याची रकम रुपये ८० नोटिस दाखल झाल्या तारखेपासून आठ दिवसांत घेऊन जावी आणि पावती द्यावी. असें न केल्यास तुह्मी फिर्याद कराल तर कोर्ट व व्याजाचा वगैरे खर्च मी देणार नाहीं हें खूप समजावें. कळावें तारीख २२ जून सन १८७७ इसवी.

( सही ) कान्हू वल्लद गोपाळा निशाणी हातची रेघ

---

नोटिस.

लटपटसिंग वल्लद बिसनसिंग व रूपी मर्द मानसिंग रहाणार अंदूरें तालुके बाळापूर यांस खालीं सही करणार कळवितों कीं, रामसिंग (लटपटसिंगचा चुलता व रूपीचा बाप) याचे घरावर जप्ती येऊन तें हरास झालें व गिरधरलालनीं घेतलें. त्याजपासून लालसिंग हातेकरानीं घेऊन आह्मास विकत दिलें त्यांत आमची ४ वर्षें असामी असून भाडें आह्मी घेत होतों. नंतर तें घर रिकामें पडलें ह्मणून लल्लूसिंग (लटपटसिंगचा चुलता व रूपीचा भाऊ) यानें आठ चार दिवसांचे बोलीनें उठण्या बसण्यास मागून घेतलें. इतक्यांत तो आजारी होऊन मरण पावला व त्याचे हातचें कुलूप आमचे घरास लाविलें राहिलें तें उघडून देण्याविषयीं तुह्मास दोन चार वेळा ह्मटलें पण तुह्मी उघडित नाहीं करितां ही मुद्दाम नोटिस देतों तर हीं पावल्यापासून ८ दिवसांत आमच्या मकानाचें कुलूप उघडून न्यावें नाहीं तर फिर्याद करूं. कळावें ता. २९ जून १८७७

(सही) लखुलाल भवानीदास दु. अंदुरें दस्तुर खुद्द.

---

## जाहिरात.

## विविधज्ञानविस्तार.

### मासिकपुस्तक.

[कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.]

शास्त्रीयविषय, आरोग्यविषय, भाषा सुधारणा, मनोरंजन, पुस्तकपरीक्षा, सुंदर ग्रंथांचीं भाषांतरें, इतिहास, विख्यात पुरुषांचीं चरित्रें, कविता इत्यादि विषयांचा समावेश करणारें या प्रकारचें, सर्व महाराष्ट्र देशामध्यें हें एकच पुस्तक आहे.

किंमत.

| | रु. आ. |
|---|---|
| वर्षाची आगाऊ ………… | ३—० |
| मागाहून. ……… | ४—८ |
| सहामाही आगाऊ. | २—० |
| किरकोळ अंकास | ०—६ |
| टपालहांशील वर्षाचे. | ०—६ |

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं मुंबईंत काळकादेवीच्या रस्त्यावर देवीसमोरील विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत व्यवस्थापक यांच्या नांवें वर्षाची अगाऊ वर्गणी ( रु. ३ आ. ६ ) सुद्धां पत्र पाठविल्यास पुस्तक चालू होईल.

व्यवस्थापक, विविधज्ञानविस्तार.

☞ मराठ्यांच्या इतिहासाला साधनीभूत अशा आमचे लोकांनीं लिहिलेल्या मराठे व मुसलमान यांच्या राज्याविषयीं जुन्या बखरी छापून प्रसिद्ध करण्याचा आजपर्यंत कोणी यत्न केला नव्हता, त्या आमचे पुस्तकांतून प्रसिद्ध व्हावयास आरंभ झाला आहे; तसेंच नागपुरकर भोसले यांचा निराळा इतिहास अद्याप कोणी लिहिला नाहीं तोही या पुस्तकांत येत आहे. हें पाहून राजेरजवाडे, विशेषतः संस्थानिक व वऱ्हाडप्रांतस्थ लोक याकडे लक्ष देतील अशी उमेद आहे.

---

## विक्रीसतयार.

( सुधारून वाढविलेली तिसरी आवृत्ती )

“ जमाखर्चाची पद्धति ”

( कीर्द खतावणीसहित प्रश्नोत्तर रूपानें )

या पुस्तकाची अगाऊ किंमत साडेससा आणे, भरण्याची मुदत तारीख १९ माहे जुलै सन १८७७ पर्यंत वाढविली आहे. टपाल खर्च दर प्रतीस एक आणा निराळा पडेल ता० १६ माहे मे सन १८७७ इसवी.

वासुदेव बाळकृष्ण लोटलीकर रहाणार रत्नागिरी.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला, रविवार ता० ८ माहे जुलै सन १८७७ इ० अंक २७

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि. वि. आपला माझा परिचय व्हावा एवढा उद्देश मनांत आणून दोन ओळी आपलेकडेस पाठविल्या आहेत त्यांस जागा द्याल अशी आशा आहे.

उमरावती जिल्ह्यापैकीं मोर्शी तालुक्यांत शेंदूरजना हा गाव पूर्वी बडोदे सरकारच्या घराण्यांतील एका गृहस्थानें वसविला. हे गृहस्थ स्वतः शूर व तलवारबहादर असल्या कारणानें चिमणाजी अप्पा भोसले यांजबरोबर बंगाला सर करण्यास जाऊन त्यांनीं बंगाला लुटला. तेव्हां द्रव्यसामग्री फार मिळविली व परत येतांनां या ठिकाणीं राहून हा गाव वसविला, व एथेंच स्थाईक झाले. गढी बांधली ती फारच विस्तीर्ण असून मातीची होती. दोन शें वर्षांवरचा हा गाव असल्या कारणानें गढी फार पुरातन झाली सबब सरकारांनीं तीन वेळा हरास केली, तिचें उत्पन्न अजमास दोन हजारापावेतों झालें असावें, हल्लीं गढीचे जागीं बाजार केला आहे. ह्या गावास दोन नद्या आहेत, पूर्वेस नदीचे किनाऱ्यावर मलकापुर हा गाव आहे, व पश्चिमेस बालापेठ नामें पेठ आहे. एकंदर नद्या दोन— पूर्वेस चंडी व पश्चिमेस शतचंडी. या दोहों नद्यांस पाटस्थळें आहेत सबब बारा महिने पाणी रहात नाहीं. एथून दहा कोसांवर गाइकवाड सरकारानें विहीर व देवालय फारच फार मनोहर व मजबूद बांधलें आहे. फार पुरातन असून हल्लीं त्याची दागदुजीसुद्धां होत नाहीं. बांधतेवेळीं त्यास ५००० रुपये लागले असतील असा अनमास आहे.

भोसले व निजाम सरकार यांचे दरम्यान लढाईचे वेळीं इंग्रज सरकाराकडून फौज आली होती तिचा तळ या गावापासून अर्ध्या मैलावर होता. त्या प्रसंगीं बंदोबस्तास आलेल्या सरदारांपैं मुख्य एथें मेला, व दोन चार सरदार बरेच महत्वाचे मेले त्यासंबंधी मुख्य सरदाराचें देवालय बांधून आंत ओटा केला आहे व त्यावर सरदाराचें नाव खोदलें आहे. पूर्वी या देवळास सरकारांतून मरामतीकरितां पैसा मिळत असे तो आतां मिळत नसल्यामुळें देऊळ सिकस्त झालें आहे.

हा गाव बागाइती असून गूळ वहळेद फार पिकते. माळी लोकांची वस्ती फार आहे, गावास म्युनिसिपाल कमीटी नसल्यामुळें गाव फार गदळ रहातो. सफाईबद्दल सरकारापासून गार्डीरैल व दोन भंगी आहेत खरे परंतु पाटील कुळकर्ण्यांचें काम झालें ह्मणजे गाव साफ झाला असें समजतात. वरिष्ठ अमलदाराची इकडे नजर बरोबर राहूं शकत नाहीं. कारण तालुका फार लांब आहे. कोणी आफिसर वगैरे आल्यास त्यापुर्ती सफाई होते. भंगी लोक मौजेनें पैसा खाऊन चैन मारतात. गावास पाटील आहे तो तर अक्षरशत्रु, पांडे करतील ती पूर्वदीशा. पाटिलकी व पांडेपण एकाचे घरांत, मग काय पाहिलें पाहिजे, सरदार आल्यास पांड्याचा उदय व पाटलाचा अस्त असा मान आहे अशा. थाटामुळेंहा गाव अगदी अव्यवस्थित आहे. हरएक सरकारी कामास मदत बरोबर मिळत नाहीं. मास्तर लोक कुलंच्या करितच आहेत व पोलिस हाका मारितच आहे.

गावांत सरकारानीं दोन शाळा दिल्या परंतु मुलांची संख्या फार कमी आहे. गावचे मानानें अशी संख्या ह्मणजे केवळ खेड्यापाड्यापेक्षांही कमी. मास्तर लोक बिच्चारे रात्रंदिवस पाटील व कुळकर्णी यांस मदत व साह्य करा असें विनवितात. परंतु लक्ष्य देतो कोण? जनाब नवाब साहेब बहादूर अ. क. जिल्हा उमरावती यांची स्वारी मार्च महिन्यांत एथें आली होती. तेव्हां त्यांनीं फीफंडाकरितां पांच रुपये दिले ते कुळकरणी यांणीं खासगी कामीं खर्च केले. चार महिने झाले पैसा दिला नाहीं अशा प्रकारची मदत आहे. एकंदरींत गाव मोठा व लोक सधन असून विद्येची गोडी नाहीं. म्युनिसिप्यालिटीकडे वरिष्ठ अधिकारी नजर देतील अशा प्रकारची तजवीज करणें आपलें कर्तव्य असें समजून विनंती केली त्याप्रमाणें आपण वरिष्ठांस सुचवावें. लोभ करावा हे विनंती.

सेंदुरजणें. तारीख ३० जून १८७७ इ०

सप्तपूडवासी क्ष.

---

मलकापुर ता. २६।६।७७ इसवी

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० खालीं लिहिलेला मजकूर छापून प्रसिद्ध कराल अशी आशा आहे

मृग नक्षत्र लागल्यापासून एथें सांगण्या सारखा पर्जन्य पडला नाहीं. तथ[illegible] आकाश नेहमीं साभ्र असतें, व [illegible] च्या आसमंतांत् प्रदेशाकडे पाहि[illegible] तां तेथें पर्जन्यवृष्टि होत आहे असें दि[illegible] तेव्हां या ठिकाणीं जमीनीला जरी पर्जन्यवृष्टीचा फायदा नाहीं तथापि समंतात् होणाऱ्या वृष्टीच्या योगानें हवेंत आर्द्रता आली आहे. तथापि उष्णता निःशेष गेली नाहीं.

दोन आठवड्यापूर्वी शुक्रवारीं एथील माजी ए. अ. क. बापूजी रंगनाथ यासाठीं हिंदुस्थानी शाळेंत एथील ग्रामस्थांनीं पान सुपारीचा समारंभ केला होता. समारंभास सायंकाळीं प्रारंभ होऊन तो सुमारें आठ वाजतां समाप्त झाला. त्या समयीं सुमारें ३०० लोक हजर होते. मागून दारू काम सुटायाचें होतें या कारणानें समाज फार मोठा जमला होता. ग्रामस्थ मंडळी शिवाय मे. कालिन्स साहेब या तालुक्याचे पोलिस इन्स्पेक्टर हे समारंभास हजर होते. हा समारंभ विशेषें करून एथील वकील मंडळीच्या सूचनेवरून व योजनेनें झाला होता. या मंडळी पैकीं एक रा. रा. दामोदर हरी यांणीं बापू साहेबांच्या सद्गुण, सुस्वभाव निदर्शक असा एक निबंध तयार केला होता तो प्रथमारंभीं सभेपुढें वाचला. तदनंतर एथील मराठी शाळेंतील उमेदवार मास्तर बळवंतराव यांणीं खालीं लिहिलेल्या कविता मोठ्या सुस्वरानें वाचल्या. नंतर बापू साहेबांनीं स्वल्प परंतु सुस्वर भाषणानें झालेल्या कृत्याबद्दल मंडळीचे आभार मानले व आपला संतोष प्रदर्शित केला. मग एक मोठी टाळी होऊन समारंभ समाप्त झाला. मंडळी बाहेर उठून गेल्यावर दारू कामास प्रारंभ होऊन सुमारें १५ मिनिटें पवितों नळे, चंद्रज्योति बाण वगैरे अनेक प्रकारचें दारू काम सुटलें. व हें आटोपल्यावर मंडळी घरोघर गेली.

### कविता

शार्दूलविक्रीडित.

विश्वेशें बहु निर्मिल्या असति हो
कोटी जिवांच्या जगीं
ठेवी तो स्थितिमाजि त्यां विविध त्या
कोणाचि वर्णील गी
कोणी बैसति मंचकीं झुलत हो
कोणास धासासन
कोणी हांसति रोदनास करिती
कोणास घांसास न ॥ १ ॥

दिंडीं

येति कोणी बाहेर कोणि जाती
हर्ष कोणा कोणास दुःख जाती
असा जगतीं अनिवार कारखाना
तया कर्त्या कां शीघ्र ओळखाना २

शा. वि.

केलीं त्वां अमितें सुखें परि तयां
मध्यें न तूळा जया
ऐसें सज्जनसंग एक ह्मणतां
वाटेल कीं लाज या
तैसें दुःख दुजें असह्य कटु नाहीं
तद्वियोगाहुनी
[illegible]आह्मी तुज याचितों ह्मणुनि भों
[illegible]पाहिता पाहुनी ॥ ३ ॥
[illegible]नि आनी दुःख मलिका
[illegible]तसे
[illegible] जाहले विविध त्यां
[illegible]हो तसे
तो बापू [illegible]नी तयां करितसे
ग्रामांतरा; शावका
जैसा बा; न असे उपाय नृपती
आज्ञेपुढें सेवका ॥ ४ ॥

साकी

मलिका कलिका सुकून जाई
जेवीं तपनें जाई;
सती पतीच्या विरहें बाई
किंवा शिशुच्या आई ॥ ५ ॥

शा. वि.

जो या नायकसा पुरीस मलिका
जो मित्रसा साधुनां
जो दुष्टां अरिसा प्रजेस सुखसा
आधींहि तैसा धुना
विद्येला हितबंधुसा सुसखसा
विद्वज्जना हो तसा
बापू तो अमुतें गमे प्रिय; हितूं
तत्स्थान गा होतसा ॥ ६ ॥

साकी.

बसतां राजासनीं शोभे तो
शशधर गगनीं जैसा
दुष्टा यमसा सुखसा सुष्टा
किंवा अन्य निजिसा ॥ ७ ॥

शा. वि.

जो न्यायासनिं बैसतां करि खऱ्या
न्याया स्मरूनी परा
सत्या ठाइच भक्तिनें धरि वरा
सौख्यप्रदा जी नरा
तेणें लोक मुदीत होउनि सदा
वाखाणिती बापुला
ईशा प्रार्थिति ठेविं या अचल ये
थें सारिखा बा पुलां ॥ ८ ॥

साकी

राजहितातें करुनिहि साधी
जो रयतेंचें साध्य
बाध्य नसे कृति कोणा ज्याची
मुरारि ज्या आराध्य ॥ ९ ॥

शा. वि.

भीती ज्या खल फार कीं खलुनि हा
टाकील आह्मा खलीं
कीं ज्याच्या नजरे समोर न जरा
सत्येहि नीं माखलीं
तीं कृत्ये कपटप्रभूत अमुचीं
थारा कधीं पावती
मित्रा देखुनि नेत्रशी बहुत यत्नासार्थ दीपावती ॥ १० ॥

व. ति.

शांती वसे ह्रदयिं उत्तम शीत वारी
कोपानला धरुनि मारि कशींत वारि
जिव्हेस ठाउकि नव्हे अपशद्ब ज्याचा
तो सांग देइल कुणा मधुशद्ब जाचा ११

शा. वि.

जे जाती गृहि त्यांसवें सुवचनें
बोले तयां आदरी,
ज्याची वृत्ति निसर्ग तो निरभिमा-
नी सौम्यही साजरी
सामान्यें नर होति अंध चढतां
मोठ्या पदा कीं धनीं
कीजे काय तया रिपूंनि पर जो
नारायणाराधनी ॥-१२ ॥

दिंडी

आडगावाचें दुरित दूर धांवे
ह्मणुनि बापू सारिखें रत्न पावे
अतां त्याचें नाईल "आड" आडीं
लोप तेजें ध्वांत जैं आडआडीं ।।१३।

शा. वि.

विश्वेशा जन याचितों बहु अह्मी
दीनें स्वरें बा तुला
ठेवीं सौख्यमयीं करंडकिं सदा
तूं आमुच्या बापुला
ठेवीं तूं अपुल्या दयार्द्र नयना
त्याच्या स्वकीयांवरी
दे उत्कर्ष तया चिरायु जगतीं
यांचा नसे या वरी ॥ १४ ॥

चामर

बापुला नमस्कृती सलाम रामराम तो
लीनतायुतें करें करूनि आह्मि याचितों
आजवेरि लोभ दृष्टि भो अह्मावरी जशी
ठेविली कृपाकरा असो सदाच ती तशी
॥ १५ ॥

एक
उत्सुक

---

GREAT INDIAN PENINSU
LA RAILWAY.

## ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेलवे.

NOTICE.

## नोटिस.

CLOSING OF THE KHAM-
GAON STATE RAILWAY.

## खामगाव स्टेटरेलवेची बंदी.

या नोटिसीनें असें जाहीर केलें जातें कीं खामगाव स्टेट रेलवे तारीख १६ माहे मजकूर रोज सोमवार या दिवशीं व त्यापासून पुढें दुसरा हुकूम होईपर्यंत बंद राहील.

याकरितां खामगाव आणि जी. आय. पी. रेलवेचें स्टेशन जलम यांचे दरम्यान तारीख १५ रविवारच्या नंतर आगगाड्या जाणार येणार नाहींत; आणि तारीख १६ रोज सोमवारीं व त्यापुढें या हरदू स्टेशनापुर्त्या व एकंदर सर्व ठिकाणच्या संबंधाच्या माल व मनुष्यें नेण्या पोचाविण्याच्या सर्व नोटिसा, आणि त्याजबद्दलच्या सर्व व्यवस्था जलम आणि खामगाव या पुर्त्या रद्द केल्या आहेत आणि काढून टाकिल्या आहेत.

**हेनरीकांडर**

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई, ९ जुलै १८७७

## नोटिसा

पुंजाई मर्द सुभाना धनगर रहाणार गोहोगाव तालुके मेहेकर इला खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुजकडे आमचे वहीखात्यावरून ५० रुपये घेणें आहेत ते ८ दिवसांत द्यावे. नाहीं तर फिर्याद करून खर्चासुध्धां भरून घेऊं. कळावें. तारीख ६।७।७७ इ.

(सही) दामोदर दिगांबर कावडे
रहाणार डोनगाव नि० खु०

---

नोटिस.

मल्हारी वल्लद येसू तेली इंगळे रहाणार डोंगरगाव तालुके मेहेकर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्माकडे आमचे वहीखात्यावरून घेणें ४९ रुपये आहे तें नोटिस पावल्यां पासून ८ दिवसांत द्यावे नाहीं तर फिर्याद करूं. कळावें ता. ६।७।७७ इ.

( सही ) दामोदर दिगांबर रहाणार
डोनगाव दस्तुर खुद्द

---

नोटिस

रामा वल्लद संभाजी धनगर टवळे रहाणार लोणी तालुके मेहेकर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचेकडे आमचे वहीखात्यावरून ५० रुपये व शिवाय व्याज येणें आहे तें ८ दिवसांत द्यावें नाहीं तर फिर्याद करून घेऊ. कळावें ता. ६।७।६७ इसवी.

( सही ) दामोदर दिगांबर रहाणार
डोनगाव दस्तुर खुद्द

---

नोटिस.

विठोबा वल्लद सदाशिव हडगर रहाणार डोनगाव तालुके मेहेकर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडे आमचे वहीखात्यावरून २५ रुपये घेणें अहेत. ते आठ दिवसांत द्यावे, नाहीं तर फिर्याद करून खर्चासुध्धां रुपये भरून घेऊ कळावें तारीख ६ माहे जुलै सन १८७७ इसवी.

[सही] दामोदर दिगांबर कावडे
रहाणार डोनगाव द० खु०

---

नोटिस.

नारायण भिमराव स्टांप वेंडर रहाणार गायगाव निमकर्दे यास खालीं सही करणार नोटिस देतों कीं तुह्मी मजपासून सुकलाल मोतीलाल याचे नावचा गहाणाचा रोखा रुपये २०० चा विकत तारीख २८ माहे जुलै सन १८७४ इसवी रोजीं घेऊन ते रुपये मजला तुह्मी फिर्याद करून रुपये वसूल केल्यावर देण्याचे कराराचा दस्तैवज लिहून दिला असून त्याप्रमाणें आजपावेतों तुह्मी सुकलाल याजवर फिर्याद केली नाहीं व ती करण्याबाबद तुमचा इरादाही दिसत नाहीं. करितां ह्या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं, आजपासून आठ दिवसांत सुकलाल याजवर फिर्याद करावी न केल्यास आमचे रुपये घेण्याकरितां तुह्मावर दावा. करू मग तुमची रुपये वसूल करण्याची व फिर्याद करण्याची वगैरे कांहींएक सबब ऐकिली जाणार नाहीं. कळावें. ता.७।७।७७ इ.

( सही ) निरंजनसिंग वल्लद गुलाबसिं
ग दस्तुर खुद्द

---

## वऱ्हाडसमाचार

मिति ज्येष्ठ वद्य १२ शके १७९९

## मे० फिटझरलड साहेबांचें प्रयाण.

मेजर जेम्स फिटझरलड साहेब वाशिम चे डेपुटी कमिशनर दोन वर्षांचे रजेवर विलायतेस जाणार ह्मणून त्यांच्या सन्मानार्थ तेथील कांहीं वकील व इतर संभावीत गृहस्थांनीं तारिख ४ जुलै सन १८७७ इसवी रोजीं सायंकाळीं लायब्ररींत त्यांस पान सुपारी देण्याचा समारंभ केला होता. त्यावेळीं क्या. बुलक साहेब, मि. मोफट सा., मि. पोपसा. व मि. अबदुल हक्क सा. तसेच त्रिवर्ग तहशिलदार मि. बाकरअली, मि. शाबासखा व मि. सादतमीरखा. आणि रा. रा. त्रिंबक प्रभाकर आनररी माजिस्ट्रेट उमरखेड, रा. रा. वामनराव बाळाजी डे. ए. इन्स्पेक्टर, रा. रा. पांडुरंग विनायक वकील, रा. रा. लक्ष्मण गोविंद ऋषी हेडमास्तर, रा. रा. शेषरावें वकील, रा. रा. रामराव वकील, रा. रा. परशराम गणेश क्लार्क आफ धि कोर्ट, रा. रा. बाळाजी नाईक दंडे व गावांतील इतर संभावीत व शेट सावकार लोक जमले होते. लायब्ररीच्या तिन्ही बाजूनें ५० हातपर्यंत छानदार रोषनाई केली होती व लायब्ररीचे तिन्ही रस्त्यांचे शेवटास कमानी करून दरवाज्याजवळ अर्ध वर्तुळाकार ताटी बांधून त्यांच्या चोहों बाजूनें चार केळींचे खांब लाविले होते व त्यांवर दिवे वगैरे पुष्कळ लाविले होते. त्यामुळें तें ठिकाण फार शोभिवंत दिसत होतें. लायब्ररीची आंतील बाजूही चांगली सुशोभित केली होती. साहेबांची स्वारी येण्यापूर्वीं चौघडा वाजण्यास सुरुवात झाली होती. ते ६ वाजतां आले. नंतर रा. रा. वामनराव बाळाजी यांनीं साहेबांचे लोकोपयोगी कृत्याविषयीं इंग्रजीत खालीं लिहिलेला लेख वाचिला.

Gentlemen,

You all know why we have assembled here today. We have come together to pay our respects to our esteemed Deputy Commissioner Major Fitz Gerald on the eve of his dipartture to England on two years Furlough. As desired by the inhabitants of the place I will adress a few words to him on this occation.

Dear Sir,

On behalf of all the gentlemen assembled here I beg permission to approach you with sentiments of sorrow and joy—sorrow for the separation which we shall feel hard to suffer, and joy for the pleasur & comfort you will derive by going to your native place. But we cannot suffer you to depart from this District without gratefully acknowledging the several deeds done by you to promote the happiness and welfare of all those placed under your kind care. You have been in this District for the last 7 years during which time the upright and conscientious manner in which you have administered justice and the various improvements you have effected speak highly of the interest you have taken in the affairs of every one of us. Though raised to such a high position you were accessible even to the poorest peasant who could tell you with a free heart all that he wanted and had always the satisfaction of getting his wrongs redressed. Your thorough acquaintance with your duties and the troubles you took to see that every thing was done satisfactorily and justly have baffled all the machinations of desighning men. Your efforts in promoting the cause of education in this backward part of the Province where people are almost indifferent and apathetic have been successful throughout and merit praise; which your zeal in the matter of the improvement of public roads, buildings, and other useful works have made you popular every where and known to the old as well as to the young. They claimed your best attention notwithstanding the onerous duties you had to perform both in Civil and Judicial matters. We are really sorry for your intended departure but we wish you, Sir, a safe journey and pray the Almighty to send you back to this District with renewed strength and energy. A word more and I have done. It would not be out of place if I say here that Government have certainly chosen a worthy successor to you in Captain Bullock who, we are sure, will never make us feel your absence as we know him to be upright and just in his dealings and kind in his disposition.

नंतर रा. रा. लक्ष्मण गोविंद ऋषी यांनीं भाषण केलें तें असें:—

आजचा समारंभ कशा करितां केला आहे हें एथें जमलेल्या सर्व सभासदांस विदितच असेल, तथापि थोडेंसें दिग्दर्शन करावें या हेतूनें चार शब्द बोलून नंतर आमचे लोकप्रिय, लोककल्याणेच्छु, दीर्घदर्शी, व असत्पक्ष द्वेष्टे मेजर जेम्स फिट्झरल्ड साहेब डेपुटी कमिशनर यांचे भावी वियोगजन्य दुःख प्रदर्शक कांहीं बोलणें आहे तें बोलतो.

REGISTERED



साहेब मवसुफ यांनीं पुष्कळ वर्षें अत्यंत मेहनतीनें आपलें कर्तव्य बजाविलें, त्यामुळें प्रकृतीचे ठायीं कांहींसा अस्वस्थपणा वाटूं लागल्यावरून स्वदेशास जाऊन तेथील हितकारक हवेंत कांहीं दिवस वास्तव्य करून प्रकृतीस पूर्ववत उल्हास व हुशारी आणावी या हेतूनें विलायतेस जाण्या करितां रजा घेतली आहे, व आतां त्यांचा व आपणा सर्वांचा थोड्याच दिवसांत वियोग होणार, या करितां सर्वांनीं एकत्र जमून त्यांची भेट घ्यावी व त्यांचा मान सन्मान करावा एतन्निमित्त आजच्या समारंभाचा घाट घातला आहे.

साहेब बहादूर हे बंगाल इलाख्यांतील लश्करी अंमलदार असून त्यांनीं या वऱ्हाडप्रांतांत बहुत वर्षें मोठीं हुद्याचीं कामें केलीं आहेत. एकल्या ह्या वाशीम जिल्ह्याचें सरकारी कामाचें सूत्र त्यांचे हातीं आजकंपेश सहा सात वर्षें सतत आहे. ह्या कालांत ह्यांनीं आपल्या उत्तम व अनुपमेय वर्तणुकीनें आबाल वृद्धांस अति दृढ प्रेम रज्जूनीं बद्ध केलें आहे. साहेब मवसुफ यांनीं देशाची, व लोकांची, त्याचप्रमाणें त्यांच्या रीती भातीची जशी अत्युत्तम माहिती करून घेतली आहे तशी अमलदार लोकांपैकीं फार थोड्या लोकांस असेल. ह्या जिल्ह्यांतील जीं जीं कामें साक्षात अथवा परंपरेनें यांच्या ताब्यांत आहेत त्या सर्व कामांकडे यांचें सारखें लक्ष्य असतें. यांजपाशीं गरिबांची दाद फार लवकर लागते, ह्यामुळें गरीब लोक यांस आपल्या जन्मदात्या पित्याप्रमाणें मानून निःशंकपणें आपलें हृद्गत कळवितात, साहेब बहादुर त्यांजबरोबर चार गोड शब्द बोलिले ह्मणजे त्यांस जो आनंद होतो तो सांगतां पुरवत नाहीं. आणि वास्तविक पाहिलें असतां असेंच आहे. कारण अधिकारी लोक प्रजेशीं इतक्या मनमिळाऊपणानें व लीनतेनें वागणारे विरळा, त्यांत एखाद्या अधिकाऱ्याचा वर्तनक्रम साहेब मवसुफासारखा असला ह्मणजे लोकांचे मनांत त्याजविषयीं प्रेमभाव व पूज्यबुद्धि उत्पन्न होणारच, व त्यांच्याशीं संभाषण केल्यापासून त्यांत आनंद होणारच. प्रजेचे ठायीं आपणाविषयीं पूज्यबुद्धि व प्रेमभाव उत्पन्न करण्याचा जो आमचे डिपुटी कमिशनर साहेबांचे अंगीं गुण आहे तो साहेब बहादुरास मोठा भूषणास्पद आहे. थोर कुळांत उत्पन्न होऊन व लोकांचे नफा नुकसान करण्याचें सामर्थ्य अंगीं असून प्रजेस पोटच्या पोराप्रमाणें मानणारे व त्यांच्या हिताविषयीं रात्रंदिवस आस्था व कळकळ बाळगणारे फार थोडे सांपडतील. अशा पुरुषाचा अल्पक[illegible]ाही वियोग दुःखोत्पादक होतो यांत संशय नाहीं.

आतां साहेब बहादुरांचे कारकीर्दींत कोणकोणतीं सार्वजनिक व लोकोपयोगी कृत्यें झालीं त्यांविषयीं थोडेंसें बोललें पाहिजे. यांचे कारकीर्दींत या वाशीम शहराची फारच सुधारणा झाली. गांवांतून उत्तम प्रकारच्या सडका बांधल्या आहेत. दवाखान्याकरितां सोईवार जागा नव्हती ती आतां हवाशीर ठिकाणीं बांधली आहे. जिल्ह्यांत ज्या ज्या गांवीं शाळागृहांची न्यूनता होती तेथें गावाच्या मगदुराप्रमाणें व शाळेच्या स्थितीप्रमाणें सोईवार शाळागृहें बांधलीं आहेत. ठिकठिकाणीं सडका व पूल बांधून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांस रस्ते सोईकर केले आहेत. अशा पुष्कळच गोष्टी आहेत त्या सर्व सांगूं लागलों असतां फारच विस्तार होईल. सारांश प्रजेस सुखोत्पादक व सोईकर ज्या ज्या गोष्टी आहेत, त्या सर्वांकडे पुरवलें तितकें लक्ष्य पुरविलें आहे. गरीब लोकांकडे डोळा वर उचलून पहाण्यास कोणाचीही छाती होत नाहीं. यांचे अमलांत दुष्ट लोकांस शासन झाल्यावाचून रहात नाहीं. जें स्तुत्य कृत्य करण्याचें यांचे मनांत एक वेळ येतें तें पूर्णतेस नेल्यावांचून यांस चैन पडत नाहीं. अखेरीस इतकेंच सांगणें आहे कीं, आणखी कांहीं दिवस साहेब बहादूर ह्या जिल्ह्यांत रहातील तर ह्याही पेक्षां जास्त सुधारणा होऊन प्रजेचें पुष्कळ कल्याण होईल. साहेब बहादूर आपले प्रिय जन्मभूमीकडे जाण्यास निघाले आहेत तरी त्यांचा प्रवास त्यांस सुखावह होऊन ते स्वदेशीं सुरक्षित पोंचोत, व पुनरपि लवकरच आपणामध्यें परत येवोत अशी सर्व शक्तिमान परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. त्यांचे जागीं कपतान बुलक साहेब बहादुर आले [illegible]ते ही यांचे प्रमाणेंच लोकप्रिय हो[illegible]शी सर्वांस उमेद आहे.

यानंतर साहेब बहादुर यांनीं सर्व सभासदांचे आभार मानून सर्वांस समजण्याकरितां उडदूंत भाषण केलें त्यांतील तात्पर्य येणेंप्रमाणें:—

आह्मांबद्दल डे० इन्स्पेक्टर व हेडमास्तर यांणीं जीं भाषणें केलीं तीं ऐकून आह्मास फार संतोष झाला; परंतु त्यांचे भाषणांत एके ठिकाणीं असें आहे कीं सर्वत्र लोक मोठ्या आनंदात असून आह्मांवर खुष आहेत. याठिकाणीं मात्र वास्तविक स्थितीशी व ह्या उल्लेखाशी विरोधभाव येतो. कसें ह्मणाल तर ह्या जगांत सर्व लोक खुष राखणें फार कठीण आहे. अधिकाऱ्याच्या संबंधानें कोणावर तरी सक्ति होतेच, आणि ज्यांजवर सक्ति होते ते अर्थातच अधिकाऱ्याविषयीं नाखुष होऊन त्यांस दूषण देतात. असे लोकांची संख्या ह्या जिल्ह्यांत बरीच आहे. उदाहरणार्थ ज्या वेळेस आह्मी येथें आलों त्यावेळेस काळीच्या वसुलाचा मोठाच घोटाळा होता. गावच्या कुळांनीं वसूल दिला असून तो सरकारांत भरला गेला नाहीं. या कारणावरून पांडे लोकांवर पुष्कळच सक्ती झाली त्यामुळें ते लोक निःसंशय नाखुष असतील.

आमचे देशांत अशा प्रकारच्या सभा झाल्या ह्मणजे ज्याच्या संबंधानें सभा झाली असेल त्याचे गुण व दोष या दोहोंच्या संबंधानें भाषणें होतात, व दोषाची सुधारणा करण्यास ग्राह्य अशा साधनांची सूचना करितात. तसा प्रकार इकडे दृष्टीस पडत नाहीं. अस्तु. आतां आह्मी आपले स्वदेशास जात आहों, व आह्मी अशी उमेद बाळगतों कीं परत आल्यावर अशाच आनंदानें आह्मी सर्वांच्या भेटी घेऊ, तावत्काल पावेतों तुह्मा सर्वांस परमेश्वर सुरक्षित ठेवो अशी आह्मी मनःपूर्वक इच्छा करितों.

हें झाल्यावर पानसुपारी हार तुरे व अत्तर गुलाब सर्वांस वाटलें व साहेब जाण्याचे वेळीं नळे चंद्रज्योती वगैरे बरीच दारू सोडली.

ता. ५ रोजीं मिस्तर अबदुलहक साहेब यांच्या एथें त्याना मेजवानी झाली. मेजर व मिसिस फिटझरल्ड, क्यापटन व मिसेस बुलक, मिस्तर व मिसिस मे[illegible] स्तार पोप, मेजर वे, वगैरे सर्व सा[illegible] मेजवानीस होते. थाट फार चांगला [illegible] होता. सुरवातीचे वेळीं अबदुलहक साहे[illegible] इंग्रजींत सुरस भाषण केलें व त्याचें मेज[illegible] फिटझरल्ड साहेबांनीं समर्पक उत्तर दिलें आणि उपकार मानिले. तसाच ता. ६ रोजींही मोठा खाना झाला व ता. ७ रोजीं साहेबमहसुफ वाशिमाहून निघाले.

## पोस्टाकडील रजिस्टरें.

टपाल खात्याकडे असा ठराव होण्याविषयीं घाटत आहे कीं, पत्रें रजिस्टर करण्यास हल्लीं च्यार आणे फी घेतात ती या पुढें पांच आणे घेऊन ज्याच्या नावचें रजिस्टर त्याचे सहीची पावती पोस्ट मास्तरानें रजिस्टर करणाराकडे पाठवून देत जावी. असें झाल्यास फार चांगलें होईल. अडाणी लोकांस नोटिसांची वगैरे रजिस्टरें करण्याचें कारण पडतें तेव्हां आमची पावती आली कां ह्मणून विच्यारावयास कित्येक वेळां त्यांस पोस्ट आफिसांत जावें लागतें व तितक्या वेळ त्यांचे खेड्यावरून कित्येक कोस यावें लागते ती त्यांची दगदग या योगेंकरून चुकेल, व रजिस्टराची पावती त्यांचे घरीं चालून येईल हा गरीब गुरिबास मोठा फायदा आहे. त्यांनां आफिसें माहित नसतात, कोणाकडे जावें व कसें विच्यारावें हें माहित नसतें, व रजिस्टर क्लार्क यंग जंटलमन असले ह्मणजे त्यांतून कोणी गरीब गुरिबास धुडकावून देतात व त्रास देतात अशाही गोष्टी ऐकण्यांत आहेत; सबब सदरील प्रकारची नवीन योजलेली तजवीन अमलांत आल्यास या सर्व गैरसोयी आपोआप नाहींशा होतील व रयतेस सुख होईल. आतां पैशाचे दृष्टीनें पाहिलें असतां पांच आणे घेण्याचा विच्यार काढिला आहे याचें कारण काय तें समजत नाहीं. रजिस्टर करणाराचे घरीं पावती पोंचवावयाची तो नवा खर्च येणार ह्मणून अधिक पैसे घ्यावयाचे असतील ह्मणावें तर तें काम अर्ध्या आण्याचें आहे. व तेवढा अर्धा आणा सरकारानें न घेतला तरी चालण्या जोगें आहे असें टपाल खात्याचे जमाखर्चा वरून दिसून येतें. मागें पत्रांचें हाशील कमी करणार ह्मणून पुष्कळ दिवस वार्ता निघाली होती व त्यावरून अर्ध्या आण्याचा पाव आणा होईल असें लोकांस वाटलें होतें पण सरकारानें दर कमी न करितां वजन मात्र वाढविलें ह्मणजे अर्धे आण्यांत तीन मासे वजनाचें पत्र जात होतें तें सहा माशाचें जावें असें केलें. यांत सरकारानें आपली सोय पाहिली; आह्मांस वाटतें कीं, नवीन फेरफारानें अर्ध आण्यास तीन माशाचे सहा मासे केले त्यापेक्षां तीन माशाचें वजन न वाढवितां कमी करून दोन माशाचेंही ठेवते व पाव आणा हाशील घेते तर लोकांची अधिक सोय झाली असती, अस्तु. सरकार पुढें मार्गे फेर बदल करील तेव्हां पाव आणा हाशील करण्याचीही रयतेवर मेहेरबानी करण्यास विसरणार नाहीं अशी आह्मी उमेद बाळगतों.

## वऱ्हाड

[illegible]स साहेब कमिशनर २४ वे [illegible] येणार अशी उमरावती क[illegible] परंतु त्यांचे तिकडील [illegible]ुरवात नाहीं असेंही कोणी [illegible]तात. मग पहावें कोणतें खरें होतें तें.

राव बहादूर नारायण भाई डायरेक्टर सिमल्याहून निघाले. ते काशीस वगैरे जाणार त्याकारितां येथून त्यांचे वडील चिरंजीव उदईक जाणार आहेत.

मे. फिटझरलड साहेब वाशिमाहून विलायतेस जाण्याकरितां जाअ एथें येणार.

मि. राइट साहेब बुलढाण्याचे पोलिस सुपरइंटेंडेंट यांची उमरावतीस नेमणूक झाली व मि. हीथ साहेब यांस बुलढाण्यास नेमिलें त्याप्रमाणें ते काल रोजीं बुलढाण्याकडे गेले.

मेजर बेल साहेब जुडिशियल कमिशनर यांचे या आठवड्यांत सोमवारपासून कालपर्यंत सेशन चाललें होतें. एकंदर पांच मुकद्दमे असून ते सर्व खुनाचे होते. सर्व मुकद्दम्यांत अपराध शाबीद होऊन शिक्षा झाल्या त्यांत दोन कैदीस काळें पाण्याची व बाकी सर्वांस फाशीच्या शिक्षा ठरल्या.

या आठवड्यांत अलीकडे ४ दिवस पाऊस नाहीं. पेरण्यांचे काम झपाट्यानें चालू आहे ह्मणून एक दोन दिवस न पडल्यास चालेल, पण दिवसगतीवर जाण्यानें मेघराजास एथील विसर पडूं नये! मद्रास इलाख्यांत धान्य जाण्याची गडबड असल्यामुळें जोंधळें एथें ५५ रुपये खंडी होते ते ६४।६५ पर्यंत चढले. ईश्वर कृपेनें हा भाव लवकर उतरो.

उमरावतीहून क्या० बुलक साहेब वाशिमास गेले त्यांच्या उमरावतीच्या जागेवर येथून मि० निकोलेटससाहेब जाणार.

इचलकरंजीकर नाटकवाले या आठवड्यांत येथें आले व त्यांचा काल खेळ झाला. हें नाटक नामांकितांत मोडतें त्याप्रमाणें पुष्कळ अंशीं त्याची योग्यता दिसून आली. चातुर्मास्य ह्मणजे पर्जन्यकाळ संपेपर्यंत राहण्याचा त्यांचा मानस आहे. व पांच सात शे रुपये खर्चून त्यांनीं नाटकाच्या जागेची व सामानाची वगैरे चांगली तयारी केली आहे.

## वर्तमानसार

रशियन सरकार १५ कोटि कर्ज काढणार आहे असें कळतें.

हिंदुस्थान सरकारानें ठरविलें आहे कीं सर्वत्र एकसारखें लिहिण्याची वहिवाट रहावी याकरितां चक्रवर्तिनी साहेबांचें नाव लिहितांना "कुइन एम्प्रेस आफ इंडिया" असें लिहित जावें.

पांदेचरी एथील फ्रेंच सरकार आपले टापूंत रेलवे करून साउथइंडियन रेलवेला मिळविणार व त्यासाठीं ६ लक्ष रुपये कर्ज काढणार आहे.

मद्रास सरकारानें ७० लक्ष रुपये धान्य खरेदींत खर्चिले. ७ लक्ष टन धान्य तेथें आलें आहे. तरी अजून साडेतीन लक्ष टन धान्य नवीन उत्पन्न होणारें धान्य तयार होईपर्यंत पाहिजे आहे.

अजमीरच्या युरोपियन लोकांनीं चीफ कमिशनरास अर्ज केला आहे कीं, इंग्लिश न जाणणाऱ्या नेटिव न्यायाधिशापुढें आमचे दिवाणी दावे चालतात त्यामुळें आह्मास फार गैरसोय होते. याकरितां इंग्लिश जाणणाऱ्या न्यायाधिशाकडे आमचे संबंधांतील दिवाणी काम द्यावें. चीफ कमिशनरांनीं सदर्हू गोष्ट कबूल केली.

विलायतेस जुन्या शर्तप्रमाणें एकवीस वर्षांच्या यत्तेची आणखी एक सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा पुढील मार्च महिन्यांत होईल. आणि जुलै महिन्यांत नव्या शर्तीप्रमाणें १९ वर्षांच्या यत्तेची दुसरी परीक्षा होईल असा ठराव झाला आहे.

एकट्या बंगलोर शहरांत अन्नावाचून मेलेल्या मनुष्यांचीं प्रेतें पोलिसानें ३०८ उचललीं असें कळतें. काय हा अनर्थ!

उटाकामंड एथें जाणारें बंगीटपाल सारेच्या सारें चोरानीं लुटिलें.

बिशप काल्डवेल यांनीं हिंदुस्थानांत प्रवास केल्याची हकीकत लिहिली आहे त्या वेळीं त्यांनीं हिंदूची बहुत देवालयें पाहिलीं व लोकांच्या धर्म संबंधी चाली रीती समजून घेतल्या. त्यांचें ते लवकरच एक पुस्तक छापणार आहेत.

विलायतेस शेफीलड एथें वैद्यक संबंधी शस्त्र क्रियेचीं हत्यारें पुष्कळ तयार करण्यांत लोक गढून गेले आहेत व लढाई सुरू झाल्यापासून हें काम वाढलें आहे असें ह्मणतात.

मद्रास इलाख्यांत गव्हाचें पीक फार थोडें होतें व तें फक्त सहा जिल्ह्यांत होतें त्यांचीं नांवें:— कृष्णा, कडापा, बेलारी. कर्नूल, कोइनापुर आणि निळगिरी.

केपचे गवरनर सर बार्टल फ्रियर यांच्या मनांतून पाट बंधाऱ्याचीं कामें तिकडे पुष्कळ सुरू करावयाचीं आहेत व त्याकरितां त्यांनीं मद्रासेहून माहिती मागाविली आहे.

मुंबईच्या गवरनर साहेबाच्या कौन्सलांतील मेंबर आनरबल राजर्स साहेब यांनीं नोकरीचा राजिनामा दिला त्यांचे जागेवर मि० अशबर्नर साहेब यांस नेमिलें.

मक्का ( आरेबिया ) एथील देवालयाचा खजिना तेथील शेरिफानीं तुर्कस्थानचे सुलतानास लागेल तो खर्च करण्यास त्यांचे स्वाधीन केला आहे. ही रकम पयये २०,००.००,००० पायस्ट्रस ( एक प्रकारचें नाणें ) आहे असें कळतें.

ने. ओ.

---

# सरकारी अंमलदारांचे मानाचा अनुक्रम.

हिंदुस्थानांत वारंवार दरबार होतात किंवा कित्येक प्रसंगीं बहुत सरकारी कामदार एकत्र जमतात तेव्हां कोणाचा मान कसा आहे व कोणी कोणचे क्रमानें बसावें याचा नियम सरकारांतून होत असतो त्याप्रमाणें मागें झाला होता त्याची दुरुस्ती हल्लीं विलायतेहून स्टेट सेक्रटरी साहेब यांचे सहीनिशी लिहून आली आहे ती आह्मी आपले वाचकां करितां एथें घेतों.

१ गवरनर जनरल व्हाईसराय

२ मद्रासचे व मुंबईचे गवरनर

३ गवर्नर जन० च्या कोन्सीलचे प्रेसि.

४ बंगाल, वायव्य प्रान्त, अथवा पंजाब एथील लेफटिनेंट गवरनर यांच्या मुलखांत असतील तेव्हां.

५ कम्यांडर इन चीफ, हिंदुस्थान

६ लेफ. ग. बंगाल वायव्यप्रांत पंजाब

७ चीफ जस्टीस बंगाल

८ बिशप, कलकत्ता

९ ग. ज. च्या कौं.चे आर्डीनरी मेंबर

१० मद्रासचे व मुंबईचे कम्यांडर इन चीफ.

११ आरमारावरील कम्यांडर इन चीफ—मुंबई मद्रासचे कम्यांडरपेक्षां अधिक मुदतीचे असतीचे असतील तर.

१२ चीफ जस्टिस मद्रास, मुंबई वायव्यप्रांत

१३ बिशप मद्रासचे व मुंबईचे.

१४ मद्रास व मुंबई कौंसलचे आॅडिनरी मेंबर.

१५ चीफ कमिशनर, हैदराबादचे रेसिडेन्ट, रजपूताना, मध्यहिंदुस्थान व बडोदें एथील गवरनर जनरलचे एजंट.

१६ कलकत्ता, मद्रास, मुंबई व वायव्य प्रांत एथील हायकोर्टाचे प्युनी जडज

१७ मेजर जनरलच्या वरच्या प्रतीचे आफिसर

१८ गवरनर जनरलच्या कायदे कौन्सलचे अडिशनल मेंबर.

१९ हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी

२० सिंधचे कमिशनर

२१ पंजाब चीफ कोर्टाचे जज्ज

२२ मद्रास व मुंबई कायदे कौंन्सलचे अडीशनल मेंबर

२३ मद्रासचे व मुंबईचे चीफ सेक्रेटरी

२४ बंगालच्या ले. गवरनरच्या लेजीस्लेटीव कौंसलेचे मेंबर

२५ युनिव्हर्सिटीचे व्हाइस चान्सेलर फर्स्ट क्लास

२६ एकतीस वर्षांच्या नोकरीचे सिविल सर्विसवाले आणि मेजर जनरल

२७ कलकत्याचे आडवोकेट जनरल.

२८ मद्रासचे व मुंबईचे आडवोकेटज.

२९ मद्रास, बंगाल, वायव्य प्रांत एथील रिविन्यू बोर्डाचे मेंबर व मुंबईचे रिविन्यु आणि कस्टम कमिशनर.

३० फिनान शियल कमिशनर पंजाब

३१ जुडिशियल कमिशनर— व रंगून चे रिकार्ड

३२ हिंदुस्थानचे अकौंटचे कंट्रोलर जनरल.

३३ डिव्हिजनल कमिशनर आपआपले प्रांतामध्यें—रोसिडेंट. पोलिटिकल एजंट आणि सुप्रिन्टेंडेन्ट २००० रुपये किंवा त्याहून अधिक महिना पगाराचे.

३४ सिविल व लष्करी सेक्रेटरी मद्रास व मुंबईचे—आणि सिव्हिल सेक्रेटरी बंगाल वायव्य प्रांत आणि पंजाबचे.

[पुढें चालू]

---

## नोटिस।

विठोबा लक्ष्मण पाटील सावरपाटीकर तालुके बाळापुर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडे आमचे घेणें पुर्ज्यावरून आहे तें आठ दिवसांत द्यावें नाहीं तर फिर्याद करू. कळावें ता. २९।७।७७ इसवी.

( सही ) लखुलाल भवानीदास मारवाडी दस्तुर खुद्द

---

नोटिस. ५

रामजी वलद महादाजी [illegible] व स्ती मुंडगाव तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं आमचे दुकानचे मुद्दल ७१ रुपये व्याज ६० रु. एकूण १३१ रु. पैकीं वसूल ४० रु. बाकी ९१ रुपये राहिले ते आज मितीपासून आठ दिवसांत द्यावे नाहीं तर रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल व या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख ३० माहे जून सन १८७७ इसवी.

( सही ) सिवाराम सिवप्रताप वहिवाटदार बदरीदास दुकान मुंढगाव

---

नोटिस.

चिमणाजी वलद पांडुरंग कलाल रहाणार मौजे वाठोडें प्रगणे वडकी तालुके केळापुर जिल्हा वणी यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचेकडेस मी दरसाल १०० रुपये कंपनी शिवाय खर्च याप्रमाणें वेतनानें नोकर असून तुह्मी मजला कुलमुखत्यारपत्र दिलें आहे. मजला तुमचेकडून दोन वर्षांचा पगार शिवाय करारामाणें खर्च असा घेणें आहे. तो ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत द्यावा न दिल्यास रीती प्रमाणें व्याज लाऊन या नोटिसीच्या खर्चासुद्धां दिवाणी कोर्ट मार्फत वसूल करण्याची तजवीज केली जाईल. कळावें तारीख २२ जून सन १८७७ इसवी.

( सही ) नारायण बाळकृष्ण कुलमुखत्यार दस्तुर खुद्द

---

नोटिस.

किसन वलद नारायण तेली वस्ती मुंडगाव तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मी मी लग्नाची बायको असून तूं मजला नांदवीत नाहींस. हल्लीं १० महिने झाले विनाकारण मजला हाकून दिलें तेव्हांपासून मी आपले बापाचे घरीं रहातें मजला भोजन खर्चाबद्दल दरमहा ५ रुपयेप्रमाणें ५० रुपये खर्च झाला व कापड खर्च ५ रु. एकूण ५५ रु. खर्चाबद्दल नोटिसीचे तारखेपासून आठ दिवसांत आणून द्यावें व मजला घेऊन जावें नाहीं तर रीतीप्रमाणें घेतले जातील व पुढेंही न नेल्यास वरप्रमाणें खर्च द्यावा; नाहीं तर सोडचिठ्ठी द्यावी. कळावें तारीख ३० जून सन १८७७ इसवी.

( सही ) भागी मर्द किसन तेली वस्ती मुंडगाव निशाणी बांगडी

---

नोटिस.

हरीलाल भोलाचंद गुजराथी रहाणार व्याळें तालुके बाळापुर जिल्हा अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचेकडेस आमचे गहूं ६ मण येणें होतें ते घेण्याकरितां गाडी घेऊन आलों असतां तुह्मी गहूं न देतां गाडी अटकविली व माझे अंगावर चालून आले या गोष्टीस हल्लीं तीन महिने होत आले तेव्हांपासून ६ मण गहूं, एक तढव दहा हात्या, व एका बैलाची झूल आणि दोन चऱ्हाटें इतका सामान तुह्मी आटकींत पाडून पाटील मजकुराचे घरीं ठेविला. ह्मणून हल्लीं नोटिस देतों कीं, सदरीं लिहिलेला सामान ही नोटिस पावल्यापासून ४ दिवसांत आमचे एथें पावता करावा नाहीं तर गाडीचें भाडें ३ तीन महिन्याचे दर दिवसाचें एक रुपया प्रमाणें लावून फिर्याद करून सर्व सामान घेतला जाईल. तेणें करून कोर्ट खर्च व या नोटिशीचा खर्च ही तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख ४ माहे जुलै सन १८७७ इसवी.

( सही ) नवलाजी वलद अनाजी ठाकरे वस्ती व्याळें निशाणी खुद्द हातची

---

नोटिस

रामसरण परदेशी सिपाई निजबत बदरुदीन ज्याफरजी कोठेवाले रहाणार अकोलें यास खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमची आमची व्यवहारांत सफै होऊन आमचे रुपये ४ तुह्माकडे फाजील पडले आहेत व आमची पेटी एक सिनगार ऐन्याची रुपये २५ ची घेऊन गेला ती तुह्मी देत नाहीं व एक पावती रुपये ३० उमरावतीची देत नाहीं तर ही नोटिस पावल्या पासून ४ दिवसांत आणून द्यावी नाहीं तर तुह्मावर फिर्याद करून घेऊं व या नोटिसीचाही खर्च तुह्मांस द्यावा लागेल. तारीख ५।७।७७

( सही ) बालकदास वलद भागचंदास बैरागी निशाणी खुद्द हातची.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED

# वऱ्हाडसमाचार

पुस्तक [illegible] अकोला, [illegible] जुलै [illegible]

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन [illegible]दार होऊं इच्छिणारे लोकांकडून [illegible] पावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिस.

नोटिस—शिवराम वल्लद लक्ष्मण पाटील डोल[illegible] र्फ भोटें तालुके खामगाव यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, आमचें घरगढींत असून त्या घरापुढें आंगण दक्षिणेकडील ही जागा तुह्मी राघोजी वल्लद जानजी गोसावी याजकडून सदर्हू जागा तुह्मी खरीदी घेतली आहे. व ह्या जागेवर वडिलोपार्जित अजमास दोनशें वर्षांपासून त्या ठिकाणीं राघोजीचें घर कधींच पाहिलें नाहीं व गावांतील चार भलीं मानसें व गावाभोंवतींचे सिवभाऊ यांजलाही माहित आहे कीं, राघोजी ह्या जागेवर कधीं नांदला नाहीं. असें असून तुह्मी ही आमची जागा बिरादरीच्या अदावतीमुळें राघोजीस फरेब देऊन आपण स्वतः खरीदी घेतली त्यावरून आपणास कळविण्यांत येतें कीं जर सदर्हू खरीदखतावरून आपण ह्या जागेवर दावा कराल तर चालणार नाहीं. कारण तो कधींच या जागेवर राहिला नाहीं आणि माझी जागा तुह्मी खरीदी घेतली याजबद्दल आपण पंध्रा दिवसांचे आंत जबाब द्यावा. नाहीं तर रीतीप्रमाणें तजवीज करीन. कळावें. तारीख ११ माहे जुलै सन १८[illegible]

(सही) रंभाजी वल्लद दिनाजी पाटील मौजे डोलरखेडी ता० खामगाव नि० खु. हातची

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार [illegible]

[illegible] आहेत त्या[illegible] आपल्या [illegible] राल अशी आशा आहे.

कसबे चांदूर तालुके मल[illegible] बुलढाणें हा गाव वस्तीस बराच [illegible] असून रेलवे स्टेशन आहे. व या गावीं शाळागृहही आहे. शाळेंत मुलें ७९ पर्यंत आहेत. मुलांचा अभ्यास वगैरे चांगला आहे. हल्लीं नवीन मास्तर आलेले आहेत हे फार मेहेनती आहेत असें दिसून येतें. या योगानें हल्लीं शाळा फार उत्तम प्रकारची चाललेली आहे तेणेंकरून आह्मी फार खुश होऊन तारीख १९ माहे जून सन १८७७ इसवी रोजीं शाळेंत गेलों होतों तेव्हां शाळेचे उपयोगाकरितां एक घड्याळ किंमत रुपये १६ चें व तास वाजविण्याचे किंमत रुपये ६ चे आणि मुलांस बक्षिशीकरितां २ रुपये दिले ती गोष्ट आपले पत्रीं प्रसिद्ध व्हावी.

लोकांनीं वर्गणी दिली त्यांत रा. रा. माधवराव काशीनाथ देशपांडे यांणीं ३ रुपये; रा. रा. देवराव मोरेश्वर देशपांडे, रा. रा. गंभीरराव कृष्ण देशमुख व रा. रा. किसन बापूजी इंगळे या विवर्गांनीं दोन दोन रुपये; दहाजणांनीं एकेक रुपया आणि दहाजणांनीं आठ आठ आणे दिले.

या आठवड्यांत उष्णता फार होती परंतु तारीख २८ पासून पर्जन्यवृष्टी होऊं लागली आहे. कळावे तारीख २९ जून १८७७

श्रीकृष्ण देवराव देशपांडे

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळींस येत्या अंकीं आपले सुंदर पत्रीं जागा मिळेल अशी आशा बाळगून हे पत्र लिहिलें आहे.

जामोद हा गांव आपल्या वाचकांस माहितच आहे. या गांवीं महादेवाचें देवालय आहे त्याला बेंबळा ह्मणतात. हे संस्थान फार रमणीय असून पाण्याचें तर अति सुख. असें देवालय इतक्या आसमंतांत नाहीं ह्मटलें तरी चालेल. हा गांव जळगाव तालुक्याखालीं असून तेथील पेशकार रा. रा. गंगाराम बापूजी हे कांहीं सरकारी कामाकरितां तारीख १ माहे मीनहू रोजीं कसबे मजकुरीं आले होते. त्यांणीं एथील देवालयाची अव्यवस्था पाहून गांवकरी चार सभावीत गृहस्थ व शेट सावकार असे जमवून सभा केली. त्या सभेंत अकरा मनुष्य मुख्य—मेंबर १० व अध्यक्ष १, असे नेमिले. या नंतर पेशकार साहेब यांणीं वर्गणीची याद केली त्यांत १०२ रुपये जमा झाले. ते पहा तीन तासांचे आंत सर्व रुपये रोख नगदी जमले. ते रुपये एका सावकाराचे जिम्मेस ठेविले. आणि असें ठरविलें कीं, सदर्हू जमलेले रुपयांचे एक किंवा दोन शेतें विकत घेऊन ती शेती नफ्यानीं लाऊन काढावी त्याचे नफ्याचे रुपये येतील त्याजवर एक म[illegible]

[illegible] त संशय [illegible]

एथे हिवरखे[illegible] वा गोसावी हे आले आ[illegible] त दोन तीन नकला सांगाव्याचे [illegible] चा प्रघात आहे. हल्लीं त्यांची माळ सुरू असून पुढें कांहीं दिवस होईल अशी उमेद आहे. कीर्तन साधारण प्राकृत चांगलें करितात. पत्र विस्तारास्तव पुरें करितों कळावें तारीख ७ माहे जुलै सन १८७७ इसवी.

एक
जामोदकर.

वाशिम तारीख ९ जुलै सन १८७७

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. एथें बराच पाऊस पडून पेरे चालू आहेत. आज दोन दिवस मात्र बिलकूल पाऊस नाहीं, ऊष्मा होत असतो.

काल रोजीं लायब्ररींत माजी डि० क० साहेब यांस पान सुपारीचा समारंभ झाला त्या प्रसंगीं रा. रा. वामनराव बाळाजी यांनीं इंग्रजींत साहेबांचे स्तुतीपर लहानसा निबंध वाचला तो चांगला सरळ भाषेंत असून साहेब लोकांस फारच मान्य झाला; नंतर मराठींत कोणी ऋषि या आडनावाचे हेड मास्तरांनीं कांहींसें चाचकत् चाचकत् भाषण केलें तें कोणास बहुतकरून समजलेंही नाहीं. त्यांणीं लिहून आणिलेला कागद जर वाचला असता तर त्यांच्या विद्वत्तेचें वजन चांगलें राहिलें असतें. त्यांच्या ह्या हयगयीमुळें इतर अंमलदारांस व साहेब लोकांस त्यांच्या विषयीं थोडासा कमीपणा दृष्टोत्पत्तीस आला. हरएक इसमानें आपला सभाधीटपणा प्रत्यक्ष अजमावून पाहिल्या शिवाय अशा कामास हिय्या करूं नये हें चांगलें असें मी त्यांच्या हितार्थ सुचवितों.

या समारंभास चिराकदान व रोषनाई केली होती परंतु दिवस असतां समारंभ झाल्यानें त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

आह्मी साहेब यांस अल्प काळाचे माहितीवरून असें सुचवितों कीं, फक्त काळीवरच श्रम करून निर्वाह करणारे जे कुणबी लोक जे अगदी साधे व भोळे आहेत त्यांनां कावेबाजी मुदल माहित नाहीं. शुद्ध मजूरीवर निर्वाह करणारे अशा लोकांस साहेबांचे सत्तेखालीं निर्विवाद सुख मिळेल. यांतच साहेबांचे कर्तव्यकर्म बजावलें गेलें ही केवळ ईश्वरसाक्ष गोष्ट आहे.

आतां वाशिमचे मंडळीस आमची अशी विनंती आहे कीं, त्यांणीं अशा कामाविषयीं पुढें सभा भरविणें झाल्यास कोणत्याही

[illegible]

एक
वऱ्हाडी

बुलढाणें—ता[illegible]

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. आपला तारीख १ जुलै सन १८७७ इसवीचा अंक आमचे पहाण्यांत आला त्यांत वे. शा. सं. रा. रा. रंगाचार्य उदगीरकर ज्योतिषी आले होते त्यांहीं माघ शुध्ध १९ मेस चंद्रगृहण आहे ह्मणोन सांगितलें त्याबद्दल फत्तेखेलडें एथील लोचन सुकूल चीफ कान्स्टेबल हे ज्योतिषी असले कारणानें तेही याचा तपास करीत आहेत ह्मणोन वगैरे लिहिलें आहे. त्यास मशारनिल्हे रंगाचार्य यांहीं सदर मितीस चंद्रग्रहण असल्याचें सांगितल्याबद्दल आह्मास वर माहित नाहीं परंतु याबद्दल लोचन सुकूल चीफ कान्स्टेबल फत्तेखेलडें यांचें आह्मास पत्र आल्यांत या चंद्रग्रहणाबद्दल त्यांहीं स्वतः मेहेनत घेऊन तपास केल्यांत ते असें कळवितात कीं, ग्रहलाघव ग्रंथाच्या आधारावरून संवत् १९३४ शके १७९९ माघ शुध्ध १५ रविवारीं सदरीं चंद्रग्रहण स्थापन केलें आहे. त्याचा प्रकार—दिवसा घटि २४ पळें १९ यांत चंद्रास राहूचा स्पर्श होणार नंतर ३१ घटी १२ पळें यांत ग्रहणाचा मोक्ष होणार. चंद्रबिंब ११ अंगुल ग्रास अंगुल १० दीनमान घटी २९ पळें २८ या प्रमाणें खचीत आहे आणि हें ग्रहण चंद्रोदयीं सूक्ष्मदृष्टीनें पाहिलें असतां नजरेस येईल यांत संशय नाहीं. या प्रमाणें त्यांचें आलेल्या पत्रांत मजकूर आहे. तो प्रसिद्ध होण्यास आपणाकडे पाठविला आहे.

आतां ही गोष्ट सदर्हू दिवशीं जरी सूक्ष्म दृष्टीनें नजरेस आली तरी या प्रांतांत आमचे लोचन सुकूल सारखे विद्वान् थोडेच आढळतील. किंबहुना नाहींत ह्मटलें तरी चालेल. तशांतून त्यांनीं आपले नोकरीचें काम सांभाळून या गोष्टीचा तपास केला यांत त्यांची तारीफ करणें रास्त आहे. आतां मुंबईतही पुष्कळ शास्त्री लोकांनीं पंचांगें तयार केलीं व तीं दशोदेशीं विक्रीकरितां बाजारांत बसलेलीं आढळतात. परंतु त्यांत कोठें या चंद्रग्रहणाचा प्रकार दर्शविला नाहीं. मग हें सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां कळेल ह्मणून आमचे लोचन सुकूल चीफ कान्स्टेबल लि

हितात कीं, त्यांतून त्या शास्त्रयांचें मत असें कांहीं असेल कीं, साधारण सर्व जणांस उघडपणें जीं दिसोन येतील अशींच ग्रहणें प्रसिध्ध करण्याचीं कीं काय ? कोण जाणें. याबद्दल आपले पत्रद्वारें त्यांस सूचना होईलच. कळावें

एक वाचक.

---

नोटिस.

पन्नाबाई भ्रतार भगूलाल ताराचंद दुकान अकोलें यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येतें ऐशी जे, नरसिंगराव मुनशी मयत आमचा बाप यानें तारीख १८ माहे मे सन १८७२ इसवी रोजीं तुह्माजवळ रुपये ४७०० कलदार याचे तोडे २ तरटाचे भरून अमानत तुमचे दुकानीं ठेविलेले ते तुमचेकडे परत मागत असतां देत नाहीं. व नीटरीतीनें जबाबही सांगत नाहीं. यास्तव या नोटिसीनें कळवितों कीं, नोटिस पावल्यापासून पंध्रा दिवसांत, वर लिहिलेले आमचे तीर्थरूपानीं अमानत ठेविलेले रुपये परत द्यावे. न दिल्यास अवल तारखेपासून दरमहा दरशेकडा ०१२ प्रमाणें व्याजसुद्धां लाऊन कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल मग मुद्दल, व्याज व खर्चसुद्धां तुह्मास द्यावें लागेल कळावें ता० १३ जुलै सन १८७७ इसवी.

( सही ) गोपाळराव नृसिंव्हराव व कृष्णराव नृसिंव्हराव अज्ञान पालन करणार मातोश्री गयाबाई निशाणी नांगडी

---

नोटिस.

मिस्तर पुरुषोत्तम डाक्टर अकोला यांस खालीं सही करणार नोटिस देतों कीं पोपटलाल याचीं घरें अकोलें येथें आहेत त्याची संमती न घेतां तुह्मास जागेची त्या वेळेस अडचण होती ह्मणून च्यार रोज सामान ठेवण्यास जागा दिली तें घर खालीं करून द्यावें असें मी च्यार वेळा सांगितलें व खुद्द दुकानचे मालक पोपटलाल यांणींही सांगितलें कीं, भाड्यानें घर द्यावयाचें नाहीं. त्याप्रमाणें तुह्मी कबूल केलें कीं, मी दोन दिवसांत घर खालीं करून देतों परंतु त्यासही पंध्रा दिवस झाले. तर आतां कळविलें जातें कीं नोटिस पावल्या पासून च्यार रोजांत घर खाली करून द्यावें न केल्यास पोपटलाल परशराम याचा गल्ला बाजारांत पडला आहे त्यास ठेवण्यास दुसरी जागा नाहीं तो माल खराब झाल्यामुळें जी नुकसानी होईल ती तुमचेपासून घेतली जाईल. व राहिले तारखे पासून दरमहा दहा रुपये प्रमाणें भाडें घेतले जाईल कळावें तारीख १४ माहे जुलै सन १८७७ इसवी.

( सही ) सखाराम गोविंद दस्तुर खुद्द.

---

## वसूल

| | रुपये |
|---|---|
| मेसर्स नरसिंव्ह आणि बाळाराम | ६०८ |
| रा. रा. नथुसिंग चीफ कान्स्टेबल | ८ |
| ,, ,, नारो रघुनाथ मोहोळकर | ६ |
| ,, ,, बळीराम तुकाराम मास्तर | १०१० |
| ,, ,, विष्णु आत्माराम अ. मास्तर | ५ |
| ,, ,, परशराम श्रीधर चितळे | ६०८ |
| ,, ,, खुशालराव विठ्ठल वकील | २२०११ |
| ,, ,, रावजी घनःशाम वकील | १० |
| ,, ,, केशव महादेव वकील | १३०४ |
| ,, ,, गोविंद विठ्ठल लेले मास्तर | ६०८ |
| ,, ,, पांडू इंद्रभान पाटील | ३ |
| ,, ,, वामन लक्ष्मण वकील | १७ |

---

# वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ शुध्ध ५ शके १७९९

---

तारीख १ माहे जुलैचे आमचे पत्रांत " बिरार " अशा सदराचा एक इंग्रेजी भाषेंत निबंध छापून प्रसिध्ध झाला आहे तो आमचा नव्हता, व तो ज्या एका मित्रानीं आह्माकडे पाठविला त्यांचे त्यांतील कांहीं कांहीं विच्यार आम्हास संमत नव्हते. म्हणून "कम्युनिकेटेड" असें त्यावर लिहावयास पाहिजे होतें तें विस्मृतीनें राहिल्यामुळें पत्राची व्यवस्था पहाणारांनीं त्याला आद्यस्थान दिलें व त्यावरून आमचे स्वतःचे हमेशाचे विच्यारांत हल्लीं फरक पडला अशी लोकांची समजूत झाली. पण तसा प्रकार कांहीं नाहीं, केवळ नजरचुकीनें तशी गोष्ट झाली आहे हें आम्ही सर्वांस कळवितों.

---

## स्वदेशीय मालाविषयीं उद्योग

हल्लीं चोहोकडे युरोपियन जिनसांचा सुकाळ झाला आहे व त्यामुळें स्वदेशीय कारागिरी केवळ मोडकळीस आली आहे. आपले देशांत तऱ्हे तऱ्हेचा माल उत्पन्न होत नाहीं व त्याचा खप नाहीं, ही गोष्ट स्वदेशाच्या उत्कर्षास फार वाईट आहे असें मनांत आणून अमदाबादचे कांहीं मंडळीनीं विशेष खटपट चालविली आहे व तिजविषयीं त्यानीं एक प्रसिध्धीपत्र बाहेर काढिलें आहे. या मंडळीच्या उद्योगास सर्व प्रकारें यश येवो असें आह्मी इच्छितों. त्यांनीं जी मंडळी स्थापन केली आहे तिचें नाव " स्वदेशीय कलाकौशल्य व उद्योग यांचें पुनर्जीवन व त्यांस उत्तेजन देण्याकरितां झटणारी मंडळी " असें आहे हें त्यांस मोठें भूषणावह आहे. आह्मी त्या मंडळीच्या पत्रांतील हाशील आपले वाचकांकारितां येथें घेतों.

कित्येक देशहितेच्छु लोकांच्या प्रयत्नानें अमदाबादेस स्वदेशीय कलाकौशल्य व उद्योग यांचें पुनर्जीवन व यांस उत्तेजन देण्याकरितां झटणारी मंडळी स्थापन झाली आहे. तिचें प्रथमतः १०००० रुपये भांडवल असावें व त्याचे भाग ४०० असून दरएक २५ रुपयांचा असावा असा संकेत आहे. जे पदार्थ आपले देशांत पूर्वी उत्पन्न होत असून फायद्यानें विकले जात होते पण त्यांच्या बदला आतां विलायतेहून आलेले तसले पदार्थ स्वस्त दरानें विकत मिळूं लागल्यामुळें जे अजीबाद मागें पडले ते पदार्थ विकीत जावे असा या मंडळीचा उद्देश आहे. तसेच नवीन उद्योगानें व नवीन कल्पनेनें कोणी कांहीं स्वदेशीय पदार्थ तयार केले तर ते विक्रीस ठेवण्यास ही मंडळी तयार आहे. त्यांच्या किमती मात्र इतक्या माफक असाव्या कीं ते घेण्याविषयीं लोकांस उत्साह रहावा. पोलिटिकलएकानमी या शास्त्राच्या धोरणानें आपण चाललों तरच आपले कामाची फत्ते होणार आहे.

विलायती यंत्रें जीं वाफेशिवाय हातानीं चालविलीं जातात तीं आपले देशांत पुष्कळ व्हावीं व त्यापासून सुबक व स्वस्त पदार्थ उत्पन्न व्हावे अशीही या मंडळीची इच्छा आहे. युरोप व अमेरिका खंडापेक्षां मजुरी आपले देशांत पुष्कळ स्वस्त आहे सबब फार खर्च न येतां त्यापासून आपणास फायदा होईल यांत संशय नाहीं.

ही गोष्ट सिध्धीस जाण्याकारितां हिंदुस्थानांतिल मोठमोठ्या शहरांतिल देशहितेच्छु लोक तसेच संस्थानिक लोक यांचें सहाय व ऐक्य अवश्य पाहिजे. यांत राजकारण कांहीं नाहीं यास्तव राजे लोकांनीं व ब्रिटिश आफिसरांनीं देखील सहाय करण्यास कांहीं हरकत नाहीं व उदार मनाचे दयाळू लोक तसें सहाय करितील अशी उमेद आहे.

दुसरे कोणते शहरांत अशी मंडळी या पूर्वींच स्थापन झालेली असेल तर तिच्याशीं ही मंडळी सख्य संकेतानें रहाण्यास उत्सुक आहे. तिनें अमदाबादच्या मंडळीचे सेक्रेटरी मि. खुशालदास गोकुळदास यांस कळवावें ह्मणजे बदल्यांत इकडील हरएक माल तिकडे व तिकडचा इकडे नेण्या आणविण्याची तजवीज केली जाईल. व त्याजविषयींचे नियम कळविले जातील.

गुजराथी, इग्रजी, हिंदी, व मराठी या पैकीं कोणत्याही भाषेंत पत्रव्यवहार ठेवला असतां चालेल. मराठी भाषेंतील पत्रें बाळबोध लिहावीं.

जर अशी मंडळी अजून कोठें स्थापन झाली नसेल तर आपले देशांतील उद्योगाचा ऱ्हास होत चालला आहे हें मनांत आणून लवकर या मंडळीची स्थापना करावी. उशीर करण्यास आतां अवकाश राहिला नाहीं. दीर्घकालमर्याद आपण झोंप घेतली तितकी पुरे झाली. आपल्या देशाचें दारिद्र्यापासून व नाशापासून संरक्षण करावयाचें असलें तर आतां आपण सत्वर उद्योगास लागलें पाहिजे. इलाख्याचे राजधान्यांतून, मोठाल्या शहरांतून, व नेटिव संस्थानांतून कांहीं संपत्ती दृष्टीस पडते पण तो भासात्मक देखावा होय. संपत्तिमान पुरुष प्रस्तुत बरेच अर्थहीन झाले आहेत व सर्वांत त्यांची संख्या कमी होत चालली आहे. मध्यम प्रतीचे लोक अधिक दरिद्री होत चालले आहेत आणि हिंदुस्थानच्या बहुत लोकांच्या दारीं दारिद्र्य डोकावीत आहे. निरुद्योग वाढत चालला आहे. पुष्कळ कारागिरांचीं निर्वाहाचीं साधनें नाहींशीं झालीं आहेत व बाकीचे तर नाशाचे फेऱ्यांत आले आहेत याचें मुख्य कारण युरोपांतील व अमेरिकेंतील यांत्रिक उद्योगाची भरभराट होय. मागील काळीं उद्योगाचे संबंधानें आपला हिंदुस्थान देश साऱ्या पृथ्वीचा मुकुटमणी होता, आणि हल्लीं त्याची स्थिति किती दीन दुबळी झाली आहे, तर आतां वेळ लावूं नये. व आपली यांत्रिक विद्या मरणावस्थेस पोंचत चालली आहे. तिला माघारीं आणण्याचे कामीं व शेतकीची सुधारणा करण्याचे कामीं प्रयत्न करण्यास बिलकूल कसर करूं नये. ज्यांस या गोष्टी समजतात व ज्यांच्या ह्रदयांत देशाभिमानाचें बीज आहे ते या गोष्टीचें महत्व जाणतील व या कामास सहाय करितील सबब सर्वत्र हा उद्योग व्हावा अशी इच्छा आहे.

या कामाकरितां प्रत्येक मनुष्याचा खालीं लिहिलेप्रमाणें करार असावा अशी इच्छा आहे.

मी आपले स्वतांकारितां व कुटुंबाकारितां मिळतील तोंपर्यंत परदेशीय वस्तु न वापरतां स्वदेशीय वस्तु वापरीन, मग त्या थोड्या महाग व वेगळ्यापरीच्या असल्या तरी चिंता नाहीं.

याप्रमाणें शेवटीं सूचना करून अमदाबादची मंडळी सर्व लोकांस शिफारस करिते कीं तुह्मी सर्वांनीं असा किंवा अशाच प्रकारचा जरूरीप्रमाणें निग्रह करावा. आतां याविषयीं आणखी विशेष लिहिण्यास आह्मांस स्थलावकाश नाहीं पण देशाचे हितचिंतकांनीं सर्वत्र हा उद्योग चालू करावा व अमदाबादच्या मंडळीसही मदत करावी अशी आमची त्यांस विनंती आहे.

---

## बीरमंत्र व जादू.

उपदेष्टे पुरुष वारंवार लोकांस बोध करितात कीं, मंत्रावर व जादूवर भरंवसा ठेवूं नये व नवीन इंग्लिश विद्येच्या प्रभावानें तशा गोष्टीवरील श्रध्धा दिवसानुदिवस कमी होत चालली आहे. तरी अशा विद्वानांचा समुदाय राष्ट्रांतील एकंदर लोकसंख्येशीं पहातां फार थोडा आहे म्हणजे अज्ञानांधकारांत अजून सहस्त्रावधि लोक आहेत व कित्येक असे आहेत कीं, त्यांस सत्याच्या उजेडांत येण्याविषयीं बोध केला तरी ठसत नाहीं. व दुराग्रहाची ऊब घेऊन ते पूर्व स्थिति सोडूं इच्छित नाहींत. मग ढोंगी, भोंदू, व अपमतलबी अशा लोकांचें फार जमतें. ते त्यांच्या तशा मनोवृत्तीचा फायदा घेऊन हजारों लोकांस हजारों ठिकाणीं फसवितात ही आश्चर्याची व दुःखाची गोष्ट आहे!

मंत्र, जादू, टाणेटोणे हे अशा प्रकारचे लोकांस फसविण्याचे लबाडीचे धंदे आहेत. व ते अशा बेताबातानें उपयोगांत आणिले जातात कीं सहजवृत्त्या पहाणारे सामान्य पुरुषांची अक्कल त्यांत गुंग होऊन जाते व दैवीक कल्पना त्या प्रवर्तकाचे ठायीं तो कल्पितो हें मोठमोठ्यांचे अनुभवास आलें आहे. खरोखरी पहातां मंत्र व

जादू हा केवळ भ्रम आहे त्यापासून कोणी फसूं नये व त्याच्या नादीं लागूं नये, लागल्यास त्यांत खरें काय आहे याचा शोध करण्याच्या बुद्धीनें लागलें तर वाईट नाहीं आणि धूर्तपणानें व विवेचक बुद्धीनें चांगला बारीक तपास केल्यास मांत्रिकांची व जादूगिऱ्यांची लबाडी उघडकीस येण्यास अवकाश लागत नाहीं. ज्यांना या गोष्टीचा विच्यारच करावयाचा नाहीं त्यांस आमचें कांहीं सांगणें नाहीं. व [?]सते बालबुद्धीचे लोक आहेत त्यांस गारुडी खड्याचा रुपया करितो, मडक्यांत पाणी पुन्हा पुन्हा आणतो, आंब्याचें वीतभर झाड पांच मिनिटांत खडकावर उत्पन्न करून त्यास फळें ही दाखवितो याही गोष्टी खऱ्या वाटतील यांत नवल नाहीं. व त्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें दक्षिणदेशीं पोरें सोरेंही समजत असतां आमच्या वऱ्हाडांत गारुड्यांचा खेळ चालला असतां त्याच्या भोंवतीं मोठी दाटी असते तेव्हां हें अज्ञान जाण्यास अजून बराच काळ पाहिजे. तरी असें ह्मणून स्वस्थ बसतां उपयोगी नाहीं. मंत्री व जादुवाले ह्मणविणारांची लबाडी वेळोवेळीं लोकांच्या नजरेस आणिलीच पाहिजे. कोणी कोणी आपणास लोकांनीं साधू किंवा वरदी ह्मणावें व दुनिया झुकवावी ह्मणून अशाच प्रकारच्या लबाड्या करून भोळे भाविकांस फसवितात व हेंही उद्योगी पुरुष वेळोवेळीं लोकांस उघड करून सांगतात तेणेंकरून कित्येकांस गुण येतो आणि कित्येक आपलें मूर्खपण झाकण्याकरितां तशा उद्योगी पुरुषांची टवाळी करीत असतात तरी लबाड्या बाहेर काढून देशसुधारणा करावी हाच ज्यांचा उद्देश ते अशास भीत नाहींत. मेहेकरचे बाळनाथबुवा व मूर्तिजापुरचे मारुती बुवा यांच्या ढोंग धतुऱ्याची फट फजीती करते वेळीं पुष्कळ लोकांनीं आह्मांस धाक घातला कीं, ते देवतेच्या प्रसादानें व मांत्रिक शक्तीनें आह्मांस दुर्धर संकटांत पाडतील; खुद्द उभयता बुवानींही आपले महाभक्तांजवळ तीन दिवसांत आमचा प्राण नाश होईल असेंही भाकीत सांगितलें होतें. त्या गोष्टींची आमचे वाचकांस आठवण असेल. मुदलांतच गोष्ट खोटी होती ह्मणून तिचा खोटसाळपणा बाहेर काढण्यांत आह्मांस कांहीं शंका वाटली नाहीं व बायकांच्या बोटे मोडण्याप्रमाणें त्यांच्या शिव्या शापास आह्मी भ्यालों नाहीं. अस्तु. या गोष्टीवरूनही लोकांनीं बोध घ्यावा व मंत्रावर आणि ढोंग धतुऱ्यावर विश्वास ठेवूं नये. आमचें सर्वांस सांगणें आहे कीं, मनुष्याच्या कृतीनें व वस्तुसंयोगानें अनेक गोष्टी घडतात व ती कृति करण्याची हातचलाखी कोणाचे नजरेस आली नाहीं, व वस्तुसंयोग समजला नाहीं ह्मणजे धूर्त व ढोंगी लोक लागलीच मंत्र व जादू यांच्या नावावर ते प्रयोग खपवूं लागतात, दुसरें कांहीं नाहीं. वस्तुसंयोगाशिवाय व मनुष्याच्या कृतीशिवाय केवळ मंत्रानें अगर आपोआप कांहीं घडेल असें सहसा कोणी मानूं नये. कारण असें लोकांनीं आह्मांस दाखवावें व आमची खात्री करून द्यावी ह्मणून मोठमोठालीं बक्षिसें कबूल करून कित्येकांनीं जाहिराती दिल्या आहेत पण सदहू बक्षिस जिंकणारा कोणी अद्यापि भेटला नाहीं. कोणी मनुष्य बीरमंत्रानें कुंकू, अत्तर, पानें, सुपाऱ्या वगैरे पदार्थ काढितो अशी लोकांत त्याची प्रसिद्धी असते पण ती सर्व खोटी होय. धूर्तपणानें तो गृहस्थ ते ते सर्व जिन्नस आपले जवळ छपवून बाळगतो व हात चलाखी करून काढून दाखवितो व ती चलाखी कोणा कोणाची इतकी सफाईदार असते कीं कांहींच कृति नजरेस येत नाहीं ह्मणून अशा गोष्टीस कोणी नजरबंदीचा खेळ ह्मणतात व ही नजरबंदी ते बीर किंवा मंत्र करितात अशीही प्रसिद्धि आहे. पण खरोखर तसें कांहीं नाहीं. आपण बारकाव्यानें नजर पुरवीत नाहीं ह्मणून ती नजरबंदी, बाकीं कांहीं नाहीं. हैदराबादचे एक नामांकित गृहस्थ रा. रा. गंगाधर शास्त्री पुष्कळ वर्षे असले टाणे टोणे करून दाखविण्यांत प्रसिद्धीस आलेले गेले महिन्यांत पुण्यास गेले होते व तेथेंही त्यांनीं बीर मंत्राकडून पदार्थ आणविण्याचे प्रयोग केले पण शेवटीं एके प्रसंगांत रा. रा. केरोपंत छत्रे. रा. रा. कृष्ण शास्त्री चिपळूणकर प्रभृति मंडळी ते प्रयोग पहाण्यास गेली होती त्या वेळीं जो चमत्कार घडला तो ज्ञानप्रकाशावरून आह्मी आपले वाचकांस कळवितों.

शास्त्रीबावा यांच्या खेळास सुरुवात होण्यापूर्वीं खेळ पहावयास जमा झालेल्या लोकांचें व शास्त्रीबावाचें बीरमंत्राच्या सामर्थ्याबद्दल बरेंच संभाषण चालू होतें. शास्त्रीबावा यांचें हें बोलणें तर फारच खुबीदार होतें; कारण ते प्रथमतः असें बोलून दाखवीत कीं, माझ्यांत बीरमंत्राचें सामर्थ्य नसून केवळ हातचलाखी आहे. शास्त्रीबावांचें हें नम्रपणाचें भाषण ऐकून कित्येकांस बरें वाटलें, परंतु शास्त्रीबोवा मागाहून बोलण्यांत असें दर्शवीत असत कीं, हस्तकौशल्य कितीही उंची असलें तथापि त्याच्यानें अलौकिक गोष्टी व्हावयाच्या नाहींत. एकंदरींत शास्त्रीबोवाची अशी खुबी असे कीं, आपल्यास पळण्यास वाट ठेवून ते आपणास बीरमंत्र साध्य आहेत असा लोकांचे मनावर ग्रह उत्पन्न करीत. खेळास आरंभ होण्याचे पूर्वीं कोण कोणते जिन्नस काढावयाचे व ते किती व कोणच्या रीतीनें काढावयाचे याचे बद्दल जमा झालेल्या लोकांची व शास्त्रीबोवांची बरीच बाचाबाच झाली, परंतु ह्या बाचाबाचींत शास्त्रीबोवाचा हेकटपणा बऱ्याच अंशानें लोकांस कळून आला. वरील खटपट सुरू असतां कित्येकांनीं प्रवाही पदार्थ काढण्यास शास्त्रीबोवांस सांगितलें व एकानें तर असें सुचविलें कीं, खेळास आरंभ होण्याचे पूर्वीं शास्त्रीबोवांस वजन करून बसवावें व खेळ संपल्यानंतर शास्त्रीबोवांचें वजन फिरून ताडून पहावें, परंतु वरील सूचना त्यांस मुळींच रुचली नाहीं व त्यांनीं पूर्वीं आव घातल्याचे विरुद्ध मन मानेल ते जिन्नस काढण्यास सुरुवात केली. शास्त्रीबोवांनीं विड्याचीं पानें, सुपाऱ्या, लवंगा व वेलदोडे काढल्यानंतर फिरून वादास सुरुवात झाली. सरतें शेवटीं शास्त्रीबोवा झाडा देण्यास कबूल झाल्यामुळें लोकांनीं दोन गृहस्थांस झाडा घेण्याचें काम सांगितलें. पुढें शास्त्रीबोवा व सदहू दोन गृहस्थ एका खोलींत गेले. तेथें शास्त्रीबोवांनीं आपला झाडा प्रखर रीतीनें होतो असें पाहून आपलें खरें इंगित झाडा घेणाऱ्या गृहस्थांस सांगितलें. वर लिहिल्याप्रमाणें हकीकत झाल्यानंतर झाडा घेण्यास नेमलेल्या गृहस्थांनीं बाहेर येऊन सर्वत्र मंडळीस असें सांगितलें, कीं, शास्त्रीबोवांच्या कंबरेस जिनसांचें गाठोडें आहे, व त्यांतून ते जिन्नस काढितात. सरते शेवटीं मंडळींनीं शास्त्रीबोवांस बाहेर बोलाविलें, परंतु ते मनांत खट्टू झाल्यामुळें बाहेर आले नाहींत. एकंदरींत शास्त्रीबोवांचें दोन वर्षांचें भांडवल ते दिवशीं रात्रीं फुटलें, व आजपर्यंत ज्या लोकांची शास्त्रीबोवांवर श्रद्धा बसली होती तेही त्यांच्या कुचेष्टा करूं लागले.

## वऱ्हाड.

दोन आठवडे पावसानें अभरवशासारखें केलें होतें पण शुक्रवार रात्रीपासून थोडथोडा भिजपाऊस सुरूं झाला तो काल दिवस रात्र बहुतेक सारखा पडला. यावरून सर्वांस मोठा संतोष झाला आहे. सर्वत्र असें असेल तर फार चांगलें. चोहोंकडे या दोन आठवड्याचा बोभाटा आहे. मलकापुरास तर पर्जन्यकाळ सुरूं झाल्यापासून पाऊस नाहीं व पेरण्या झाल्या नाहींत हें ऐकून आह्मास दुःख वाटतें. परमेश्वरकृपेनें कालचा पाऊस. तिकडे ही असेल असें वाटतें.

मेजर बेल साहेब जुडिशियल कमिशनर रविवारीं उमरावतीस गेले होते ते सोमवारीं परत आले. या महिन्यांत तिकडे रहाण्याचा त्यांचा बहुधा बेत होता तो रहित करून ते एथेंच राहिले. उमरावतीहून कमिशनर आफीसचे क्लार्क आफधि कोर्ट कामानिमित्त एथें आले आहेत.

वऱ्हाडचे विद्यार्थ्यांस म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेकरितां नाशिक मुक्रर केलें आहे तेथें अक्टोबरचे पहिले तारखेस परीक्षा होईल. व तींत जे पास होतील त्यांनां नोवेंबरांत मुंबईस बाकी परीक्षेकरितां जावें लागेल.

उर्दूअखबार वर्तमानपत्र मुनशी किसनचंद, जे पूर्वीं त्या छापखान्यांत लेखक होते, त्यांनीं कालपासून पुन्हा सुरूं केलें आहे.

खामगावाजवळ जनुनें ह्मणून एक गाव आहे तेथें सुमार ४०००० रुपये खर्चून एक मोठा तलाव बांधण्याचा व त्याचें पाणी नळानें खामगावांत आणण्याचा विच्यार चालला आहे

खामगावची आगगाडी उद्यापासून बंद होणार, ती पूर्ववत् चालू रहावी व आह्मी दर मणास ३ पै जास्ती देतों असा व्यापारी लोकांनीं अर्ज केल्याचें कळतें— लांडसाचा मक्ता दरमहा १५० रुपयांस मि. रूमजी शेट यांनीं घेतला.

शिगावाहून एका मारवाड्याचे बारदानाचे ९ गठ्ठे अकोल्यास आलेले चुकून दुसरे मनुष्यास दिले गेले. पुढें शोध करितां एक गठ्ठा त्यानें विकला होता त्याची किंमत व ४ गठ्ठे कंपनी शिगाववाल्यास देत असतां त्यानें न घेऊन खामगावास रेलवेवर फिर्याद केली तिचा फैसल झाला कीं रेलवेनें कबूल केल्याप्रमाणें ४ गठ्ठे व एकाची किंमत द्यावी व प्रतिवादीचा खर्च द्यावा.

आमचे डिपुटी कमिशनर मेजर मेन साहेब हे लेफ्टिनेंट कर्नेल झाले हें कळविण्यास आह्मास संतोष वाटतो.

कर्नेल नेंभार्ड साहेब यांस पेनशन घेतल्यापुढें मेजर जनरल म्हणत जावें असा लंडनग्याझेटमध्यें ठराव झाला आहे.

क्या० स्प्यान्स्की साहेब यांची नोकरी वीस वर्षे झाल्याचे संबंधानें तारीख १३ जूनपासून त्यांस मेजर केलें.

सरकारानें असा ठराव केला आहे कीं विलायतेस रजेवर गेलेले कामदारांस सरकारी नोकरीचे संबंधानें रजा भरण्यापूर्वीं परत बोलाविल्यास त्याचा खर्च सरकारांतून द्यावा.

मि० अबदुल हक्क एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस सेकंड क्लास माजिस्ट्रेटचे अधिकार मिळाले.

रा. रा. व्यंकटराव मल्हार एदलाबादकर खामगावचे नायब तहशिलदार यांस थर्ड क्लास माजिस्ट्रेटचे अधिकार मिळाले.

मि० हाबसन साहेब असिस्टंट पोलिस सुपरइंटेंडेंट यांस बुलढाण्याहून अकोल्यास नेमिलें.

मि० एदलजी बहिमनजी अस्थाची यांस क्रिमिनल प्रोसिजरचे कलम २३ तुकडी अ—१ प्रमाणें अधिकार दिले.

मि. निकोलेटस साहेब उमरावतीस जाणार ह्मणून काल सायंकाळीं त्यांकरितां पान सुपारी झाली. बेत फार उत्तम होता विशेष पुढें लिहू.

## वर्तमानसार

तुर्क लोकांच्या लिहिण्यावरून असें दिसतें कीं ता. २७ रोजीं त्यांनीं सोकूप काले एथें रशियन लोकांचा अगदी पराभव केला. तेव्हां रशियन लोकांचे २००० लोक मेले. व ४००० जखमी झाले. रशियन लोकांनीं आर्दाहान एथें फार अघोर कृत्यें केलीं आणि रसचक शहराचा विनाकारण नाश केला.

रशियन सरदाराच्या लिहिण्यावरून दिसतें कीं, २६ जून रोजीं त्यांनीं आर्दानुच्छ एथें तुर्की फौजेवर हल्ला करून तिचा अगदी मोड व दाणादाण केली. मग तुर्क लोक बात्झ एथें पळून गेले.

दुःखाची गोष्ट—सर जमशेटजी जीजीभाई बाटलीवाले ११ वे तारखे मरण पावले.

इंग्रजांचें एक आरमार ग्रीस देशाहून निघालें आहे पण त्याचा हेतु अद्याप गप्त आहे.

चीनसरकार काशगरवर स्वारी काणार त्याबद्दल २,५०,००० प्राण खर्ची घालावे लागतील असा अदमास आहे.

जोंपर्यंत इंग्लंड टर्कीकडील आंग दाखवीत आहे तोंपर्यंत इंग्रजी पदार्थ विकत घ्यावयाचे नाहींत असा रशियांतील कित्येक लोकांनीं निश्चय केला आहे. अ. द.

म्हैसुरमध्यें वकतर नावाच्या गावीं तेथील लोकांनीं एक तोफेचा गोळा एका देवळांत ठेऊन ते त्याची पूजा करितात.

सु. प.

## सरकारी अंमलदारांचे मानाचा अनूक्रम.

( मागील अंकावरून पुढें चालू )

३५ हिंदुस्थानचे सर्व्हेअर जनरल व पोस्ट आफिस आणि तारायंत्रें यावरील डायेरक्टर जनरल

३६ फर्स्ट क्लास चीफ इंजिनियर

३७ कलकत्ता मद्रास आणि मुंबई एथील आर्चिडेकन.

३८ ब्रिग्रेडियर जनरल

**सेकंड क्लास.**

३९ तेवीस वर्षांच्या यत्तेचे सिविलियन आणि कर्नल.

४० डिव्हिजनल कमिशनर आणि पोलिस कमिशनर कलकत्ता.

४१ व्हाइसरायचे प्रायव्हेट सेक्रेटरी

४२ रेसिडेंट, पोलिटिकल एजंट आणि सुपरइंटेंडेंट ४००० किंवा त्याहून अधिक रुपये महिना पगाराचे

४३ सुपरइंटेंडेंट, मोठ्या त्रिकोण मितिच्या मोजणीचे

४४ कसृम ( इन ल्यांड) चे कमिशनर

४५ हिं. स. चे स्यानिटरी कमिशनर

४६ ( जी ओ लाजिकल) भूरचने संबंधी मोजणीचे सुपरइंटेंडेंट

४७ हिंदुस्थानच्या जंगल खात्याचे इन्स्पेक्टर जनरल

४८ हिं. स. चे स्टयांडिंग कौन्सल

४९ मिलिटरी अकौंटंट जनरल

५० इलाख्याच्या सरकारच्या हाताखालचे विद्याखात्याचे डायेरक्टर

५१ इलाख्याचे अकौंटंट जनरल

५२ इलाख्याचे इन्स्पेक्टर जनरल आफ पोलिस

५३ रिविन्यू सेटलमेंटचे डायेरक्टर, आणि रिविन्यू सर्व्हेचे सुपरइंटेंडेंट मद्रास, सर्व्हे आणि सेटलमेंट कमिशनर मुंबई. सेटलमेंट कमिशनर पंजाब

५४ लिगल रिमेंब्रन्सर आणि गव्हरन्मेट आडवोकेट, वायव्य प्रांत, पंजाब, आणि ब्रिटिश ब्रह्मा एथील

५५ हिंदुस्थान सरकारचे रेलवेकडील कन्सलटिंग इंजिनियर कलकत्ता आणि लाहोर, इलाख्याचे सेकंड व थर्ड क्लास चीफ इंजिनियर.

५६ जिल्हा जडज, सेशन जडज, कलेक्टर, जिल्हा माजिस्त्रेट, जिल्ह्याचे डेपुटी कमिशनर, पोर्टब्लेरचे डिपुटी सुपरइंटेंडेंट आणि इलाख्याच्या म्युनिसिप्यालिटीचा चीफ आफिसर त्याचे त्याचे भागांत

५७ सिविल लिस्टांतील फर्स्ट क्लास आफिसर जे सनदी सिविल सर्व्हिसच्या मेंबरांत नाहींत ते

**थर्ड क्लास**

५८ अठरा वर्षांच्या यत्तेचे सिविलियन आणि लेफटिनेंट कर्नल

५९ पोलिटिकल एजंट आणि सुपरइंटेंडेंट हजार व दोन हजाराहून कमी पगाराचे

६० पंजाबचे मिलिटरी सेक्रेटरी आणि इलाख्याचे सिविल सेक्रेटरी

६१ गव्हरनरचे प्रायव्हेट सेक्रेटरी

६२ लोकल अडमिनिस्ट्रेशनच्या विद्याखात्याचे डायरेक्टर

६३ कलकत्ता, मद्रास आणि मुंबई एथील अडमिनिस्ट्रेटर जनरल

६४ इलाख्याच्या जेलचे इन्स्पेक्टर जनरल, रेजिस्टर खात्याचे इन्स्पेक्टर जनरल, स्यानिटरी कमिशनर, जंगलखात्याचे इन्स्पेक्टर आणि कान्सर्वेटर व पोस्टमास्तर जनरल

६५ अकौंटंट जनरल लोकल अडमिनिस्ट्रेशनचे

६६ कान्सलटिंग इंजिनियर चीफ सुपरइंटेंडेंट इंजिनियर

६७ इन्स्पेक्टर जनरल आफ पोलिस लोकल अडमिनिस्ट्रेशनचे

६८ सिनियर चापलेन

६९ मुंबईचे मरीनखात्याचे सुपरइंटेंडेंट

७० मास्तर अटेंडंट

७१ शेरीफ आपआपले भागांत

७२ सिविल लिस्टांतील सेकंड क्लास आफीसर जे सनदी सिव्हिल सर्व्हिसच्या मेंबरांत नाहींत ते.

**चवथा क्लास**

७३ बारा वर्षांच्या यत्तेच सिविलियन व मेजर

७४ पोलिटिकल एजंट सुपरइंटेंडेंट, हजार रुपये पगाराचे आपआपले भागांत

७५ गव्हरन्मेंट सालिसिटर

७६ लोकल अडमिनिस्ट्रेशनचे जेलचे इन्स्पेक्टर जनरल, रेजिस्ट्रेशनचे इन्स्पेक्टर जनरल आणि कान्सर्वेटर आफ फारेस्ट

७७ सिविल लिस्टांतील तिसरे क्लासचे आफिसर सनदी मेंबरांत नसलेले

## नोटिसा

मणुलाल टिकारामजी साहू वस्ती पंचगव्हाण यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे दुकानचा खातेबाकीचा हिशेब करून नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत रुपये द्यावे सदर्हू मुदतींत रुपये न दिल्यास फिर्याद करून घेऊ. कळावें ता. ९।७।७७

( सही ) गणपत शेषराव गुमास्ते दस्तुर खुद

### नोटिस.

रोडीसा वल्लद त्रिंबकसा रंगारी रहाणार पेठ बाळापुर यास भवानसा वल्लद तुकसा रंगारी रहाणार पेठ मजकूर याजकडून देण्यांत येतें कीं तुह्मी आमचे एथें नवकरीस संवत् १९३१ चे आषाढ वद्य ९ पासून संवत् १९३३ चे मार्गशीर्ष शुध्ध १५मे पावेतों १६ महिने २० दिवस आमचे कापडाचे दुकानावर मुख्त्यार होतां असें असून त्या दुकानचा हिशेब आह्मास समजून न देतां तुह्मी आपले घरीं बसला हें मोठें आश्चर्य आहे. याकरितां या प्रसिध्ध नोटिशीनें तुह्मास असें कळवितों कीं, सर्व कागदपत्राचा हिशेब दुकानदारीचे रीतीप्रमाणें असाम्याची रुजुवात ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत सर्व समजून द्यावें. व रुजुवात करून द्यावी. याप्रमाणें तुह्मी न केल्यास आमची जी नुकसानी निघेल ती तुह्मास द्यावी लागेल व याशिवाय तुह्माकडे खानगी बाकी आहे तीही तुह्मी देत नाहीं. या सर्व बाबीकरितां सदरीं लिहिलेली मुदत संपतांच तुह्मावर रीतीप्रमाणें तजवीज करावी लागेल व तेणेंकरून कोर्टखर्चही तुह्मावर बसेल- या नोटिसीचा खर्च तुम्हास द्यावा लागेल. कळावें. तारीख १२जुलै१८७७

(सही) भवानसा तुकसा रंगारी दु. बाळापुर वहिवटदार रामजी जयराम द० खु०

### नोटिस

ताराजी वल्लद लक्षुमण गाडे रहाणार बमाळ परगणे देऊळघाट हल्लीं रहाणार मौजे लिंग परगणे फतेखेडें तालुके मेहेकर यांस.

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुमच्याशीं माझें लग्न मी मौजे शेलपूर परगणे अमडापुर तालुके चिखली ह्या गांवीं असतांनां झालें त्यास सुमारे सात वर्षें झालीं त्या दिवसांपासून आजपर्यंत मजला पोटगी व कपडे वगैरे बद्दल दरसाल पन्नास रुपये या प्रमाणें सात वर्षांचे साडेतीनशें रुपये सावकाराचे एयून खर्च केले आहेत आणि तुह्मांकडील बोलावणें आतां येत नाहीं व तुह्मी दुसरी बायको केल्याचें मजला परस्पर समजतें यावरून माझी पक्की खात्री झाली असून मी हल्लीं वयांत येऊन माझे संसार सुखाचे दिवस फुकट जात आहेत यास्तव या नोटिशीचे द्वारें असें कळविते कीं, ही नोटिस पावल्या तारखेपासून एक महिन्याचे आंत सदरीचे रुपये दाखल करून मजला घेऊन जावें असें न झाल्यास मुदती नंतर मी कायदेशीर रीतीनें दुसरा गंधर्व करून शिवाय सदरीचे रुपये व कोर्ट खर्च आणि या नोटिशीचा खर्च याबद्दल पैसा तुह्मावर फिर्याद करून डिगरी मिळविली जाईल कळावें तारीख ५ माहे जुलै सन १८७७ इसवी.

( सही ) बुनी मर्द तागाजी गाडे निशाणी खुद हातची बांगडी.

### नोटिस.

रामजी वल्लद नटवाजी माळवकार रहाणार मौजे कुंभारी तालुके अकोलें जिल्हा मजकूर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं आमचे बहिणीचें लग्न तुह्माशीं होऊन आज सुमार १० वर्षे झालीं व तिला शेवपदर येऊन ही ३।३॥ वर्षे झालीं पण सदर्हू मुदतींत तुह्मी तिला नेऊन वागविलें नाहीं इतकेंच नाहीं तर ४ महिन्यांपूर्वीं आलो आपले बहिणीस तुमचे घरीं आणून घातलें व ३ महिनेपर्यंत तुमचे एथें ठेविली पण तुह्मी तिचे खाण्यापिण्याची सुद्धां फिकीर न ठेवितां बाहेर बाहेर राहूं लागले तेव्हां तिनें उसणें पासणें करून उदरनिर्वाह केला व गावकरी लोकांनीं आमचेकडे शिपाई पाठविला तेव्हां आह्मी तुमचे गावीं आलों ते दिवशीं तुह्मी तिचे लग्नाची फारकत देण्यास कबूल झाला पण रात्रीस बाहेर गावीं निघून गेला. नंतर आह्मी सर्व देणें देऊन बहिणीस घरीं घेऊन आलों. आतां या नोटिसीनें इतकेंच कळवितों कीं नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत येऊन तिचा ३ वर्षांचा पोटखर्च सुमार १५० रुपये देऊन तुह्मी आपले बायकोस घेऊन जावें व चांगलें नांदवावें पण इतके दिवसांचे अनुभवावरून आह्मास उघड दिसतें कीं तुमच्यानें तिची वागणूक होणें नाहीं ह्मणून तुह्मी सदर्हू मुदतींत फारकती देऊन मोकळे व्हावें नाहीं तर कायदेशीर रीतीनें तजवीज करून गंवर्धाचा ती घरठाव करील मग कोर्टाचा व नोटिसीचा खर्च तुह्मापासून घेतला जाईल हें खूप समजावें. कळावें तारीख ११ जुलै सन १८७७ इसवी.

[ सही ] कृष्णा वल्लद महादाजी वस्ती शेगाव निशाणी हातची रेघ

### नोटिस

भिवा वल्लद निळू चिंचोळकर रहाणार मौजे मोहेबार प्रगणें व तहशिली वरूड जिल्हा चंद्रपुर यांस खालीं सही करणार गिरजू मर्द भिवा चिंचोळकर रहाणार मौजे सिवणी गोंडीबोवाची प्रगणे व तालुके वणी इजकडून नोटिस देण्यांत येते कीं मी तुझी लग्नाची बायको असून माझा प्रतिपाळ करण्याचा तुझा हक्क आहे परंतु मला पोटास न देतां आठ वर्षे सोडून दिलें सबब दहा पांच वेळ तुला सांगून पाठविलें व माझा भाऊ तुझ्याकडे ४ भले लोक घेऊन गेला असतां तूं कांहींच तजवीज केली नाहींस करितां तुला ही नोटिस दिली आहे तर नोटिसीचे तारखेपासून पंध्रा दिवसांत आजपर्यंत पोटास लागलेला खर्च देऊन मला घेऊन जावें. नाहीं तर मी कायद्याप्रमाणें दुसरा नवरा करीन त्याजवर अथवा खुद्द मजवर तुझा कांहीं एक संबंध रहाणार नाहीं आणि पोटास खर्च झाला त्याजबद्दल दिवाणींत फिर्याद करून पैसा घेईन. वरील मजकुराप्रमाणें तजवीज करणें तीं मुदती प्रमाणें केली असतां बरें आहे. ह्मणून पूर्वीं हकीकत कळविली आहे कळावें ता. ५।७।७७ इसवी.

( सही ) गिरजू मर्द भिवा निशाणी हातची बांगडी

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ | अकोला, रविवार ता० २२ माहे जुलै सन १८७७ इ० | अंक २९

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY.

## ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेलवे.

NOTICE.

## नोटिस.

## खामगाव स्टेटरेलवे बंद होत नाहीं.

या नोटिशीनें असें जाहिर केलें जातें कीं, तारीख ९ माहे जुलै सन १८७७ इसवी रोजीं आम्ही अशी नोटिस दिली होती कीं, खामगाव स्टेट रेलवे वरून आगगाड्या जाण्या येण्याचे तारीख १६ मिनहूपासून बंद होईल ती नोटिस रद्द केली आहे. व स्टेटरेलवे चालू राखली आहे. आतां पुढें दुसरी नोटिस होईपर्यंत छापील टाइमटेबलाप्रमाणें पूर्ववत् आगगाड्या जाण्यायेण्याचें कायम राहील.

हेनरीकांडर

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई, १६ जुलै १८७७

## नोटिस

शिवा वल्लद देवजी कुंभार रहाणार कसबे महान तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडे पुर्ज्यावरून आमचे घेणें ४० रुपये शिवायव्याज आहे ते मागितले असतां देऊादिलाऊ करिता पण देत नाहीं ह्मणून ही नोटिस दिली आहे तर १५ दिवसांत उलगडा करावा नाहीं तर योग्य कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां सर्व रकम घेतली जाईल व या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें ता. १९ जुलै सन १८७७ इसवी.

( सही ) हंबीर वल्लद पिरथमजी वस्ती महान दस्तुर खुद्द

### नोटिस.

चिरंजीव गंगाराम वल्लद चिमणाजी वाणी रहाणार दहिहंडें तालुके अकोट यास खालीं सही करणार याजकडून समज देण्यांत येतो कीं, तुह्मी तारीख २६ माहे जून रोजीं नोटिस दिली त्यांतील मजकूर सर्व खोटा आहे. आपण लिहिलें कीं, चिमणाजी हा काशीस जाते वेळेस कांहीं धरवर ठेवून गेले. तर मुळींच चिमणाजी हा आमचा भाऊ असून त्याचा व आमचा बिघाड पूर्वी १७ वर्षांपासून आहे आणि तो गेला त्या वेळेस लाचारीमुळें भीक मागत गेला हें सर्वांस माहित आहे आणि तो काशीस गेला ही खोटी गोष्ट आहे. आणि आमचे वहिवाटीचें शेत कपलेश्वर एथील असून हल्लीं तूं खोटेपणा करून त्या नंबरांत हालसालीं गेला ही फार चुकी आहे याबद्दल सरकारी काम चालू असून हुकूमउदुली त्वा केली हें बरोबर नाहीं. आणि त्या नोटिशीला मुद्दत दिली हें फार चुकी आहे. मुद्दाम फिर्याद करावी. कळावें. तारीख १९ जुलै १८७७ इसवी.

(सही) सखाराम रामकृष्ण कृष्णपक्षी निशाणी मशारनिल्हेचे हातची

### सद्बोध साक्या.

आला हा कीं काळ पहारे ब्राह्मण्या बुडवाया । स्वगृहा त्यागुनि परगृहातें जाती तरुणी जाया ॥ १ ॥ पातिव्रत्या लाथ मारुनी बाहेर निघती जाया। परक्याचा कर धरुनी टाकुनि निजसुतरत्नाला या ॥ २ ॥ धिक् धिक् तुमचे पावित्र्याला काय रडावें एथें । कीं ज्या पातिवृत्याचा बहु लौकिक होता जेथें ॥ ३ ॥ क्षेत्राक्षेत्रामधुन असा हा प्रकार होणें आम्हां । खालि पहाणें लागे आतां काय करावें रामा ॥ ४ ॥ कसबिणि म्हणती अमुचि कमाई बुडविलि ह्या गरतींनीं । बसुनि घरामधि जारासंगें रमती त्या गमतीनीं ॥ ५ ॥ शिंपि म्हणति ना शूद्र ह्मणति ना कसच्या ब्राह्मणकन्या । लुच्चा रांडा घरीं बसुनिया दूषण देती अन्या ॥ ६ ॥ घरीं असे जरि बहुत खावया लेण्याला दागीने । नवराही जो शक्त हुशारहि हीन नसे द्रव्यानें ॥ ७ ॥ अक्षयि निघती गरति स्त्रिया त्या घरांतुनी विटसंगें । नसेच लज्जा मनीं तीळभर नासति ज्या बहुढंगें ॥ ८ ॥ कां हसावें शूद्रस्त्रियांना लाविति पाट जरी त्या । प्रथमपतीही असतां त्याच्या जाति घरीं कधि ना त्या ॥९॥ बऱ्या अशा ह्या गेल्या निघुनी घरांतुनि नवऱ्याच्या । बसुनि घरां मधि पापें करिती रमती सहशूद्राच्या ॥ १० ॥ इंग्लिश राज्यीं स्वातंत्र्याचा कानुअसे हा भारी । स्त्रीपुत्रातें तशीच धर्मामाधि असे मुखत्यारी ॥ ११ ॥ असती ब्राह्मणशाही तरि मग पहा कशा ह्या गरती । करिती दुष्टाचरणा त्यांच्या होइ जिवाची भरती ॥ १२ ॥ पुण्य द्विजांचें सरलें आतां पाप वृद्धि होते ही । ताळ टाकिला स्त्रीपुरुषांनीं याला इलाज नाहीं ॥ १३ ॥ पुरुष पहाती परस्त्रियांनां स्त्रिया तशा जरांना । कां लावावा दोष अशांना मुराकिति ज्या बहु माना ॥ १४ ॥ पुरुष शहाणे सुरते होउनि करिती ऐशीं कर्में । मग त्या अबला मूर्खचि त्यांची कां काढावीं वर्में ॥ १५ ॥ दैवयोग हा कसा बघावा कीं जो नर सन्मार्गें । वागे त्याची कुलटा भार्या वर्ते जी दुर्मार्गें ॥ १६ ॥ कधीं न ज्यासीं परस्त्रियेला बघणें माहित स्वप्नीं । त्याची तरुणी दुःसंगानें होते कीं बहु चैनी॥ १७ ॥ पतिव्रता जी सदैव पतिच्या शुश्रूषेंतचि दक्ष । त्या साध्वीच्या दुष्टपतीचे परस्त्रियेवरि लक्ष ॥ १८ ॥ योग्य परस्पर ऐसा असणें आवडतें देवाला । काय रडावें ह्या संसारीं नसें सुख प्राण्याला ॥ १९ ॥ पोंच बायका पुढील नसतो सोडिति पतींस जेव्हां। उल्लू होउनि जारांसंगें निघती झटकन तेव्हां ॥ २० ॥ बरें जारही असा त्यांजला आश्रय सतत न देती । तेव्हां त्यांच्या फटूफजितीला सांगा कोण पहाती ॥ २१॥ नसे तोंड मग ग्रामीं याया परतुनि त्या × × ना । घरीं राहुनि मत्त जहाल्या लज्जा नुरली ज्यांना ॥ २२ ॥ सासुसासऱ्यां मातापितरां लावुनि कलंक जाती । नवऱ्याचाही लौकिक करुनी करिती अपुली माती ॥ २३ ॥ यावज्जन्मामधीं न हो ज्यां अनुभव लेश सुखाचा । असतें दवडुनि नसतें इच्छिति त्यां वांटा दुःखाचा ॥ २४ ॥ अशा स्त्रियांनां लौकिक कसचा मुळींच माहित नाहीं । सदैव नखऱ्यांमधें गर्क ज्या लज्जा किमपी नाहीं ॥ २५ ॥ ज्यापेक्षां बा घोरकर्में हीं या देशीं होतात । अनावृष्टिनें दुष्काळ पडतो नवल काय हो त्यांत ।२६।

इं. प्र.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस वि. वि.

पुनर्जन्म पावलेला तुमचा धाकटा बंधु उर्दूअखबार गेल्या शनिवारीं पाहिला. त्याबद्दल तुह्मासही संतोष झाला असेलच. रा. रा. मुनशी किसनचंद यांनीं त्या पत्राचे मालक, म्यानेजर, व एडिटर असे अनेक हुद्दे धारण केले आहेत व तशी जाहिरात दिली आहे ती पाहून मला कांहीं शंका आल्या त्या आपणास कळवितों:—

किसनचंद यांनीं आपणास मालक ह्मणविलें आहे पण तेच जाहिरातींत लिहितात कीं, जुने मालक हेच नफ्या नुकसानीचे धनी आहेत, तेव्हां मुनशीजीच्या मालक हुद्यांत काय अर्थ राहिला तो मला समजत नाहीं. तसेंच त्यांनीं आपणास मालक ह्मणवून पुढें आणखी म्यानेजर ह्मणविलें आहे. याची काय जरूर होती? मालकानें म्यानेजर ह्मणविणें भूषणास्पद नाहीं. व अधिक हुद्याकरितां लिहिलें असेल तर लेखक, कारकून, फत्तरसुपरइंटेंडेंट हेही हुद्दे त्यांकडेच आहेत ते लिहावयास पाहिजे होते. अस्तु. तिसरा हुद्दा एडिटर असाही त्यांनीं लिहिला आहे. याजविषयीं मात्र मला सर्वांपेक्षां अधिक नवल वाटलें. कारण मराठी भाषा त्यांस मुळींच येत नाहीं, तिचें त्यांचें वाकडें आहे. व त्याच पत्रांत पुण्याहून एडिटर बोलाविल्याविषयीं त्यांनीं लिहिलें आहे मग हे एडिटर कसे? व हे इतके हुद्दे त्यांस लागू होतात कसे तें कृपा करून आपण किंवा आपले कोणी वाचक कळवितील तर फार चांगलें होईल. कळावें हे विनंती. तारीख १३ माहे जुलै सन १८७७ इसवी.

एक शंकित.

*** ही गोष्ट मोठीशी महत्वाची नाहीं. सबब असल्या वाटाघाटी करण्याचें शंकित यास कांहीं कारण नव्हतें. रा. रा. मुनशी किसनचंद यांनीं मोठें धारिष्ट करून हा कारखाना पुन्हा उभारला आहे. त्यांत त्यांस यश येवो व पत्राची सुधारणा होवो असें आह्मी इच्छितों.

ए. व. स.

## वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ शुध्द १२ शके १७९९

## खरी झाल्यास आनंदाची गोष्ट.

नेटिव लोकांना सिव्हिल सर्व्हिसमध्यें घ्यावें. हिंदुस्थानामध्येंच त्यांची परीक्षा घ्यावी. व त्यांतून शेकडा कांहीं तरी लोकांची निवड करावी असें हिंदुस्थान सरकारचें मत आहे. आणि ठिकठिकाणचीं सरकारें ठिकठिकाणचे उमेदवार लोकांस निवडून काढतील.

हा मजकूर टाइम्सवरून या आठवड्यांत कित्येक पत्रांतून आलेला आहे. व त्यांत त्यास वदंता ह्मणून लिहिलें आहे. पण ती वदंता कोणचे द्वारानें उठली, व तिला कांहीं आधार आहे किंवा नाहीं हें समजलें नाहीं. परंतु शुभवर्तमान आहे ह्मणून तें आह्मीही आपल्या वाचकांस त

सैच्या तसेंच सादर करीत आहों.

सरकार आमचे लोकांस सिव्हिल सर्व्हीस मध्यें यथान्याय हक्क देत नाहीं ही मोठी उणीव आहे. इंग्रज सरकारास हिंदुस्थानांत राज्य अढळ व अबाध चालावें असें इष्ट आहे तर त्यांनीं नेटिव लोकांची अशी पायमल्ली करूं नये. बहुत वर्षें नेटिव लोक सरकारास सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा सोयवार करून द्या एवढेंच मागत आहेत. आह्मांवर मेहेर्बानी करा, किंवा भाड भिडेनें जागा द्या असेंहो त्यांचें ह्मणणें नाहीं. विलायतेस परीक्षेस जाण्यास हिंदू लोकांस अनेक गैरसोयी आहेत, व वयाची यत्ता फारच अल्प ठेवलेली आहे व ती गैरसोय इंग्लिश लोकांस नाहीं, असा पक्षपात ठेवूं नका इतकेंच नेटिव लोकांचें मागणें आहे. खरेंच, वयाची यत्ता उभय ज्ञातीस सारखी असावी, व परीक्षा ही दोघांस सारखी होण्या करितां पाहिजे तर एक वर्ष विलायतेस व एक वर्ष हिंदुस्थानांत ठेवावी, आणि पास होण्याच्या नंबरवारीनें जागा द्याव्या असें इंग्लिश सरकारानें केल्यास आमचे लोक त्यांच्या थोरवीचे अखंड पवाडे गातील यांत संशय नाहीं.

---

## हिंदु लोकांनीं जगावें कसें ?

हिंदु लोकांचा व्यापार अगदी थकला. अफीणीवर भारी कर बसला, कापसावर अमेरिकेचा चढ झाला. लोखंड, कागद, व कांच यांवर विलायतेची सरशी झाली. गुजर व मारवाडी खेड्यापाड्यांनीं देवघेव करीत होते तीही थकली. कारण तिला शेतकरी लोकांचा आधार, तेच भिकारी झाले व साऱ्याइतकेंही पीक त्यांच्या शेतांतून होईनासें झालें मग त्यांनीं सावकारास काय द्यावें ? सरकारचा वायदा रडत कडत भरतात, कारण सरकार जबरदस्त तें घरदार सावडील व भांडीकुंडीं, जमीन जप्त करील ह्मणून त्याचें देणें अगोदर वारतात, व सावकार मागावयास आला ह्मणजे हातपाय पसरून बसतात. सावकार मनांत ह्मणतो कुळ खरोखरच नादार यावर फिर्याद करावी तर आणखी निमे रुपये पदरचे घातले पाहिजेत, कोडतांत फेऱ्या घातल्या पाहिजेत व इतकेंही करून कुळाचें घेणार काय? हा विचार सावकारांच्या मनांत येऊन खेड्यापाड्यांतील देवघेवीचा व्यापार थकत चालला. ज्याच्या घरीं वर्षास हजार रुपयांची प्राप्ती, त्याच्या घरीं हल्लीं २०० रुपये येत नाहींत व पैसा दिला तर तो पुन्हा येईल असा भरवसा वाटत नाहीं. दुसरें, आदालतीचे कर लुटारू सारखे आहेत. १० रुपयांच्या कामांत आदालतीचें सर्टिफिकेट घ्यावयाचें तर ५० रुपये खर्च लागतो. कारण मिळकतीप्रमाणें स्टांपाचा कर घेणें पडतो, व हा कर पिढी दर पिढी लागला आहे. तेव्हां या देशांतील रयतेनें जगावें कसें ? हा मोठा विचार आहे.

एका डाक्टरानें मनुष्याचें प्रेत फाडून पाहिलें तेव्हां त्यांतील फार बारीक बारीक यंत्रयोजना पाहून तो ह्मणाला हा सर्व सांगाडा यथास्थित चालून मनुष्य जगतो हें मोठें आश्चर्य आहे ! आमची कल्पना आहे कीं त्याच डाक्टरानें हल्लींच्या गांजलेल्या स्थितींतील एकाद्या हिंदूचें प्रेत पाहिलें तर त्यास हिंदु लोकांच्या जगण्याचें त्याहून पुष्कळपट अधिक आश्चर्य वाटेल यांत संशय नाहीं.

हिंदुस्थानांत ईश्वरकृपेनें निर्वाहाचे पदार्थ पुष्कळ पिकतात व थोडक्यांत निर्वाह होतो यामुळेंच मनुष्यें जगत आहेत, दुसरें कांहीं नाही.

नुसती भूमीच केवळ फलद्रूप होत नाहीं. द्रव्य घालावें तेव्हां मोठमोठे बागबगीचे व विहिरी होतात व त्यांत फायदा झाला नाहीं ह्मणजे त्याच विहिरी पडून रहातात. श्रीमंत लोक या उद्योगास लागावयाचे त्यांची संख्या दिवसानुदिवस कमती होत चालली आहे. व प्रजा निर्धन झाल्यामुळें आकाशांतून पडणाऱ्या पावसावर जेवढें पिकेल तेवढें खाऊन ती निर्वाह करिते. व पाऊस पडला नाहीं तर उपाशी मरते. बागाइतांत उत्तम पीक आलें तर मात्र थोडी कसर रहाते. नाहीं पेक्षां आतबट्ट्यानें मनुष्य जेरीस येतो. उदाहरणार्थं उसाचें पीक घेऊ. एक बिघा ऊस लाविला तर त्याला खर्च काय लागतो व जमा काय येते तो पहा.

| रु. | खर्च |
| --- | --- |
| १०८ | नांगरणी सात वेळां |
| ६० | खत ६० गाड्या |
| १० | कुपण |
| ३६ | रखवाली |
| ६ | लावणी |
| ७८ | खुरपणी |
| ५ | बांधणी |
| ५२ | पाणी ५२ वेळ द्यावयाचा खर्च |
| ४५ | गुऱ्हाळाचा खर्च |
| ६ | सारा |
| ३० | बी |
| २८८ | |

जमा.

सोळा घागरीची एक कढई तींत गूळ ३॥। मण होतो. तेरा शेरांचा एक मण याप्रमाणें ९ कढया रोज उतरतात तो गूळ ३३॥। मण. यांत महार, सुतार, परीट व कुंभार यांचीं कामें पडतात ह्मणून त्यांस व गूळवाल्यांस वाटणी द्यावी लागते त्याची वजावाट होऊन ८ दिवस गुऱ्हाळ चाललें आणि उत्तम पीक आलें तर १२ खंडी गूळ होईल त्याची किंमत ३९० रुपये. मध्यम पीक झाल्यास ८ खंडी, किंमत २६० रुपये. कनिष्ठ ४ खंडी किंमत १३० रुपये. यावरून खर्चाशी मेळ पहावा. उत्तम पीक सर्वकाळ येते असा कांहींच नेम नाहीं.

याचप्रमाणें हळद लाविली तर १८७ रुपये खर्च येतो. तिचें उत्तम पीक आल्यास २०० रुपये, मध्यम १५०, व कनिष्ठ १०० रुपये जमा होते असा प्रकार आहे यावरून लोकांनीं जगावें कसें ?

शेती वाल्यास लंगोटी आणि घोंगडी याशिवाय कसली आशा नाहीं. बागाइतांत तोटा येऊ लागला ह्मणजे तो भरण्यास सावकार पाहिजे त्या वाचून गति नाहीं. आकाशी शेतीचा तरी माल झाला कीं, तो विकून चावडी फेडावी. पुढें मजूर कामास जावें. शेण वेंचून गोवऱ्या कराव्या, गवत काडी आणून भारे विकावे. दुखणें भाणें किंवा खर्चाची कांहीं बाब आली कीं, वेळा गहाण, नथ गहाण, किंवा बैलास बाजार दाखवावा अशी निकृष्ट स्थिती शेतवाल्यांची बहुधा असते.

सर्व लोकांस पोट भरण्याचे मार्ग तीन. उत्तम खेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ चाकरी, परंतु या तिहींतही प्रस्तुत कांहीं सोय राहिली नाहीं. विद्या शाळांतून हजारो लोक तयार झाले आहेत व दर साल होत आहेत त्यांनीं जावें कोठें व करावें काय हा मोठा विच्यार आहे. लोकांची सोय व्हावी व देशांतील संपत्ती वाढावी या विषयीं सरकार कांहीं यत्न करीत नाहीं. सरकारास द्रव्याची गरज लागली कीं, त्यांचे दोन मार्ग— कर वाढवा, किंवा कर्ज काढा. विलायतचें कर्ज कोट्यावधि रुपये या देशावर आहे, व त्याचें व्याज लाखो रुपये दर साल भरावें लागतें. तेव्हां या स्थितीचा पुढें परिणाम काय होईल हा एक मोठा प्रश्न आहे. व अडचण तर सर्वोपरी आहेच. त्यांतून परमेश्वर मार्ग दाखवून लोकांस बुद्धि देईल त्यांतच त्यांचें जीवन व्हावयाचें, नाहीं पेक्षां दिवस कठीण आहेत यांत संशय नाहीं. लोकहितवादी

---

**सर जमशेटजी जीजीभाई बारोनेट** मरण पावल्यामुळें साऱ्या हिंदुस्थानांतील पारशी लोकांस मोठें दुःख झालें. व मयताच्या तिसरे दिवसाच्या क्रियेंत त्यांनीं तें व्यक्त करून दाखविलें. कित्येक पेढ्या व दुकानें बंद झालीं होतीं. डेकनकालेजास त्यांची मदत आहे याजकरितां ते ३ दिवस बंद ठेवणार आहेत. मुंबईहून मोठमोठाले पारशी गृहस्थ त्यांच्या चिरंजीवाच्यीं समाचारास गेले होते. व तिसरेदिवसाकरितां चिरंजीवही मुंबईस गेले होते. कित्येक पारशीमंडळीनीं असा विच्यार केला होता कीं एक प्रसिद्ध सभा भरवून ज्याप्रमाणें मयतास आपण आपल्या जातीचे प्रमुख मानून मान देत आलों त्याचप्रमाणें त्यांच्या चिरंजीवास प्रमुख मानू व मान देत जाऊ असा सर्वांनुमतें ठराव करावा. या विच्यारावर कांहीं पारशी गृहस्थांनीं अशी शंका काढिली कीं सभा भरवून प्रमुखत्व देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मयतांचे चिरंजीव अजून तरूण आहेत, त्यांस दुनियादारीचा अनुभव नाहीं सबब सभा भरवून तसें करण्यापेक्षां मयत गृहस्थ आपले कर्तबगारीनेंच जसे सर्वांत प्रमुख झाले तशी यांस आपली कर्तबगारी दाखवू द्यावी ह्मणजे सभा न भरवितां अनायासेंच सर्वांचें प्रमुखत्व यांस मिळेल.

---

**सभा**—कालेंच शनिवारचे मागील शनिवारीं मि० निकोलेट साहेब असिस्टंट कमिशनर यांची उमरावतीस बदली झाली ह्मणून त्यांस निरोप बोलाविण्याचा इंग्लिशमराठी स्कुलांत समारंभ झाला. गावांतील नेटिव प्रमुखमंडळी बहूतेक होती. युरोपियनांपैकी मात्र ते एकटेच होते. आरंभीं रा. रा. देवराव विनायक वकील यांनीं साहेबाविषयीं माहिती सांगितली. ते ह्मणाले मि० निकोलेट साहेब सुमार १० वर्षें अकोल्यास आहेत व ज्या ज्या तालुक्यांत त्यांनीं काम केलें त्यांतील सर्व प्रकारची माहिती त्यांनीं चांगल्याप्रकारें करून घेतली आहे. मराठी व हिंदुस्थानी भाषांचें त्यांनां चांगलें ज्ञान आहे. लोकहिताचीं कामें तालुक्यांतून यांनीं पुष्कळ केलीं आहेत. रयतेशी प्रेमानें वागून त्यांचीं दुःखें हे ऐकून घेत असत त्यांचा व परीहार करण्याविषयीं झटत असत. कायद्याकानूची व देशरिवाजांची व आमच्या रीतिभातींची यांनां चांगली माहिती झालेली आहे. दिवाणी, फौजदारी, मुलकी सर्व प्रकारचीं सरकारी कामें हे फार मेहनतीनें झटून करीत, व खरें शोधून काढून निष्पक्षपातानें न्याय करीत. यांनीं कधीं कोणाचें नुकसान केलें नाहीं, इत्यादि सांगून त्यांचा आपला आतां वियोग होतो याजबद्दल खेद दर्शवून पुढें उत्तरोत्तर हे वैभवास चढून लोकहिताचे कामीं अधिकाधिक झटोत अशी सर्वांची इच्छा आहे असें बोलून खालीं बसले.

नंतर मि० मिरजा अबदूल करीम उर्दू अखबारचे माजी एडिटर यांनीं उठून हिंदुस्थानी भाषेंत थोडक्यांत साहेबाचें स्तावक भाषण केलें. मग निकोलेट साहेब यांनीं स्वतां उभें राहून हिंदुस्थानी भाषेंत थोडक्यांत प्रत्युत्तर दिलें. त्यांतील भावार्थ असाः—

मि० देवराव विनायक व मि० मौलवी यांनीं आह्माविषयीं जे चांगले उद्गार दर्शविले त्यांकरितां आह्मी त्यांचे आभारी आहों. सरकारानें जें काम आह्मांवर सोपविलें तें आह्मी काळजीपूर्वक केलें इतकेंच, यांत लोकांनीं आमची तारीफ करावी, व वर्णन करावें असें आमच्या हातून विशेष कांहीं झालें नाहीं असें असतां लोक तसें मानितात हा त्यांचा मोठेपणा आहे. खरी गोष्ट बाहेर निघावी व योग्य इनसाफ व्हावा या विषयीं आह्मी फार काळजी घेतों ही गोष्ट खरी आहे तथापि सर्व कामें अगदी बिनचूक घडून यावींत हें एका परमेश्वराच्या हातीं मात्र आहे. आह्मी मनुष्य आहों तेव्हां चुकीस पात्र आहों. यहूदी लोकांत सालमन होऊन गेला तसे आह्मी नाहीं. ईश्वरानें जी बुध्धी आह्मास दिली आहे तिचा योग्य उपयोग करून आह्मी इनसाफ करितों. या देशचे लोक खोट्या गोष्टी सरकारांत फार आणतात. व बहुधा खरें सांगत नाहींत त्यामुळें न्याय निवडण्यास फार पंचाईत पडते. तथापि खरें बाहेर काढण्याविषयीं आह्मी सर्वकाल प्रयत्न करितों व आमची खात्री झाली ह्मणजे मग न्याय निवडतों. मग तें जसें घडून येईल तसें येवो. कोणाचें उगीच नुकसान न व्हावें याकरितां आह्मी फार जपत होतों याविषयीं देवराव साहेब यांनीं जें सांगितलें तें खरें आहे. जाणून बुजून आह्मी कधीं कोणाचें नुकसान केलें

नाहीं या जमलेल्या सर्व मंडळींत आमचे ओळखीचे नाहींत असे कोणी नाहीं व या सर्वांचा आमचचा आतां वियोग होणार याजबद्दल आह्मी दुःखी आहो.

शेवटीं, अशा सभांपासून घडणाऱ्या उपयोगांचें संबंधानें खंडेराव बाळाजी फडके यांणीं भाषण केलें. ते ह्मणाले कीं, आजचा समारंभ संतोषाचा व नेत्रांस आल्हाद देणारा आहे. मागें अशा सभा फारशा कधीं होत नसत पण अलीकडे एक दोन वर्षांत या वारंवार होऊं लागल्या ही चांगली गोष्ट आहे. नेटिव लोक युरोपियन लोकांस आपल्या मंडळींत बोलावितात व ते त्याप्रमाणें येतात हा नवीन पडत चाललेला प्रघात आमचे देशास मोठा हितावह होईल. हल्लींच्या नेटिव व युरोपियन लोक एकत्र होण्याच्या या सभा फक्त जातेवेळच्या ह्मणजे स्थलांतराच्या संबंधानें शेवटील भेटी पुरत्या होतात, इतकाच जो यांचा आरंभ आहे त्याचा प्रघात वाढला जाऊन हमेशा अनेक प्रसंगीं युरोपियन व नेटिव लोक सभांमधून एकत्र जमावेत व नाना प्रकारच्या विषयांवर त्यांचे विचार चालावेत या परिणामावर जावा व आमच्या देशाची सुधारणा व्हावी हें फार अपेक्षित आहे. पूर्वकालीं आमचे हिंदु लोक विद्या, वैभव, पराक्रम, राजसत्ता इत्यादि योगानें सर्वत्र विख्यात झालेले होते आणि त्यांचे वंशज आह्मी हल्लीं नीचावस्थेंत आहो. आह्मांस उत्तम विद्या नाहीं, सुविचार नाहींत, कलाकुशलता नाहीं, वैभव नाहीं असें असतांही परोपकार बुद्धीनें आमचे कल्याणार्थ फार लांबून आलेले विद्वान, बुद्धिमान, नीतिमान, चतुर, महत्पदाधिकारी व वैभवशाली असे युरोपियन लोक आह्मी निमंत्रिलेल्या सभेंत येतात व समभावानें आह्माशीं वागून आमचे उद्योगास सहाय्य करितात अशी हमेशाची स्थिति असणें किती लाभाचें व संतोषाचें आहे! यापासून आमचें देशाचें खरोखर हित होईल यांत संशय नाहीं. सबब परमेश्वरानें कृपाकरून सर्व युरोपियन लोकांस नेटिवांमध्यें हमेशा मिसळून वागण्याची बुद्धी द्यावी व त्याप्रमाणें निरंतर घडून यावें या करितां आह्मी त्याची प्रार्थना करितों.

याप्रमाणें भाषणें झाल्यावर पानसुपारी वाटली. वर्खी विडे केले होते तसेच मोतियाचे हार तुरे व गजरे केले होते ते सर्वांस दिले व अत्तर गुलाब वाटून प्रसन्नचित होत्साती मंडळी घरोघर गेली.

---

## वऱ्हाड.

---

सर रिचर्ड मीड साहेब रेसिडेंट आपल्या प्रिय पत्नीसहित सिकंदराबादहून बोलारमकडे रहाण्यास गेले आहेत. थोडे दिवसांनीं हैदराबादेस परत जातील.

कमिशनर साहेब सिमल्याहून या आठवड्यांत येतील असें वर्तमान आहे.

रा. रा. सी. भीमराव उमरावतीचे अव्वल साची यांस ३०० रुपये पर्यंत दिवाणी दावे पहाण्याचा अधिकार मिळाला.

डा० आबट साहेब स्यानिटरी कमिशनर उमरावतीस आहेत.

उमरावतीकडेही गेल्या आठवड्यांत पाऊस चांगला पडला.

काल रात्रीं इचलकरंजीकरांनीं वेणीसंहार नाटक केलें. व मागल्या शनिवारीं 'कच देवयांनीं' व "मदालसा" हें नाटक केलें. या मंडळीनें, मागीलपेक्षां आपल्या कित्येक नाटकांत रसोत्पादक स्थलीं भाषणें वाढवून थोडथोडी सुधारणा केली आहे व पुढेंही त्यांचा हा क्रम चालू आहे ही त्यांस मोठी भूषणास्पद गोष्ट होय. इंग्लिश भाषेंतील विख्यात नाटककारांच्या कांहीं खेळांची भाषांतरें होऊन त्यांचेही खेळ या मंडळीकडून होणार आहेत असें समजतें.

मि० कादरभाई याजकडून आह्मांस असें प्रसिद्ध करण्याविषयीं सूचना झाली आहे कीं, हल्लींच्या उर्दूअखबार कारखान्यांत त्यांचा कांहीं एक संबंध नाहीं. फक्त त्यांच्या मालकीचा प्रेस त्यांनीं मुनशी किसनचंद यांस भाड्यानें दिला आहे. कारखान्याच्या नफ्या नुकसानीचे मालक मुनशी आहेत, कादरभाई बिलकूल नाहींत.

इलिचपुर. तारीख १६ जुलै — एथें तीन दिवसांपासून पर्जन्य चांगला पडत आहे. रे० क्रयामर या नावाचे मद्रासेहून एक मिशनरी एथें आले आहेत. त्यांचीं व्याख्यानें ख्रिस्ती मंडळींत नित्य सुरूं आहेत. ते उत्तम वक्ते आहेत. भाषणाचे आरंभीं व शेवटीं गायन आणि प्रार्थना होत असतें. नेटिव मंडळींतही त्यांचें एक व्याख्यान होणार आहे—क्या. मेकंजी साहेब आज चिखलदऱ्यास गेले. लवकरच परत येतील—सांगलीकर नाटकवाल्यांची नाटकें चालू आहेत.

खामगाव स्टेटरेल्वे १६ वी पासून बंद होणार होती ती न होतां पूर्ववत् चालू राहिली आहे. व तशी जाहिरातही प्रसिध्द झाली आहे.

मलकापुरास पर्जन्यकाळ सुरूं झाल्यापासून पाऊस नव्हता तो तिकडे गेल्या शनिवारीं पाऊस चांगला पडून पेरण्याची सुरवात झाली आहे.

गेल्या रविवारीं जो पाऊस उघडला तो तेव्हांपासून आजवर नाहीं. हवा निरभ्र झाली आहे. चांदणें स्वच्छ पडून ऊष्मा होतो व उघड्यावर निजण्याची इच्छा उन्हाळ्याप्रमाणें होते. तथापि पडलेला पाऊस फार चांगला झाला असल्यामुळें १५ दिवसपर्यंत न पडेल तरी कांहीं हरकत नाहीं असें शेतीवाले लोक बोलतात.

उमरावतीहून कमिशनरचे क्लार्क रा. रा. केशव जयकृष्ण देशपांडे आले होते ते सोमवारीं परत गेले.

लेफटिनेंट कर्नेल ए एच मिलेट पोलिसचे इन्स्पेक्टर जनरल नोकरी सोडून गेल्यामुळें ता. ११ एप्रिलपासून पोलिस खात्यांत पुढें लिहिल्याप्रमाणें टेंपररी प्रमोशन देण्यांत आलें आहे.

क्या. सी टी लेन फर्स्ट ग्रेड सुपरइंटेंडेंट यांस आफिशियेटिंग इन्स्पेक्टर जनरल केलें.

मि. एफ राइट सेकंड ग्रेड सुपरइंटेंडेंट यांस आफिशियेटिंग फर्स्ट ग्रेड केलें.

मि. एच काटग्रेव्ह थर्ड ग्रेड सुपरइंटेंडेंट यांस आफिशियेटिंग सेकंड ग्रेड केलें.

मि. एच ए हीथ असिस्टंट सुपरइंटेंडेंट यांस थर्ड ग्रेड आफिशियेटिंग सुपरइंटेंडेंट केलें.

दुष्काळामुळें हैदराबादेकडे स्थिति फार वाईट झाली आहे असें सिकंदराबाद एथील पत्रावरून समजतें. सर्व प्रतीच्या लोकांस अनुपपत्ती जाणवूं लागली आहे. आणि गोरगरीब लोक जे एकवेळ थोडेंसें अन्न खाऊन निर्वाह करीत असत त्यांना तेंही मिळण्याची आतां पंचाईत झाली आहे. बंगाली शेरानें रुपयास ४ शेर तांदूळ मिळतात तेणेंकरून हलके पगारवाले लोकांस आपलें कुटुंब पोषणाचें मोठें संकट ओढवलें आहे. भिकाऱ्यांची संख्या वाढली आहे आणि पाहाट झालीनाहीं तोंच क्षुधेनें व्याकुळ होत्सातें अन्न अन्न करीत हिंडणारांचा ध्वनी हैदराबाद, सिकंदराबाद व दुसरी नजिकचीं शहरें यांत ऐकूं येऊं लागतो. अन्न न मिळाल्यामुळें मनुष्यें मरूं लागल्याचे रिपोर्ट येताहेत. येका घरच्या सगळ्या मनुष्यांनीं आपणास खावयास मिळत नाहीं ह्मणून विष खाऊन जीव दिल्याची लोकांत बातमी आली आहे. बाजारांत धान्य मिळत नाहीं असें नाहीं, धान्य पुष्कळ आहे पण त्याच्या किमती मनस्वी चढल्या आहेत. गोरगरीबास धान्य घेतां येईल अशा बेतानें धान्याचे निरख ठरवून द्यावे अशी हैदराबाद सरकारास थोड्या दिवसांमागें सूचना झाली होती पण ती त्यांनीं नाकबूल केली व असें सांगितलें कीं, अर्थशास्त्राच्या नियमानुरूप गिराइकांच्या जरुरीचें व मालाच्या सांठ्याचें प्रमाण पाहून दर चढेल व उतरेल, त्यांत सरकारानें हात घालण्याचें कांहीं कारण नाहीं.

रा. ब. नारायण भाई डायरेक्टर कलकत्यास वगैरे जाऊन काल येथें आले.

एथील श्रीराजेश्वराचे सभामंडपास रंग देण्याकरितां रा. रा. लक्ष्मीपति नायुडू बारिस्टर यांणीं २५ रुपये दिले.

---

## वर्तमानसार

---

बरद्वानच्या राजानीं चक्रवर्तिनी साहेबांचा पुतळा विकत आणला आहे व तो कलकत्यास म्युझियमच्या दरवाजापुढें मांडण्याचा समारंभ जानेवारीचे पहिले तारखेस आपण स्वतां करूं असें व्हाइसराय साहेबांनीं त्यांस कबूल केलें आहे.

हिंदुस्थानांतून एप्रिल व मे महिन्यांत विलायतेस माल गेला व तिकडून आला त्याचा हिशेब येणेंप्रमाणें आहे.

हिंदुस्थानांत ६६१३०१७५ रुपयांचा माल आला व १३७८७३३७० रुपयांचा माल हिंदुस्थानांतून विलायतेस गेला. सोनें नाणें ८९७००७९५ रुपयांचें आलें. व १९५४४३२ रुपयांचें तिकडे गेले. आल्या मालाची ६५६५४४३ रुपये जकात आली व गेल्या मालाची रुपये १०५०४६४ आली. गुदस्त सालीं याच दोन महिन्यांत ५९३५४१७७ रुपयाचा माल आला होता, ११९९९८४०२ रुपयांचा माल गेला होता.

मुंबई सरकारानें कलकत्यास तांब्याचें नाणें पुष्कळ पाठविण्या विषयीं लिहिलें आहे. मुंबईची टंकसाळ रुपये पाडण्यांत अगदी गढून गेली आहे.

बंगाल्यांत देवी काढण्याच्या खात्याकडे खर्च फार लागतो ह्मणून असा एक विचार काढला आहे कीं बिनपगारी स्वतंत्र सनदी देवी डाक्टर ठेवावे व त्यांनीं कोणाच्या ताब्यांत न रहातां फी घेऊन स्वतंत्र काम करावें.

### लढाई संबंधी खबरा.

बेयाझिड एथें रूस लोकांनीं ३०००० तुर्क लोकांचा पराभव करून त्यांस हाकून लाविलें व त्या शहराचा पराभव केला.

आर्मेनियामध्यें रशियाची पुष्कळ फौज येऊं लागली आहे. रशियन लोकांनीं सिमनिझा एथें नवीन पूल तयार केला होता तो वावटळीनें कांही कांहीं ठिकाणीं मोडून पडला.

जर्मनीचे प्रधान प्रिन्स बिस्मार्क यांणीं असें प्रतिपादन केलें कीं, आतां तुर्कस्थान व रशिया यांच्या मध्यस्थींत पडणें अशक्य आहे.

रशियाच्या १८ पलटणी शिदकाच्या रस्त्यानें बालकान्स ओलांडून पलीकडे येनिसागरापर्यंत गेल्या व त्यांना वाटेंत शत्रूकडून कांहीं अडथळा झाला नाहीं.

रशियाची फौज बलगेरियामध्यें रासग्राड एथें आली व तिनें वार्णा आणि रस्चक याचा संबंध जोडणारी रेलवे तोडून टाकली.

बलगेरियांतील मुसलमान प्रजेवर कोसाकचे लोक फार जुलूम करूं लागले आहेत.

निकोपोलीसचें ठाणें तुर्क लोकांनीं सोडून दिलें. व तें रशियानें घेतलें.

कान्स्टंटिनोपल एथें अधिक असलेली सर्व फौज आड्रियोनोपल एथें पाठवित आहेत

दार्दोनेल एथील रस्ता कोणत्याही राष्ट्राला मोकळा ठेवूं नये असा तुर्क लोकांचा बेत आहे. जें राष्ट्र रशियाविरुद्ध आपणास या लढाईंत मदत करण्याचें वचन देईल त्यास मात्र तो रस्ता ते देणार आहेत.

निकोपोलिस घेतांनां रशियानीं २ तुर्कपाश्चा व ६००० लोक धरून कैद केले.

रशियाचा हेड कार्टर सिस्तोव्याहून तिरनोवा एथें नेला.

रशियन लोकांची ९०००० फौज सिस्तोवा या गावाजवळ डान्यूब नदी उतरून सेलव्ही एथें आली आहे.

युपाटोरिया एथें रशियन लोकांवर तुर्क लोकांनीं कुलपी गोळ्यांचा हल्ला केला.

एशियमिनारमध्यें कारच्या किल्ल्याला जो वेढा घातला होता तो दुसऱ्या बाजूकडून तुर्क लोकांचा जबरदस्त मारा आला असें पाहून तेथूनउठविला.

रशियाचा राजपुत्र ग्रांड ड्यूक आलेक्झांडर याचे हाताखालीं फौजेचा बारावा व तेरावा भाग आहे त्यास हुकूम झाला आहे कीं, रस्चक एथें जाऊन वेढा घालावा.

रशियन फौजेनें प्लेवना शहर हस्तगत केलें व निकोपोली घेण्याच्या बेतांत आहे.

आफगाणीस्थानच्या अमिराकडे टर्कीच्या सुलतानानें मोठा मोलवान नजराना बरोबर देऊन वकील पाठविला आहे. व अमीरास एक पत्र लिहिलें आहे त्यांत त्यास अशी सला दिली आहे कीं, त्यानें इंग्लिश सरकारचा स्नेह संबंध अधिक वाढवावा व रशियाचा संबंध तोडून टाकावा.

सर्व्हिया आणि रोमानिया यांजमध्यें सला झाला असें वर्तमान आलें आहे. तरी तेणेंकरून आस्ट्रिया आणि रुशिया यांच्याशी जो त्यांचा संबंध आहे त्यांत कांहीं व्यत्यय येणार नाहीं अशी सेन्टपिटर्सबुर्ग एथें आधारयुक्त बातमी आली आहे.

इंग्लिश लोकांचीं भूमध्य समुद्रामध्यें जीं लोखंडी तारवें आहेत त्यांच्या सहाय्याला आणखी ४ तारवें लंडनाहून रवाना झालीं आहेत.

रशियन लोक पुढें पुढें येऊन सामुग्रीकरितां गावोंगाव कोल्या करितील ह्मणून तुर्क लोक त्यांच्या येण्याच्या पूर्वींच वाटेवरच्या गावांतील सामानसुमान लांबवीत आहेत व नासून टाकीत आहेत.

रशियाच्या घोडेस्वार फौजेनें तुर्क लोकांचे तिरनोवा नावाचें शहर ज्यांत ३ हजार ग्यारेसन फौज होती त्यावर हल्ला करून तें सर करून घेतलें.

बंगाल सरकारानें एक्स्त्रा असिस्टंट सेक्रेटरीची जागा नवीन केली असून ती जागा बाबू राजेंद्रनाथ मित्र बंगाल सेक्रेटरीएट मधील जुडिशियल डिपार्टमेंटचे हेड असिस्टंट यांस दिली.

अपघात—तारीख १२ रोजीं तळेगाव एथें मालाचे गाडीस अपघात झाला. सुमारें ८ डबे मोडून त्याचे तुकडे झाले व अर्धामैल रेलवे रूळ सरकले होते. पण तो रस्ता तावडतोब दुरुस्त होऊन गाड्या जाऊं येऊं लागल्या.

विंचवास औषध— एका युरोपियन वैद्यानें विंचू चावल्यावर एक सुलभ उपाय काढला आहे, तो असा कीं, विंचू चावलेल्या जागीं चावल्या वेळापासून सुमारें दहा मिनिटांचे आंत चुन्याचा ठिपका दिला असतां विंचवाचें विष तावडतोब उतरतें. सदहू उपाय त्यांनीं स्वतःच्या अनुभावावरून शोधून काढला आहे असें कळतें.

ने. ओ.

विपरीत मूल— कोलंबोंत तामिल जातीच्या स्त्रियेस मूल झालें त्यास दोन डोकीं, चार डोळे आणि तीन पाय होते. तें थोडक्याच कालानें मेलें.

लाहोराकडील एका पत्रावरून असें कळतें कीं, दिल्लीच्या इस्पितळांत झोंपी गेलेल्या पंखा ओढणाऱ्या मनुष्यास एका सोजिरानें लाथ मारली यामुळें त्याची प्लीहा भंग पावून तो अर्धतासाच्या आंत यमसदनास गेला.

हिंदुलोकांत व मुख्यत्वें करून ब्राह्मण जातींत पुनर्विवाह न करण्याची दुष्ट चाल पडली आहे ह्मणून विधवा बालहत्या करतात, त्यांस मरण्याची शिक्षा देणें रास्त नाहीं या विषयावर सर टी माधवराव यांनीं जो गेल्या सालीं निबंध लिहिला होता त्याच्या प्रति हिंदुस्थान सरकारानें ताब्यांतील सरकाराकडे मताकरितां पाठविल्या आहेत असें कळतें. इं. प्र.

---

ब्राह्मणास दक्षणा देऊन त्यांच्या आशीर्वादद्वारें आपल्या पापाचा सुलभ रीतीनें क्षय करून घेण्याचा जो प्रकार हिंदुलोकांत आहे व ज्या सारखाच कांहींसा प्रकार हल्लीं रोमन क्याथोलिक लोकांत व प्राचीनकाळीं बहुधा सर्व धर्माच्या लोकांत चालू होता, त्यापेक्षांही अधिक चमत्कारिक प्रकार हल्लीं चीन देशांत चालू आहे. तेथें दुसऱ्या पदार्थांप्रमाणें पुण्याचा क्रयविक्रय होत असतो. कोणी एकानें अमुक एक रीतीनें धर्मकृत्य करून पुण्यसंचय केला असला तर त्याला झालेला खर्च त्यास देऊन तो त्याचा पुण्यांश त्याजकडून दुसरा विकत घेतो. नुकतेंच एक असें उदाहरण घडलें कीं कोणी गृहस्थ एकाएकी दुखण्यांत पडला व तो मरणार असें ठरलें तेव्हां आपण कांहींच पुण्य केलें नाहीं असें स्मरून त्यास अस्वस्थता प्राप्त झाली. इतक्यांत एक स्नेही त्यास भेटावयास आला होता त्याणें वर्षभर कांहीं द्रव्य खर्चून पुण्यकर्म केलें होतें त्याची त्यास आठवण झाली व आपण पैसा घेऊन आपल्या पुण्याचा एक महिन्याचा अंश मला द्या असी स्नेह्यास त्याणें विनंती केली. स्नेह्यानें तें मान्य करून द्रव्य घेऊन तितका पुण्यांश विकत दिल्याची चिठ्ठी लिहून दिली व तो मरणोन्मुख झालेला गृहस्थ आपण तो पुण्यांश घेऊन परलोकवासी होणार अशा विचारांनीं स्वस्थ झाला. काय ही धर्म वासना! पुण्य घडतें कशानें पापाचा नाश होणार कसा याविषयीं खरा समज नसल्या कारणानें असे अनर्थक विचार मनुष्याच्या ठायीं उत्पन्न होतात व परलोक साधनाविषयीं आमच्यांत उत्कंठा असून ती साधण्याच्या मार्गाचें व उपायांचे विपरीत विचार आह्मास वारंवार फसवितात. आह्मी या गोष्टीविषयीं फार सावध असलें पाहिजे व दानधर्म आदिकरून बाह्योपचारांनीं पाप नाश होऊन आह्मी परमेश्वरास ग्राह्य होऊं असा खोटा समज बाळगून स्वस्थ न बसतां, खरा पश्चात्ताप व पाप कर्म पुढें न करण्याबद्दल दृढ व अढळ असा मनोनिग्रह हीं आपणांत उत्पन्न होण्याचे उपाय योजावे व ते उपाय सफल होण्यास आह्मी नित्य परमेश्वरास शरण जावें. सु० प०

# सर जमसेटजी जीजीभाई बारोनेट सी. एस. आय. यांचा मृत्यू.

आह्मांस लिहिण्यास अतीशय दुःख वाटतें कीं, आमच्या एतद्देशीय लोकांपैकीं व विशेषतः पार्शी पंडळींतील प्रमुख, वजनदार, व श्रीमान गृहस्थ सर जमशेटजी जीजीभाई बारोनेट सी. एस. आय. यांस तारीख ११ बुधवार रोजीं सकाळीं ११ वाजतां पुणें एथें देवाज्ञा झाली. सर जमशेटजी यांचा जन्म सन १८११ चे आक्टोबर महिन्यांत तारीख ९ रोजीं झाला. याजमुळें मरण समयीं त्यांचें सहासष्ट वर्षांचें वय होतें. यांस लहानपणापासून विद्येची गोडी होती व त्यांस इंग्रजी शिकविण्याकरितां युरोपियन शिक्षक ठेवले होते. त्यांस इंग्रजी भाषेचें बरेंच चांगलें ज्ञान असून पत्रें वगैरे त्यांस चांगलीं लिहितां येत होतीं असें ह्मणतात. हे कितीएक वर्षें थथील फार्ब्स आणि कंपनीचे हपिसांत काम करित होते व यांनीं त्यावेळेस व्यापाराचें वगैरे बरेंच चांगलें ज्ञान संपादन केलें त्यामुळें आपले वडिलांची पेढी वगैरे चालविण्याच्या कामांत त्यांचा फार उपयोग झाला. वडिलांच्या मरणा नंतर हे कांहीं दिवसपर्यंत आपले धाकटे बंधु मि. रस्तमजी यांजबरोबर भागीदारीनें व्यापार करीत होते. परंतु शेरबाजारचे घोटाळ्यापूर्वीं भागीदारीचा संबंध त्यांनीं सोडला तथापि ते शेराच्या घोटाळ्यांत सांपडून त्यांस देणेंही बरेंच झालें होतें. परंतु त्यांनीं आपला खर्च कमी करून सर्व देण्यांतून मुक्त झाले हें एक त्यांचे शहाणपणाचेंच कृत्य होय. सर जमशेटजी यांचे वडिलांस सन १८४२ त प्रथम नाइट ही पदवी मिळाली व ते सन १८५७ सालीं बारोनेट झाले. यांच्या वडिलांचे मृत्यूनंतर ता. १४ एप्रिल सन १८५९ रोजीं त्यांस बारोनेट ही पदवी मिळाली. यांचें पहिलें नाव करशेटजी जमशेटजी जीजीभाई हें होतें. परतुं यांस बापाची पदवी मिळाल्यामुळें त्यांसही ठरावाप्रमाणें घराण्याचें नाव जमशेटजी जीजीभाई हें धारण करावें लागलें. व त्यांचे मुलासही तेंच नाव धारण करावे लागेल. हे कांहीं दिवस पर्यंत पार्शी पंचायतीचे प्रमुख ट्रस्टी व सर जमशेटजी जीजीभाई बेनिवोलेंट इन्टियुशनचे अध्यक्ष होते. ते दुसऱ्या किती एक विद्यावृध्धीच्या व व्यापार संबंधाच्या मंडळ्यांचे सभासद होते. शिवाय कांहीं दिवसपर्यंत बांबे असोसिएशनचे अध्यक्ष होते. बांबे ब्यांक व सरकारी सेव्हिंग ब्यांक यांचे डायरेक्टर होते. सन १८४२ त ते जस्टिस आफ धि पीस झाले. सर जमशेटजी बांबे युनिवर्सिटीचे फेलो व मुंबईच्या म्युनिसिपल कार्पोरेशनचे सभासद होते. सर समोर फिटझरलड ज्या वेळेस मुंबईचे गवरनर होते त्या वेळेस मुंबईचे कायदेकौन्सिलचे सभासद होते. यांस स्टार आफ इंडियाची सी. एस. आय. ही पदवी मिळाली. सन १८६० सालीं ते आपले कांहीं मित्र बरोबर घेऊन विलायतेत गेले व तेथें त्यांनीं बरेंच बड्या साहेब लोकांशीं स्नेह केला. व राणी साहेब व बडे कामगार लोक यांच्या भेटी घेतल्या. हे विलायतेहून त्याच वर्षाच्या अखेरीस परत आले. १८७० त ते उत्तर हिंदुस्थानांत प्रवास करून व मोठीं शहरें पाहून आले. हे गेल्या जानेवारी महिन्यांत दिल्ली दरबारास गेले होते त्या वेळेस वाटेंत रेलवेच्या. गाडीस अपघात होऊन त्यांस मोठा धक्का बसला तेव्हांपासून त्यांचो प्रकृती बिघडण्यास प्रारंभ झाला. हे यंदाचे उन्हाळ्याकरितां खंडाळ्यास गेले होते, तेथें त्यांची प्रकृति अतीशय बिघडल्यामुळें त्यांस तथून पुणें एथें नेलें. तेथें त्यांचा आजार अतीशय होऊन अखेरीस उदर होऊन त्यांस देवाज्ञा झाली. यांचे मरणाचें दुःखकारक वर्तमान ऐकून इंग्लंडांतील व हिंदुस्थानांतील मित्र मंडळीस व विशेषेंकरून पार्शी जातीस फार दुःख वाटेल हें उघडच आहे. त्यांच्या मरणानिमित्त ब्यांकीं, शेरबाजार, पार्शी बाजार, बोहोरी बाजार, पार्शी दुकानें व शाळा बंद झाल्या होत्या. या सर जमशेटजीच्या औदार्याच्या देणग्याच्या संबंधानें त्यांच्या वडिलांप्रमाणें प्रसिद्धी नाहीं. तथापि त्यांनीं सन १८६३।६४ या सालांत डेकन कालेज करितां एक लक्ष व सर जमशेटजी इस्पिटलची इमारत वा विण्याकरितां पन्नास हजार रुपये दिले. शिवाय त्यांच्या धर्मादाय देणग्या अगदीं गुप्त व खासगी रीतीच्या होत्या, याजमुळें त्यांजविषयीं विशेष प्रसिद्धी व माहितीही नाहीं. त्यांचा स्वभाव फार चांगला व चालचलणूक फार संभावित प्रकारची होती याजमुळें ते लोकप्रिय होते. मुंबईची गवरनर मंडळी व गवरनर जनरल यांजशीं त्यांचा चांगला स्नेहभाव असून त्यांजपाशीं त्यांचें वजनही असे. राजघराण्यांतील कांहीं मंडळीशीं तसेंच लार्ड बर्डी डयूक आफ आर्गाइल वगैरे बडे लोकांशीं त्यांचा पत्रव्यवहार असे असें ह्मणतात. याजवरून त्यांचे वजन व योग्यता युरोपियन लोकांत व एतद्देशीय लोकांत फार होतें परंतु त्यांनीं या देशांतील लोकांची खरी स्थिति व त्यांचीं दुःखें तिऱ्हाइतपणें या बड्या युरोपियन लोकांस कळविलीं असतीं तर सरकारचें व प्रजेचें हित होऊन ते याहोपेक्षां अधिक लोकप्रिय झाले असते. यांत राजनिष्टपणांत कमीपणा न येतां इंग्लंड व हिंदुस्थान व त्यांतील लोक यांचे हित विशेष झालें असतें. सर जमशेटजी यांस हल्लीं नऊ मुलें असून मि० माणकजी कर्सेटजी हे वडील चिरंजीव आहेत. तेव्हां ते आतां घराण्याचे मुख्य होऊन यांची उत्तम योग्यता राखतील अशी आह्मी आशा करितों. सर जमशेटजी यांच्या प्रेताची व्यवस्था पुण्यासच झाली व त्यांस शेवटच्या रहाण्याच्या ठिकाणीं पोंचविण्याकरितां पुष्कळ मंडळी गेली होती त्यांत गवरनर साहेब व कमांडर इनचीफही गेले होते असें समजतें.

ने. ओ.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला, रविवार ता० २९ माहे जुलै सन १८७७ इ० अंक ३०

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा

भिकाजी वल्लद रंजाजी शेळकी वस्ती पारव प्रगणें पिंजर तालुके अकोले यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचेकडे आमची ज्वारि ५१ मण घेणें आहे. ती ही नोटिस पावल्या तारखेपासून ३ दिवसांचे आंत दिल्यास बरें आहे नाहीं तर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून हल्लींचे भावानें त्या ज्वारीचा पैसा घेण्यांत येईल कळावें तारीख २९ माहे जुलै सन १८७७ इसवी.

( सही ) लक्ष्मण दर्याजी भोयरे रहाणार पारवें तालुके अकोलें निशाणी खुद्द हातची.

नोटिस.

माधवराव नाईक ब्राह्मणगावकर यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, तुह्माकडे आमचे दुकानची बाकी रुपये १००० चलनी निघत असोन आजवर रुपये देत नाहीं; रजिस्टर झालेला दस्तैवज तुमचा आहे, आजपासून १५दिवसांत सदरील रकमेबद्दल तडजोड करून दस्तैवज परत घ्यावा. याप्रमाणें न कराल तर सरकार रीतीप्रमाणें कोर्ट पहावें लागेल. तारीख १९ जुलै सन १८७७ इ०

(सही) हरबाजी राजलिंग कोमटी साहू ढाणकी ता. दिग्रस दारव्हें

नोटिस.

नरसाप्पा नालमतार वहिवाटदार रामकृष्ण आप्पा दिगरस तालुके दारव्हा यास सही करणार सोनबा उगल्यावर मोरथयाजकडून नोटिस देण्यांत येते कीं: तुमचा सौदा २१ खंडी ज्वारीचा दर ४५ प्रमाणें केला असून भाव चढल्यामुळें रुपये घेऊन ज्वारि दिली नाहीं; याजकरितां नोटिस देण्यांत येते कीं, दर खंडीस ३९ रुपये प्रमाणें नुकसान द्यावें; आजपासून १५ दिवसांत येऊन तोड जोड करून पावती घ्यावी, याप्रमाणें न कराल तर सरकार शिरस्ते प्रमाणें तजवीज करावी लागेल. तारीख १९ माहे जुलै सन. १८७७ इसवी.

( सही ) सोनबा उगल्या मोरथकर.

नोटिस

नागोजी वल्लद सोनाजी कासार रहाणार दहिहांडे तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, तुह्मी मजला तारीख ६ जून १८७७इसवी रोजीं विनाकारण नोटिस दिली तिचें उत्तर असें:— गुदस्ता मी करारामप्रमाणें १२५ रुपये घेऊन आलो असतां आपण घेतले नाहींत सबब मी व्याज देवाल नाहीं याला खंडुराम, बीजराम व बळीराम हे साक्षीदार आहेत. तसेच आज चार महिने झाले उकडसिंगजी इजारदार यांजपाशीं मी रुपये तुम्हास देण्याकरितां ठेविले आहेत तो तीन वेळ तुम्हास देण्यास आलो असतां तुम्ही घेतले नाहींत. व हल्लीं नोटिस आल्यावर चवघे पंचासमक्ष १२५ रुपये सवाशें तुह्मास नगदी देत होतों. तेव्हांही तुह्मी घेतले नाहींत सबब ते रुपये रामप्रसाद शेट याजपाशीं मी उकडसिंगच्या मार्फत अनामत ठेविले आहेत सबब कळविण्यांत येतें कीं, नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत तुह्मी रुपये १२५ रामप्रसाद याजपासून घेऊन शेताचें खातें माझे नावें करून द्यावें. असें न कराल तर या नोटिशीचे खर्चासुध्धां तुह्मावर फिर्याद करून आमचे नावें शेत करून घेण्यातयेईल. कळावें. तारीख १९ माहे जुलै सन १८७७ इसवी.

( सही ) खानाजी वल्लद बेंडाजी वस्ती खानापुर ता.अकोट. निशाणी खुद्द हातची.

नोटिस

कुकाजी वल्लद पुंजाजी संवदडे रहाणार अडगावखुर्द तालुके अकोट यास तुळशी मर्द कुकाजी संवदडे रहाणार खयखेडें तालुके अकोट इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, मी पांच वर्षांचे वयाची असतां तुझ्याशी माझे लग्न झालें व वीस पंचवीस वर्षे तुजजवळ राहून जनरीतीप्रमाणें तुझ्याशीं संसार केला. अलीकडे तुला कांहीं दुर्व्यसनाचा छंद लागून तूं अगदीं विघडलास सदा सर्वकाळ कैफाच्या नादांत असतोस व एक दिवस चारचवघासमक्ष माझ्याशी तंटा केला व माय ह्मणून हाकून दिलें त्या गोष्टीला आज ३ वर्षे झालीं तूं मला पोटालाही देत नाहींस. जातवाल्यांमध्यें पंचाईत केली असतां तूं आला नाहींस व मुद्दाम माणसा हातीं तुला फारकत मागितली असतां तीही दिली नाहींस त्या करितां तुला नोटिस दिली आहे ज्या पक्षीं तूं मला माय ह्मटलेस त्या पक्षी तुझें माझें नवऱ्या बायकोचें नातें राहिलें नाहीं व तुझा माझा आतां पूर्वीप्रमाणें संसार होणें नाहीं सबब नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत फारकत पाठवून द्यावी व ३ वर्षांचा पोट खर्च दरसाल ५० रुपये प्रमाणें १५० रुपये आणून द्यावे. मुदतशीर याप्रमाणें तुजकडून तजवीज न झाल्यास तुझे फारकतीची वाट न पहातां कायदेशीर रीतीनें दुसरा गंधर्वाचा घरठाव करीन व पोटगीचे पैशाबद्दल दावा करीन त्याचा व या नोटिसीचा खर्च तुला द्यावा लागेल कळावें ता. २०।७।७७ इ.

( सही ) तुळशी मर्द कुकाजी संवदडे निशाणी हातची बांगडी

नोटिस

भवानसा वल्लद तुकासा रंगारी रहाणार पेठ बाळापुर जिल्हा अकोला यांस खालीं सही करणार रोडीसा वल्लद त्रिंबकसा रंगारी रहाणार पेठ बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मास तारीख १९ माहे जुलै सन १८७७ इसवीचे वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्रांतून नोटिस दिली ती पावली व लिहिला मजकूर समजला पण त्यांत फार गलत आहे. आह्मी तुमचे एथें नोकरी केली व ज्या वेळेस तुह्मी आह्मास मना केलें त्याच वेळेस दुकानदारीचा सर्व हिशेब तुह्मास समजावून दिला त्या प्रमाणें तुह्मी खात्यावर असाम्या वगैरे उतरून घेतल्या व बाकी १०।१९ असाम्याची रुजुवात करून द्यावयाची राहिली आहे तीही आह्मी करून देण्यास सिद्ध आहो पण तुह्मी विनाकारण नोटिस दिली तर या नोटिस दिल्यानें आह्मी नोकरी केल्या दिवसाची तलब तुह्मास सुटणार नाहीं हें खुप समजावें. करितां हीं नोटिस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत आमचे तनखेचा हिशेब करून आमची तलफ भरून द्यावी अगर सदरी लिहिल्याप्रमाणें तनखेबद्दल आह्मास तुह्मावर न्याय कोर्टात रीतीप्रमाणें तजवीज करून रुपये वसूल करण्यात येतील व तेणेंकरून कोर्ट खर्च तुह्मावर बसेल आणि या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल हें खूप समजावें कळावें, तारीख २६ माहे जुलै सन १८७७ इसवी.

( सही ) रोडीसा वल्लद त्रिंबकसा रंगारी वस्ती बाळापुर दस्तुर खुद्द

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. मी फिरत फिरत मौजे लोणी प्रगणे वाकद तालुके व जिल्हे वाशिम एथें श्रीसखाराम बुवा साधूचे दर्शनास गेलों. तेथील हवाल पुढें लिहिल्याप्रमाणें—

हे साधू कोणाशी बोलत नाहींत फक्त खुणांनीं कांहीं कोणास सांगावयाचें असल्यास सांगतात. यांचें वय सुमार ७०।७५ वर्षांचें असावें असें अनुमान आहे. एथें प्रत्येक सोमवारीं बरीच यात्रा जमत असते व नवसही पुष्कळ येतात. ब्राह्मणभोजन तर नेहेमीं सुरूच आहे. दहा पांच ब्राम्हण तेथें नाहींत असा एकही दिवस जात नाहीं. आणि भोजनास पुरण असून सर्वांचें भोजन पहाटेस तीन चार वाजण्याचे सुमारास होतें. दिवसाही कोणी आल्यास स्वयपाक होत असतो. इतकें असून त्यांचा स्वतःचा कोणास बिलकूल उपद्रव नाहीं. ते कोणाचे हातचें खात नाहींत. त्यांचा जेवण्याचा प्रकार असा आहे कीं, दाळ, तांदूळ, कणीक, भाजी व तिखट मीठ वगैरे सर्व एका ठिकाणीं तपेलींत घालून विस्तवावर ठेवतात आणि ते पदार्थ कांहीं शिजले न शिजले तोंच त्यांतून थोडे थोडे काढून खाण्यास आरंभ करितात व तसेच ते शिजत असतात. हे साधू मोगलाईत तळणी ह्मणून गाव आहे तेथील रहाणारे ब्राह्मण जातीचे असून ह्या गावांत १७।१८ वर्षांपासून अशाच स्थितींत आहेत ह्मणून तेथील लोक सांगतात. पत्रविस्तार फार झाला सबब पुरें करितों. सवडीप्रमाणें पुढें लिहीन. कळावें हे विनंती.

एक दर्शनास जाणारा क्ष.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० जळगाव तालुक्यांत कसबे पातुर्डे एथील इं. म. शाळेंतील मुलांस बक्षिसें वाटण्याचा समारंभ जून महिन्यांत नवीन घेतलेले भाड्याचे इमारतींत झाला बैठकीची व्यवस्था उत्तम प्रकारची केली होती. गावांतील लोक २५।३० आले होते. रा. रा. देवीदास कन्हयालाल आगरवाले हे अध्यक्षस्थानीं होते. सभेस ४ वाजतां प्रारंभ झाला. प्रथमतः लालाजी यांणीं मुलांचें थोडें वाचन घेऊन नंतर हेड मास्तर रा. रा. नारायण विठ्ठल कोल्हारकर यांणीं मंडळीचे येण्याबद्दल आभार मानून समारंभाचा हेतु विदित केला व वार्षिक परिक्षेंत पास झालेल्या मुलांचीं नावें वाचलीं त्यांस अध्यक्षांनीं इनामें दिलीं. बाकी पैकीं कांहीं मुलांस उत्तेजन येण्यासाठीं एक रुपयाचीं पुस्तकें दिलीं व चांगल्यारीतीनें अभ्यास करावा व नियमितपणें शाळेंत यावें असा उपदेश केला. सर्व शाळेंतील मुलांस संतोषविण्यासाठीं हे. मा. यांणीं मिठाई वाटली. नंतर अध्यक्षांनीं शाळेंतील मुलांस वेळ समजण्यासाठीं घड्याळ व घांट वगैरे करितां वर्गणी जमविली तीः—

| नाव | रुपये |
|---|---|
| रा. रा. देवीदास कन्हयालालजी | १९ |
| ,, ,, रतनसा सोनासा रंगारी | ५ |
| ,, ,, रामराव मुकुंदराव देशमुख | २ |
| ,, ,, उदेभान गंभिरजी पाटील | १ |
| ,, ,, उत्तमचंद ठाकुरदास | १ |
| ,, ,, काशीराव गोवाजी देशमुख | १ |
| ,, ,, नारायण विठ्ठल हेड मास्तर | २ |
| ,, ,, रावजी दर्याजी पाटील | १ |
| ,, ,, गणपत सखाराम सोनार | ८ |
| ,, ,, जानकीरामसा रंगारी | ८ |
| ,, ,, पुरुषोत्तम त्रिंबक देशपांडे | ८ |
| मे. काजी साहेब | १ |
| | ३०८ |

यांतून १९ रुपयांचें घड्याळ व पांच रुपयांची घाट आणविणार आहेत व बाकी रुपयांची व्यवस्था गरीब मुलांची फी, पुस्तकें, इत्यादि करणार आहेत. हें झाल्या नंतर जमलेल्या सर्व लोकांस विडे वाटले. मग दोन मुलांनीं विद्येपासून फायदे या विषयावर रचलेले निबंध वाचले. नंतर सभा विसर्जन झाली. याबरून एथील लोकांस शाळेची बरीच काळजी आहे असें दिसतें. परंतु एथें शाळागृह चांगलें नसल्या कारणानें व मास्तरांचा भरणा मुलांच्या मानानें नसल्यामुळें शिकणें जसें चालावें तसें चालत नाहीं याकरितां सरकारानें आपला सढळ हात सोडून या गावास उत्तम शाळागृह व २ असिस्टंट दिल्यास शाळा दिवसेंदिवस उत्तम दशेस येईल. या शाळेंतील एक पहिले वर्गांतील गरीब मुलगा डायरेक्टर साहेब यांचे हुकुमावरून असिस्टंटची जागा मिळेल या आशेनें सुमारें सवा वर्ष उमेदवारी करीत आहे परंतु त्यास अजून जागा मिळत नाहीं. लोभ करावा ही विनंती. कळावें ता० २८ जून सन १८७७ इसवी.

एक "क्ष"

---

वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ वद्य ४ शके १७९९

---

## पर्जन्य !

दयालु परमेश्वरानें पर्जन्याविषयीं आपला कृपाकर या महिन्यांत आंखडून धरिला तेणेंकरून सर्वत्र हाहाकार उठला आहे! गुदस्तां पोळलेल्या माणसांस यंदाही उदक न मिळेल तर त्यांचे जीव जगावेत कसे ! कृपाळु परमेश्वरा, आतां अंत पाहू नको. बापा तूं लवकर जीवन दिलें नाहींस तर लाखो लोक निर्जीव होतील. तूं ओलावा दिला नाहींस तर आह्मांस कंठशोष होईल ! आह्मी मनुष्यें पापी आहो ह्मणून आह्मांवर दया करावयाची नसेल तर जनावरांकडे तरी पहा! व त्या बिच्यार्‍या अस्थिपंजर झालेल्या गाईंची व त्यांच्या वत्सांची दीनवाणी स्थिति उदकवृष्टीच्या योगें नाहींशी कर. आमच्या देशाच्या मूर्खत्वाचें आह्मांस चांगलें बक्षीस मिळत चाललें. परराष्ट्रीय ज्ञानी लोक कौशल्यानें शेंकडो पशूंचें व मनुष्यांचें काम निर्जीव यंत्रांनीं करितात व आमच्या इकडे पशूंच्या बदला गाड्यांचें व नांगरांचें जूं ज्ञानी माणसें मानेवर घेण्यास सज्ज झालीं! व २ जनावरांचे ठिकाणीं आठ आठ जण खपूं लागलीं तरी पोटाच्या आगीची शांती नाहीं. देवा, काय करावें ? भीक मागितली, पोट भरत नाहीं. मजूरी केली, पोट भरत नाहीं. मुलूख डोक्यावर घेतला, पोट भरत नाहीं. अशी एक वर्षाच्याच आवर्षणानें स्थिति झाली आहे. तर हे दीनवत्सला, कृपासागरा, करुणाकरा, परमेश्वरा, आतां ही तूं वृष्टिरूप तुष्टी न देतां आह्मा कष्टी जनास हातचें सोडशील तर अन्न अन्न करून कोट्यावधि प्रजा किड्यामुंग्यां प्रमाणें पटापट प्राण सोडील यांत काडीमात्र संशय नाहीं. देवा, हें तुला कळत असून तूं कां झोंपी गेलास ? नकोरे असें करूं. बापा, धाव, लवकर धाव. तूं अनंत अवतार माथें घेतले आहेस तसा पर्जन्याचाही अवतार या वेळीं सत्वर घे आणि आमचीं अनिष्टें टाळ.

गुदस्तां प्रमाणेंच मद्रासेकडे पाऊस नाहीं, ह्मैसुराकडे पाऊस नाहीं, मुंबई इलाख्यांत पाऊस नाहीं, कोंकणांत पाऊस नाहीं, काठेवाडांत पाऊस नाहीं, वायव्य प्रांतांत पाऊस नाहीं, नेपाळांत पाऊस नाहीं, आमच्या वऱ्हाडांत पाऊस असावा तसा नाहीं व नजीक खानदेशांतही पाऊस नाहीं. व त्यामुळें धारण नेहमीच्या चौपट-ह्मणजे ७६ रुपयानीं खंडी झाली. व नित्य शेंकडो गाड्या धान्य बाहेर जाऊं लागले. आतां पुढें खावें काय? आणि नदीही कोरडी पडत चालली तेव्हां प्यावें काय? परमेश्वरा, सर्वांचा संरक्षण कर्ता तूं आहेस. तुला वाटेल तसें तूं कर.

---

## स्टेशन मास्तर लोकांवर गदा.

कोठें कांहीं आमिष दिसलें कीं धूर्त लोक मांजराप्रमाणें टपून आपली पोळी साधतात. बारा वर्षां मागें अमेरिकेंतील लढाईमुळें हिंदुस्थानांतील कापसास अतिशय तेजी आली व रेलवेवरून हजारो खंडी कापूस नित्य जाऊं लागला तेव्हां कित्येक स्टेशन मास्तर व गुड्स क्लार्क यांनीं हजारो रुपये मिळविले. व्यापाऱ्यांनां असें झालें होतें कीं कसेंही करून माझा माल आधीं जावो. मग त्या चढाओढीनें लोक स्टेशन मास्तराचा हात दाबीत व त्याची चंगाळ होई. या गोष्टीचा शेवटा शेवटास बहुत बोभाटा झाला, व रेलवे कंपनीनें पुढें चांगली नजर पोंचविली. असे बोभाट पुढें फारसे ऐकण्यांत आले नाहींत पण ईश्वराच्या अवकृपेमुळें गुदस्त सालीं दुष्काळ पडला तेणेंकरून हजारो लोक मरण पावले व लाखो लोक देशोधडीस लागून अन्नान्न करीत सुटले; याच दुःखांत रेलवे कडील लबाड लोकांस पुन्हा कपिलाषष्टीचा योग प्राप्त झाला. ह्मणजे दुष्काळाचे भागाकडे जाण्याकरितां चोहो कडून धान्य रवाना होऊं लागलें तें इतकें अतोनात कीं कित्येक ठिकाणीं लक्षावधि पोतीं रेलवे स्टेशनावर शिलकेस पडूं लागलीं व व्यापाऱ्यांचें नुकसान होऊं लागलें तेव्हां त्यांच्या कोमेजलेल्या मुखावरून हात फिरवून त्यांचें व आपलें दोघांचेंही मुख प्रफुल्लित करण्यास दुष्ट बुद्धीचे स्टेशन मास्तर लोक हातांत हात खेळवूं लागले व तेणेंकरून बरीच धुमाळी उडाली. कोणतीही गोष्ट अति झाली ह्मणजे तेथें माती पडतेच, त्या न्यायानें कंपनीकडे कित्येक बोभाट गेले व त्यांनीं त्यावरून चौकशी करून कित्येकांस शिक्षा दिल्या व कित्येकांच्या चौकशा चालू आहेत, हा प्रकार कोणा एकाच रेलवेवर झाला असें नाहीं, बडोदा रेलवे, ईस्ट इंडिया रेलवे, जी. आय. पी. रेलवे वगैरे सर्वांवर झाला आहे. स्टेशन मास्तरच्या बुभुक्षितपणास व्यापारी लोक इतके त्रासले कीं त्यांच्या वरिष्ठांस किंवा सरकारास कळविल्या शिवाय त्यांस गत्यंतर नाहींसे झालें. कांहीं स्टेशन मास्तर पहिल्या पहिल्यानें एका व्यागनला ३० रुपये घेत होते, पुढें ५० रुपये मागूं लागले आणि दिवसेंदिवस त्यांचा बुभुक्षितपणा अधिकाधिक दिसूं लागल्यामुळें त्यांनीं पोलिसास व ट्राफिकम्यानेजरास खबरा दिल्या. एके ठिकाणीं तर व्यापाऱ्यांनीं तारेंतून ९ वेळां खबर दिली तेव्हां त्यांची दाद लागली. गेल्या एका आठवड्यांत ५ स्टेशन मास्तरच्या खबरा आह्मांस समजल्या त्या येणेंप्रमाणें:—

१ कुटणी एथील स्टेशनावर कोणी बंगाली बाबू मास्तर होता त्यावर मुकद्दमा शाबीद होऊन २ वर्षें सक्त मजुरी कैद व हजार रुपये दंड अशी त्यास शिक्षा झाली.

२ स्लीमनाबाद एथील स्टेशन मास्तरास दोन वर्षें सक्त मजुरी कैद व २०० रुपये दंड अशी शिक्षा झाली.

३ देहरी एथें कोणी मद्रासी ख्रिस्ती स्टेशन मास्तर होता त्यानें १५००० रुपये थोड्या दिवसांत मिळवून घरीं पाठविले व मुकद्दमा वगैरे होईल. ह्मणून खर्चास १००० रुपये जवळ ठेविले त्यास पकडून कैद केलें आहे, व त्याची चौकशी चालू आहे.

४ चिंदवाड स्टेशनावर एक हिंदुस्थानी पुरभय्या होता त्यानें व्यापाऱ्यांस इतका त्रास दिला कीं त्यांनीं रेलवे कंपनीस विच्यारिलें, स्टेशन मास्तरास दर व्यागनमागें काय लांच द्यावा याचा निरख ठरवावा. यावरून कंपनीनें त्यास पकडून त्यावर मुकद्दमा चालविला.

५ गारावारा एथील स्टेशन मास्तर मि० सदरलंड यासही सदरील प्रमाणेंच आरोपावरून कैद केलें आहे, व त्याची चौकशी चालू आहे.

हीं व अशींच मागें कित्येक उदाहरणें आम्हीं वाचिलीं तीं फार भयंकर आहेत. सबब बाकीच्या सर्व स्टेशनमास्तरांनीं या गोष्टीपासून सावध व्हावें, व नीतीनें वर्तावें, ज्यांत त्यांची अब्रू वाढेल तीच गोष्ट काळजीपूर्वक केली पाहिजे. केवळ पैशाच्या हावास चढून अनीतीनेंही तो मिळविणें यांत कांहीं पुरुषार्थ नाहीं; अति नीच व अति भ्रष्ट रीतीनें शरीराचा बाजार करणाऱ्या बाजारबसव्या ही हजारो रुपये मिळवून अंगावर दागिन्यांचीं ओझीं घेऊन मिरवितात ह्मणून त्या पैशाकरितां त्यांस सभ्य लोकांत कांहीं मान किंवा प्रतिष्ठा आहे काय ? व पुष्कळ जीव तोडून अतोनात धन मिळविलें तर तें कांहीं बरोबर येणार आहे काय ? याचा सर्वांनीं विच्यार करावा, व नीतीनें वागून आपलें नाव करावें ह्मणजे त्यांत इहपरत्र हित होईल.

---

## उद्योगाविषयीं बाटलीवाल्यांचें उदाहरण.

अशी ह्मण आहे कीं," नर करणी करे तो नरका नारायण होय. ह्मणजे यःकश्चित जरी मनुष्य असला, व तो उत्तम प्रकारें आणि नीतीनें वागला तर उदयास येऊन मोठेपणा पावतो. मामलेदार शेंकडो आहेत पण धन्य त्या साधू यशवंतराव महादेवाची! ज्याला लोक देव मामलेदार ह्मणूं लागले! हें त्याच्या अद्वितीय व निष्कलंक वर्तनाचें फल होय. मुंबईचे मोठे बाटलीवाले, ज्यांचे पुत्र नुकतेच मरण पावल्याचें आपण ऐकिलें आहे. ते पहिले सर जमशेटजी मुंबईत तरुणपणीं साहेब लोकांच्या बंगल्यावरून दारूच्या रिकाम्या बाटल्या गोळाकरून आणून विकीत ही त्यांची पहिली दुकानदारी! पण पुढें त्यांनीं आपल्या अद्वितीय उद्योगाच्या व छातीच्या योगानें चीन, युरोप, अमेरिका वगैरे दूरदूरच्या देशीं व्यापार केला व लक्षावधि रुपये मिळविले. फक्त दानधर्माकडेसच २६ लाख रुपये त्यांनीं खर्चिले व मरणसमयीं त्यांच्याजवळ ८५ लक्षांची दौलत होती. आपल्या वंशजानीं सर्व दौलत उधळली तरी त्यांचा सुखानें चरितार्थ चालावा ह्मणून त्या दीर्घ दृष्टी पुरुषानें २५ लक्ष रुपये सरकारांत कर्जाऊ ठेविले. मग अशा नामांकित पुरुषाचे पुतळे कां न व्हावेत? मुंबईस गेलेल्या बहुत लोकांनीं पाहिलें असेल कीं, टौनहालांत व बाटलीवाल्याच्या आस्पिटलांत सर जमशेटजी यांचे पुतळे आहेत. हीच मनुष्यास धन्यता होय. व अशाच पुरुषाच्या वर्तणुकीचें अनुकरण करून सर्वांनीं वागावे व ईश्वरकृपेंकरून उदयास यावें.

---

## वऱ्हाड.

हैदराबादेहून २० वे तारखेचें पत्र आलें त्यावरून कळतें कीं, तिकडे पाऊस अगदी नाहीं. धान्य महाग होत चाललें आहे. उपासानें अर्धे मेलीं झालेलीं पोरें डोक्यावर घेऊन हजारो भिकार शहरांत नवे आले आहे. कांहीं इलाज नाहीं. दिवाण साहेब पर्जन्याविषयीं फार काळजी करून आहेत — मि० अमिरुदीन तयबजी तेथें

गेले होते त्यांना बुधवारीं दिवाण साहेबांनीं मेजवानीला बोलाविलें होते व त्यांचा चांगला आदर केला. — दिवाण साहेबास विलायतेस "सिटिझन आफ लंडन" ही पदवी तिकडील लोकांनीं दिली होती तिचें विषयींचा लेख सोन्याच्या एका सुंदर डब्यांत घालून त्यांनीं दिवाण साहेबास पाठवून दिला आहे. हें त्यांस मोठें भूषण होय यांत संशय नाहीं.

---

मोगलाई अमलांत मे० पेस्तमजी पारशी यांनीं वऱ्हाडांत कित्येक मोठाल्या धर्मशाळा बांधल्या आहेत त्यापैकीं एक अकोल्यास आहे. तिला बांधून ४९ वर्षे झालीं असें ह्मणतात. ती अक्कलकोटावर आहे तिचें काम मोठें सुंदर व भव्य आहे. पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, पाया खचल्यामुळें दोन तीन बाजूच्या भिंती झुकल्या आहेत. तरी भिंतींचें सामान व लांकडी सामान नव्यादाखल उपयोगी पडण्यासारखें आहे ह्मणून तिचा जीर्णोध्धार व्हावा असा विच्यार कित्येक सद्गृहस्थांच्या मनांत आला आहे. व त्यांतच एक अशी सूचना निघाली आहे कीं, जर ही धर्मशाळा मुळापासून नवीन बांधावयाची आहे तर शहरच्या एका कोपऱ्यांत, जो कोपरा दिवसानुदिवस ओसाड सारखा होत चालला आहे तिकडे, न बांधितां गावाची भेंरभराट जेथें हल्लीं दिसत आहे तेथें शहर आणि पेंठ यांचे दरम्यान नदीचे काठीं उंचवट्यावर बांधावी. ही सूचना अति उत्तम आहे व हिला सर्व लोक मान्य होतील अशी आह्मांस खात्री आहे. या इमारतीला सामान आहेच, फक्त मजूरीकरितां सुमार एक हजार रुपये लागतील असें ह्मणतात. त्या साठीं लोकांनीं कांहीं वर्गणी जमविली आहे. तीते वाढावतील व म्युनिसिप्यालिटी त्यांस कांहीं मदत करील आणि हें उत्तम व आवश्यक काम मंडळी हातीं घेऊन लवकर तडीस नेईल असें आह्मीं इच्छितों.

---

जुलै महिन्यांत दर दोन वर्षांनीं म्युनिसिप्यालिटीचे मेंबर बदलीत जावे असा ठराव आहे. त्याप्रमाणें सालमजकुरीं बदलावयाचे कामीं असा विच्यार झाला आहे कीं, शहरचे लोकांनीं मेंबर निवडून द्यावे. ह्मणजे १० रुपयेव दहाहून अधिक रुपये पोलिसपट्टी देणारे प्रत्येक गृहस्थानें म्युनिसिप्यालिटींत अमुक अमुक १९ मेंबर असावे असा आपला अभिप्राय नावनिशी सहित लिहून पाठवावा. याप्रमाणें सर्वांचे अभिप्राय आल्यावर ज्यांनां बहुमतें आलीं असतील ते मेंबर निवडले जातील. ही सुधारणेची लोकसत्तात्मक राज्यासारखी नवीन टूम आहे व ही वऱ्हाडासारख्या प्रांतांत निघाली याजबद्दल संतोष मानिला पाहिजे. आतां कोण कोण मेंबर निवडले जातात व कसा काय प्रकार होतो तो पाहू. तरी मंडळी यांत विचार करील व आपले सोबती ह्मणून, इष्टमित्र ह्मणून किंवा धंदेवाले ह्मणून यांचीच तशी नावनिशी लिहून देणार नाहीं. ह्मणजे वाण्यानें सर्व वाणीच लिहून दिले, असे पकारें कोणी आपलें हसें करून घेणार नाहीं असें आह्मीं इच्छितों.

रा. रा. कृष्णराव हरी कोलटकर म्युनिसिप्यालिटीचे सेक्रेटरी आहेत त्यांनीं तें काम पहाण्यास आपणास वेळ मिळत नाहीं सबब राजीनामा घ्यावा असें कामेटीस कळविलें त्यावरून त्यांस सहाय होण्यासाठीं रा. रा. सदाशिव विष्णु भागवत यांस जाइंट सेक्रेटरी नेमिलें व कोलटकर यांचा राजीनामा तूर्त रहित केला.

---

बुलढाण्यास इंग्लिश आफिसांत सेकंड क्लार्कची १०० रुपयांची जागा रिकामी झाली होती तिजवर रा. रा. गोपाळ श्रीकृष्ण जे इलिचपुरास ४० रुपयांवर होते त्यांस नेमिलें. गोपाळराव हुशार असून मागें पुष्कळ दिवस रिकामे असून अलीकडेही पुष्कळ दिवस लहान पगारावर होते आणि एक दोन वेळा बढतीचा प्रसंग आला असतां त्यांस ती मिळाली नाहीं ह्मणून त्यांच्या एकदम बढतीबद्दल आह्मास अधिक संतोष वाटतो. यवतमाळ जिल्ह्यांत क्लार्क आफ धि कोर्टचेंही काम यांनीं केलें आहे. हे शांतवृत्तीनें वागून व अधिकाऱ्यांस प्रिय होऊन दिसानुदिवस अधिक नावारूपास येतील असें आह्मी इच्छितों. रा. रा. श्रीकृष्ण नरहर एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांचे हे चिरंजीव आहेत त्यांच्या ही नावास गोपाळरावांनीं या कर्तबगारीनें भूषा आणिली यांत संशय नाहीं.

---

वाशिमाहून २४वे तारखेंचें पत्र आलें आहे त्यावरून समजतें कीं बरेच दिवसांत तिकडे पाऊस नाहीं. उष्णता फार होत असते—डिपुटी कमिशनर आफिसांतील क्लार्क मि० चार्लस यांनीं पोलिसचा हेड कान्स्टेबल व कान्स्टेबल यांशी मारहाण केली त्याविषयीं चौकशी चालू आहे.

---

"एक बुक घेणारा कारकून" या सहीचें आह्मास पूर्ववऱ्हाडांतून पत्र आलें आहे त्यात तो एका ठिकाणच्या हेड मास्तर व असिस्टंट मास्तर यांच्या संभाषणाविषयीं लांबलचक लिहितो. त्याचा मुद्दा इतकाच आहे कीं बुकविक्रीचें कमिशन हेडमास्तरांनीं घ्यावें आणि लिहिणें त्यांनीं असिस्टंट मास्तराकडून लिहवावें हें योग्य आहे काय? कामास दाम याप्रमाणें ज्यानें काम करावें त्याला कमिशन मिळावें ह्मणजे हेडमास्तरानें स्वतां लिहिणें राखावें व कमिशन खावें, नाहींपेक्षां असिस्टंटकडे तें द्यावें व त्याला कमिशन द्यावें हें यथार्थ असें कारकून लिहितात. व आह्मांस शास्त्रार्थ विच्यारितात पण या विषयाचे पंडित आह्मी नव्हे. रा. बा. डायरेक्टर आहेत. त्यांकडे पृच्छा झाली असतां निर्णय होईल.

---

टपालचीं पत्रें रजिस्टर करणारास पावती आपले घरीं पाहिजे असेल तर त्यानीं रजिष्टराबद्दल च्यार आण्याचे ऐवजीं पांच आणि दिले असतां त्यांस पावती आणून दिली जाईल असा नवीन ठराव होत आहे ह्मणून थोडे दिवसांमागें आह्मी लिहिलें त्याप्रमाणें सरकारचा ठराव झाला. व हिंदुस्थानांतील पोस्टआफीसावरील डिपुटी डायरेक्टर जनरल साहेब यांचा तारीख १९ जूनचा जाहिरनामा प्रसिध्द झाला आहे कीं तारीख १ आगष्टपासून हा ठराव अमलांत येईल. जो मनुष्य साडेपांच आणे टपालखर्च करील त्याचें पत्र रजिस्टर होऊन पावती त्याचे घरीं येईल. व पहिल्याप्रमाणें साडेच्यारआणेच खर्चकरील त्याचें पत्र रजिस्टर होऊन जाईल परंतु पावती घरीं येणार नाहीं. ज्यांनां पावती आणवावयाची असेल त्यांनीं पत्रावर आपला स्वतांचा पत्ताही बरोबर लिहिला पाहिजे असें जाहिरनाम्यांत कळविलें आहे.

---

शिगावचे मि० मारुती पाटील यांस रेसिडेंट साहेबांनीं मेहेरबान होऊन स्पेशियलमाजिस्त्रेटचा त्या गावीं अधिकार दिला हें ऐकून आह्मांस संतोष होतो. हे तरूण गृहस्थ हुशार, उद्योगी, व लायख आहेत. आतां शिगावास असलेले स्पे० मा० रा. रा. अच्युतरावजी देशपांडे यांस बाळापु[र] नेमितील व बाळापुरचे रा. रा. हणम[ंत] [सूर्य]जी घरीं बसतील असें वाटतें.

---

[करपून]

ग[े]ल्या, दे[शी] निवारचें वेणीसंहार नाटक इचलक[रंजी]करांनीं फार चांगलें केलें. त्यांत दुर्योधनाचें भाषण उत्तम व अश्वथ्याम्याचें तर अत्युत्तम होतें. काल बेदरवादशादचा फार्सही मोठा बहारीचा झाला. सीताहरण नाटकांतही कित्येक भाषणें चां[ग]ले मनोवेधक होतीं.

[अहा]

## वर्तमानसार.

तुर्कस्थानच्या फौजेचे अधिकारी बदलले. महमेत अली यांस अबदुल करीम पाच्छा यास बडतर्फ करून त्याचे जागेवर कम्यांडर इन चीफ नेमिलें व सुलिमान पाच्छा यास रोमेलिया एथें फौजेवर कम्यांडर नेमिलें. आणखीही मुख्य मुख्य २।३ सरदार सुलतानानें बडतर्फ करून हुजूर बोलाविले आहेत.

तुर्कस्थानची फौज अधिक आवेशानें लढत आहे तिनें सिलिस्त्रिया, वानो आणि शमला यांजवळ बऱ्याच टकरा दिल्या.

रशियन फौजेनें रशचक याला पूर्ण वेढा घातला व तोफांचा मारा शहरावर चालू केला आहे.

फिलिपोपोलिस आणि अद्रियानोपल यांमधील रेलवेच्या व्यापाराला हरकत झाली आहे.

मांटिनिग्रीला लोकांनीं निकसिकला वेढा देण्याचें काम सुरू केलें आहे.

उडत उडत बातमी आली आहे कीं, रशिया व इटाली यांचें सख्य होऊन कांहीं बेतबात झाले.

रशियांतील वर्तमानपत्रें ह्मणतात कीं, इंग्लिश सरकारची भूमध्यसमुद्रांतील फौज डार्डेनेल्समधें शिरेल तर इटालीची फौज तिला गांठील व दोन्ही फौजेची चकमक झडेल.

इंग्लिश सरकारचे युफ्रेटिस नामें लढाऊ जहाज १९०० लोक भरून दुसऱ्या ४ जहाजांसह मालटा आणि जिब्राल्टरकडे यावयास निघालें आहे. या चोहों जहाजामध्येही पुष्कळ लोक आहेत. माल्टा देशीकडे हे लोक जाणार असें ह्मणतात. पार्लमेंटमध्यें प्रधानांना याविषयीं असा निरोप विचारला असतां त्यांनीं सांगितला कीं युरोपांतील अशा गडबडीच्या वेळीं मालटा आणि जिब्राल्टर एथें बंदोबस्त चांगला ठेवणें अवश्य आहे ह्मणून पूर्वींच्या लोकांपेक्षां ३००० लोक तेथें अधिक पाठविले आहेत. विलायतेंतील वर्तमानपत्रास सरकारचा हा बेत आवडला.

बलगेरिया मधील लोवाझ हें ठिकाण मोठी लढाई करून रशियानें हस्तगत केलें.

शिपका रस्त्याकडे मोठी लढाई होऊन व पुष्कळ नाश होऊन शेवटीं रशियानीं तो रस्ता मोकळा करून घेतला.

रशियाची डोब्रुडशामधील फौज सिलिस्त्रियाला वेढा घालण्याकरितां जात आहे.

सुलेमान पाच्छाचे हाताखालील तुर्की १८००० फौज जाबिलीकडे येत आहे.

रशियन लोक कुरकडारा सोडून झाइमकडे जमत होते पण तेथें बरीच चकमक झडली व ते तेथून निघून गुलारीकडे गेले.

रशियन लोक बलगेरियांतील रहाणारांस शस्त्रें व दारूगोळा देत आहेत.

बलगेरियामध्यें रशियन लोकांनीं मागें मुसलमान लोकांची निर्दयपणें कत्तल उडविली ती बातमी खरी ठरली आहे.

रशियन लोकांनीं डान्यूबनदीच्या मुख्य तोंडावर मोठमोठालीं ४ जहाजें बुडवून टाकून तिकडून दुसरीं जहाजें येण्यास अटकाव व्हावा अशी तजवीज केली आहे व त्याकरितां इंग्रज सरकारानें सेंटपिटर्सबुर्ग एथील आपल्या वकील मार्फत रशियन सरकारास तसें करण्याचें कारण विचारलें आहे.

अड्रियानोपल एथील मुसलमान लोक रशियन फौजेच्या धाकानें पळून कानस्टांटिनोपलकडे पळून जात आहेत.

रशियन फौजा येनिसागऱ्याकडे आल्या व तेथील तुर्क फौजेचे तंबू डेरे वगैरे सामान त्यांनीं हस्तगत केलें.

डोब्रुडशामधील चरनोवाडा आणि मंगालि हीं ठाणी तुर्क लोकांच्यानीं राखवलीं नाहींत ह्मणून सोडून दिलीं व ते सिलिस्त्रियाकडे गेले.

रशियन फौजेचा नववा भाग निकोपोलिस सोडून विकूनकडे गेला व त्या शहराला वेढा घालण्याचा विचार आहे.

अड्रियानोपल प्रांतांत जितके लोक शस्त्र धारण करण्या जोगे आहेत तितक्या सर्वांनीं येऊन फौजेंत सामील व्हावें असा तुर्कस्थानच्या सुलतानानें जाहिरनामा लावला आहे.

रशियन लोकांनीं कासानालिम घेतलें व फिलिपोपोलिसकडे त्यांनीं चाल केली आहे.

आर्मेनिया मध्यें रशियन फौजेनें कार्सवर पुन्हा हल्ला केला होता पण, तुर्की फौजेनें त्यांचा पराभव करून व पुष्कळ नाश करून त्यांस हटविलें.

सुलिमान पाच्छा २०००० फौज घेऊन अड्रियानोपलवर आला आहे.

अबदूल करीम पाच्छा आणि रदिफ पाच्छा यांचें कोर्ट मार्शल होण्याचा ठराव झाला आहे.

रशियन फौजेनें शिपका घाटाचा चांगला बंदोबस्त केला व एस्किझाग्रा एथें ती फौज खडक बांधून राहिली आहे.

रशिया सरकारचा विचार आहे कीं, ब्याटोमचें बंदर शहर व परगणा ताब्यांत घ्यावा. बालकानच्या उत्तरेस बलगेरिया चें संस्थान स्वतंत्र करावें. व बालकान्स मधून सर्व युरोपियन राष्ट्रांस जाण्या येण्यास मार्ग असावा, इतकें ठरेल तर आपण तह करूं. असे एका पत्रांत वर्तमान प्रसिद्ध झालें आहे. पण तुर्कस्थान यांतून एकाही गोष्टीस कबूल नाहीं असें ह्मणतात.

रशियाच्या सैन्या बरोबर वर्तमानपत्रांचे जे बातमीदार आहेत त्यांनीं बाहुस्यावर पट्टेवाल्यासारखें सरकारांतून मागून घेऊन एक सहा इंचाचें बकल बांधावें व आपला एकफोटोग्राफ सरकारच्या शिक्के मोर्तबानेशीं जवळ बाळगावा लागतो. त्यांच्यावर नजर असते. त्यांनीं इकडे तिकडे जावें परंतु स्थळ बदलल्यास त्याविषयीं पूर्वीं कळविलें पाहिजे. तो बातमीदार शत्रूच्या तिकडे जाणार असा त्याचा रंग दिसेल तर त्याला लागलीच कैद करून अधिकाऱ्याकडे न्यावें असा ठराव झालेला आहे

मि० ए टी क्राफर्ड यांस ठाण्यास कलेक्टर नेमिलें पण त्यांनीं दुसरा हुकूम होईपर्यंत रत्नागिरीसच काम करावें. मि० डब्ल्यू रामसे विलायतेस रजेवर आहेत त्यांस कुलाब्यास कलेक्टर नेमिलें. आणि मि० जरव्हाईस ठाण्यास आहेत त्यांनीच तेथें अक्टिंग कलेक्टराचें काम पहावें अशा नेमणुका झाल्या.

रेलवे कडील माल गाड्यांना आलीकडे बरेच अपघात होत असतात. धान्याचा व्यापार अतिशयीत चालत असल्यामुळें माल फार भरतात व तेणेंकरून एकादे गाडीचें चाक फुटतें अशीं दोन तीन उदाहरणें ऐकण्यांत आलीं.

मुंबईचे गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल साहेब पुण्यास आहेत ते एक दिवस शहर पाहण्यास गेले होते. एके दिवशीं पुरंदरावर गेले होते. व कधींकधीं दोन मनुष्यें बरोबर घेऊन ते पायींच बाहेर फिरावयास निघतात. हा त्यांचा साधेपणा वर्णनीय व राजकार्यासही उपयुक्त होय.

मद्रास इलाख्यांत धान्य पुष्कळ चाललें आहे, या महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत १९००० टण धान्य तिकडे गे॰ एक टण ह्मणजे २७ मण पक्के.

मद्रास शहरांत या सहा महिन्यांत २९००० मनुष्यें मरण पावलीं. तेथील वस्ती ९ लक्ष आहे.

ब्रह्मदेशांत रंगून एथें बंदुका, दारूगोळा वगैरे बराच जात आहे. परतु तो लढाईकरितां नव्हे, बारमाही उपयोगाकरितां आहे असें इंग्लिश पत्रांतूनप्रसिद्ध झालें आहे.

मद्रासेंत मजूर कामावर लोक जास्ती ठेवूं लागले. गेल्या आठवड्यांत कृष्णा जिल्ह्यांत २१४३, कडापा जिल्ह्यांत १२२८३, बेलारी जिल्ह्यांत १४९७०, मदुरा जिल्ह्यांत १०१६, कोइमतूर जिल्ह्यांत ८८९. आणि कर्नूळ जिल्ह्यांत ३७९ लोक त्या आठवड्यांत कामावर लावले. तशीच धर्मादाय अन्न ज्यांस देतात त्यांच्या संख्येंतही ९९१९ लोकांची अधिक भरती झाली.

सर जमशेटजी जीजीभाई मरण पावले त्यांच्याकारितां स्मारकचिन्ह करावें ह्मणून विच्यार करण्याकरितां एक सभा मुंबईस लवकरच भरणार आहे.

गोवें एथील पोर्तुगीस गवरनर जनरल फार आजारी आहेत व त्यांनीं परत येण्यास परवानगी मिळावी अता आपले सरकारास अर्ज पाठविला आहे.

रेलवेच्या आगगाड्यांवर भयसूचक चिन्हांचे दिव्याचा कांहीं नवीन प्रकार अमेरिकेकडून कोणी आणिलेला चालू करण्याचा विचार आहे.

जयपुराकडे एक स्त्री सती गेली असें समजतें.

कोटीच्या पुढें इंडस स्टेट रेलवेची सडक १३० मैल तयार होत आली आहे व तीवरून अक्टोबर महिन्यांत गाडी चालू लागेल. आणखीही कित्येक मैल काम झपाट्यानें तयार झालें असतें पण सामाना वाचून खोटी आहे तें विलायतेहून येतांच झपाट्यानें काम चालेल.

हा कलकत्याकडून निघणाऱ्या आगगाड्यांच्या वेळांत कांहीं सोयवार फेरफार करावा असा विचार चालू आहे. ह्या गोष्टीस बंगाल सरकार, वायव्य प्रान्तसरकार व पंजाब सरकार यांचें अनुमोदन आहे. व मुंबई पुण्याकडेही तशा फेरफारानें गाडीची सोय होणार आहे परंतु जी आय पी रेलवे कंपनी त्या गोष्टीस अजून संमति देत नाहीं. हा फेरफार झाले असतां वाटांतून रात्रीच्या गाड्या चालतील... गाड्या येतील व तें सावधगिरीस बरें आहे. याजकरितां इंजिनियर खास... विषयीं खात्री लायक कांहीं कळेपर्यंत ही रेलवे त्या फेरफारास कबूल नाहीं. मग पुढें काय ठरतें पहावें.

पेशावर नावाची आगबोट आली तिला एडनपासून मुंबई पोंवतों पुष्कळ पाऊस लागला असें समजतें.

लार्ड स्यालिस्बरी यांस कित्येक लोकांनीं अर्ज केला आहे कीं आपण कापसावरील जकात कमी करण्यापूर्वीं एक स्पेशियल कमिशन नेमून इकडे पाठवा व माहिती करून घेऊन मग त्या गोष्टीचा निर्णय ठरवा.

चीन देशांत पीडाकारक दुष्काळ पडला होता तो पर्जन्यवृष्टीनें संपला. पिकांची लागवड झाली व तीं चांगल्या स्थितींत आहेत. परराष्ट्रांतील प्रधानानीं चीन सरकारास या कामीं मदत केली त्याबद्दल त्या सरकारानें त्या सर्वांस आभारपूर्वक पत्रें लिहिलीं आहेत.

मोठमोठाले राज्यांतून प्रधान मंडळीस पगार मोठमोठे असतात यांत आश्चर्य मानण्यासारखें नाहीं. कौट एथील एके ब्यांकेच्या मुख्य म्यानेजराला तीन लाख रुपये साल व त्याच्या दोघा असिस्टंटानां एकेक लाख रुपये साल आहे.

तुर्की लोकांचा एक सरदार हसनसारी पाच्छा यानें रूस लोकांपासून पैका घेऊन अर्डाहानचें ठाणें त्यांचे स्वाधीन केलें असें वर्तमान समजल्यावरून त्या सरदारास कैद केलें आहे.

राव साहेब आबाजी बळवंत भिडे मुंबईच्या हायकोर्टाचे शिरस्तेदार यांस सुरतेस अक्टिंग फर्स्ट क्लास सेकंड ग्रेड सबार्डिनेट जडज नेमिलें.

" देहांत शिक्षा " या विषयावर पार्लमेंट सभेंत गेल्या मंगळवारीं वाद होऊन अखेरीस असें ठरलें कीं, देहांत शिक्षा काढून टाकल्यानें खून पुष्कळ होतील असें जें लोकांचें ह्मणणें आहे तें तसें नसून गुन्ह्यांची संख्या कमी होईल, व तिच्या ऐवजीं दुसरी शिक्षा दिल्यानें तिचें स्वरूप अनुभवानें समजेल. व व्यावहारिक तंटा होणार नाहीं व लोकांच्या सुखाचा पाया पूर्वीप्रमाणें राहील.

काकोडाईल, मलाबार आणि युफ्रेतीज या तीन जहाजांस समुद्रावर जाण्याची तयारी करण्याचा हुकूम इंग्लिश सरकारानें दिला आहे.— अमेरिकेंतील ईरी, पेन्सिलव्हानिया, बाल्टीमोअर आणि ओहियो या लोखंडी सडकांवरील मजुरीचा दर कमी केल्यामुळें मजूरदार लोकांत मोठी खळबळ उत्पन्न होऊन कितीएक ठिकाणीं व्यापारास खोटी झाली आहे. दंगेखोर लोकांची फाटाफाट करावी व जाणाऱ्या येणाऱ्या गाड्या सुरक्षित राखाव्या हें काम फौजेकडे सोंपविलें आहे. मजूरदार लोकांनीं बाल्टिमोअराहून फौज येत असतां तीस बाटैंत लुटलें. बाल्टिमोअरचें स्टेशन दंगेखोर लोकांनीं जाळून टाकलें.

रशियाच्या बादशहाचे सैन्यांत यहुदी लोक ६०,००० आहेत त्यांनीं तुर्की लोकांवर चाल केली.

तिघा इंग्रज लोकांनीं अफगाणिस्थानांत यवनी धर्माचा स्वीकार करून यवनी स्त्रियांबरोबर विवाह केला. ही गोष्ट अमिरांस कळतांच त्यांनीं त्या तिघा असामींस धरून आणण्याचा हुकूम केला; परंतु ते सांपडले नाहींत.

नेपाळांत जून महिन्यांत थोडाबहुत पाऊस पडला; पण हल्लीं पाहिजे तसा पाऊस पडत नाहीं. पुढें न पडल्यास भाताचीं पिकें चांगलीं यावयाचीं नाहींत, यास्तव नेपाळांत दुष्काळ पडण्याचीं चिन्हें आहेत असें लोक भाकीत करितात.

मुलींच्या सरकारी शाळांत कसब करणाऱ्या स्त्रियांस घेण्याबाबद मद्रास सरकारानें जो ठराव केला आहे तो रद्द करून टाकावा, असा कितीएक वजनदार नेटिव लोकांनीं त्याच सरकाराकडे अर्ज केला आहे असें समजतें. इं. प्र.

प्रोफेसर मानियर उयलियम्स यांनीं गतवर्षीं दक्षिणहिंदुस्थानांत प्रवास केला. अलीकडे त्यांनीं विलायतेंतील टाइम्स पत्रांत एथील लोकांविषयीं व हिंदुस्थानच्या या दक्षिणभागच्या प्रदेशाविषयीं आपले विचार प्रगट केले आहेत. लोकांविषयीं त्यांचे मताचा सारांश असा आहे:—

"हिंदुस्थानांत ब्रिटिश राज्याची वृद्धि ज्या कामगार लोकांनीं पाहिली आहे व ज्यांचा अनुभव मोठा आहे ते असें सांगतात कीं जेव्हां जेव्हां कांहीं प्रांत इंग्रजांच्या हस्तगत झाले तेव्हां तेथील रहिवाशांत पुढें कांहीं दिवसांनीं जी ठकबाजी, कज्जेखोरपणा, कविबाजी- द्रव्यलोभ आणि दुसरे कांहीं अवगुण न्यायकोर्टांत व त्यांच्या परस्परांमधील व्यवहारांत आणि राज्यकर्त्यांशीं त्यांच्या वर्तणुकेंत दिसून आले ते पहिल्यानें त्यांच्या अंगीं नव्हते. अतिनीच व दुराचारी युरोपियन लोकांचे दुर्गुण जसे कंटाळवाणे असतात तसे अतिशय वाईट अशाही हिंदू लोकांचे नसतात, हिंदू चाकर लोक विश्वासू, प्रामाणिक व स्वामिभक्त असून जे त्यांच्याशीं चांगल्या रीतीनें वर्ततात त्यांच्याशीं इंग्रजी चाकरांपेक्षां ते अधिक प्रीतीनें वागतात. इंग्रजांपेक्षा यांच्या अंगीं स्वाभाविक सुजनता, पितृभक्ति आणि पदवी वय व विद्या यांजविषयीं पूज्यबुद्धि हीं अधिक आहेत व खाण्यापिण्यांत तर ते खचित अधिक नेमस्त असतात."

बहुतेक इंग्रज लोकांस हें वर्णन रुचणार नाहीं व मुंबई ग्याझेटच्या कर्त्या सारख्यांस तर प्रत्येक शब्द घेऊन भांडण्यास या वर्तनावरून सवड मिळेल.

मागील आठवड्यांत लाहोरावरून टोळांची एक झुंड गेली. यांच्यामुळें अर्धा कलाकपर्यंत आभाळांत काळोख झाला होता. सु. प.

शेठ मुरारजी गोकूळदास यांणीं एक हजार, लखमीदास खिमजीनीं एकहजार, व तिसरे एक मोठे गृहस्थ यांणीं दीड हजार अशा पंढरपुर व नाशिक एथील बालरक्षक गृहाकरितां रकमा बक्षीस दिल्या असें आह्मी ऐकतों.

ईस्ट इंडिया रेलवे कंपनीनें ड्रायव्हरच्या वगैरे जागा तें काम उत्तम रीतीनें शिकलेल्या नेटिवांस द्याव्या अशा विषयीं ठराव केला आहे. त्याप्रमाणेंच ईस्टर्न रेलवे कंपनीनें नेटिव लोकांस ड्रायव्हरच्या जागा द्याव्या असा ठराव केला आहे असें समजतें.

श्रीमंत महाराज शिंदेसरकार हे रामेश्वराचे महायात्रेस जाणार आहेत.

नेटिव लोकांनीं तयार केलेल्या पदार्थांचें प्रदर्शन पुढील महिन्याच्या १९ तारखेस राजकोट एथें सुरू होणार आहे.

दुष्काळाचे खर्चामुळें म्हैसूर सरकारचे खजिन्यांत रोकड रुपये हल्लीं शिल्लक नाहींत. त्यामुळें पल्टणींतील लोकांस पगार देणें तो रुपया ऐवजी पोस्टाचीं तिकिटें व सरकारी नोटा दिल्या असें समजतें.

जर्मनीचे प्रिन्स बिसमार्क हे, इंग्रज सरकारास, तुह्मी लढाईपासून अलग न राहातां लवकर निकाल केल्यास तुमचाही फायदा होईल, असा उपदेश करित आहेत ह्मणून राजकारस्थानी मंडळींत बोलवा आहे.

प्रशियांतील कांहीं सरदार लोक हल्लीं रशियाचे फौजेच्या मुख्य छावणींत गेले आहेत. त्यांचे रशियन लोकांकडून उत्तम रीतीचें स्नेहपूर्वक आगतस्वागत होत आहे. झार यांनीं आपल्या बरोबर जेवणासही त्यांस बोलावलें होतें असें समजतें.

ग्रीस देशांतही लढाईची तयारी चालली आहे. तें सरकार नवीन कर बसविणार असून कांहीं कर्जही काढणार आहे; व त्या पैशाचा व्यय जहाजें, तोफा व इतर लढाईचें सामान खरेदी करण्यांत करणार आहे असें कळतें. ने. ओ.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.